# फलटण संस्थान पुनर्घटना समिति

# अहवाल

X:757.23145.N44t
H6
024808

१९४६

# फलटण संस्थान पुनर्घटना समिति

# अहवाल

प्रकाशक :
रा. ब. के. वि. गोडबोले, दिवाण, सं. फलटण
जुलई १९४६

किंमत १॥ रुपया

मुद्रक : ग. म. वीरकर, राजमुद्रणालय, फलटण

मेजर राजाबहादुर

श्रीमंत सर मालोजीराव ऊर्फ नानासाहेब नाईक-निंबाळकर,

के. सी. आय्. ई., राजेसाहेब, सं. फलटण

यांसी—

आपल्या हुजूर हुकूम नं. १२/२०-११-१९४४ च्या नोटिफिकेशन-प्रमाणें नेमलेल्या 'फलटण संस्थान पुनर्घटना समिती'नें तयार केलेला अहवाल या सोबत आपणांस सादर करीत आहे.

पुणें,
दि. ७-७-१९४६

ध. रा. गाडगीळ
अध्यक्ष
फलटण संस्थान पुनर्घटना समिति

# अनुक्रमणिका


पृष्ठ

१ नेमणूक-घटना-कार्य — १

(१) नेमणूक, (२) कार्य, (३) आभार.

२ संस्थानबद्दलची सामान्य माहिती — ७

(४) भौगोलिक, (५) लोकसंख्या, (६) शेती, (७) उद्योगधंदे.

३ संस्थानच्या उन्नतीसाठीं आजपर्यंत केलेलें कार्य — ९

(८) पाणीपुरवटा, (९) बीं-बियाणें, (१०) सहकारी शेती, (११) गुरांचा दवाखाना व जनावरांची पैदास, (१२) इतर मदत, (१३) सहकार, (१४) श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि०, फलटण, (१५) उद्योगधंदे, (१६) हातमाग, (१७) शिक्षण–प्राथमिक शिक्षण, (१८) दुय्यम शिक्षण, (१९) उच्च शिक्षण, (२०) वैद्यकीय मदत व सार्वजनिक आरोग्य, (२१) पाणी पुरवटा, (२२) रस्ते व सार्वजनिक इमारती, (२३-२४) सरकारी उत्पन्न व खर्च.

४ समितीनें सुचविलेल्या योजना — १५

(२५) योजनांचें सर्वसाधारण स्वरूप, (२६) शेतीसुधारणा, (२७-२८) कोरडवाहू भागांतील पाणीपुरवटा, (२९) जमीन बंदिस्तीच्या योजना, (३०) वृक्षारोपण, (३१) पाणी मुराईचे बंधारे, (३२) धरणें, (३३) हप्तेबंदीनें वसुली, (३४) योजनेचा अंदाजी खर्च, (३५) बांध-दुरुस्ती, (३६) दुर्जल शेती, (३७) धरणांवरील खर्च, (३८) कालव्या-खालील शेती, (३९) दूधदुभत्याचा धंदा, (४०) सरकारी दुग्धालय, (४१) पशुवैद्यक खात्याची वाढ, (४२) फलसंवर्धन, (४३) नवीन शेतीपद्धति, (४४) यांत्रिक मशागत, (४५) सुधारलेलें बीं-बियाणें, (४६) जमिनींचें केंद्रीकरण, (४७) कृषियोजना अधिकारी, (४८) कर्ज-निवारण, (४९) सहकारी बँक, (५०) सहकारी पतपेढ्या, (५१) सहकारी विक्रीमंडळ, (५२) बँकेवर सरकारी नियंत्रण, (५३-५४) लांब मुदतीचीं कर्जे, (५५-५६) नवीन कायदे, (५७) उद्योगधंदे, (५८-५९-६०) ग्रामीण उद्योगधंदे, (६१) औद्योगिक अधिकारी, (६२) विजेचा

पुरवठा, (६३) शिक्षण–प्राथमिक शिक्षण, (६४) प्राथमिक शिक्षक, (६५) हजेरी अधिकारी, (६६-६७) सक्तीची योजना, (६८) शालागृह, (६९) वाचनालयें, (७०) शेतकीशाळा, (७१) दुय्यम शिक्षण, (७२) शेतकी व औद्योगिक शाळा, (७३) लोकशाळा, (७४) व्यावसायिक शिक्षणक्रम, (७५) आरोग्य–मध्यवर्ति रुग्णालय, (७६-७७) खेडेगांवांतील दवाखाने, (७८) सार्वजनिक आरोग्यखातें, (७९) गांवसफाई, (८०) खेडेगांवांतील पाणीपुरवठा, (८१) केंद्रगांवें, (८२) मार्गयोजना, (८३) ग्राममार्ग, (८४) नगररचना, (८५) शहरांतील पाणीपुरवठा, (८६) शहरसफाई, (८७) ग्रामरचना, (८८) सार्वजनिक इमारती, (८९) परतलेले सैनिक, (९०) खर्चाचे अंदाजी आंकडे, (९१) कायम स्वरूपाचा खर्च, (९२) चालू खर्च, (९३) अधिकारी व तज्ञ समिती, (९४) जनतेचें सहकार्य, (९५) वाढलेल्या उत्पन्नाची न्याय्य वांटणी, (९६) सुनागरिक वृत्ति.

**परिशिष्टें**


| | | |
|---|---|---|
| (अ) | योजनेसाठीं लागणारा नवीन अधिकारी व नोकरवर्ग. | ५५ |
| (आ) | योजनांसाठीं लागणारा अंदाजी खर्च. | ५७ |
| (इ) | ग्रामगट. | ६५ |
| (ऊ) | संस्थानची आर्थिक पाहणी. | ६७ |
| (ए) | बांधावयाच्या सार्वजनिक इमारती. | ८५ |
| (ऐ) | समितीचे कामासाठीं झालेला खर्च. | ८६ |
| (ओ) | समितीपुढें साक्षी देणाऱ्या नागरिकांचीं नांवें. | ८७ |

# फलटण संस्थान पुनर्घटना समिति

## नेमणूक—घटना—कार्य

दि. २१ नोव्हेंबर १९४४ च्या फलटण आज्ञापत्रिकेंत पुढील जाहीरनामा काढण्यांत येऊन फलटण संस्थान पुनर्घटना समितीची नेमणूक करण्यांत आली.

### The Phaltan Government Gazette

NOTIFICATION

(*Huzur Order No. 12*)

*Phaltan, dated the 20th November 1944*

As the present world war has proved, more than ever before, the desirability of planning for the future, a committee to be called "The Phaltan State Reconstruction Committee" is hereby constituted as under:

*Terms of Reference*

The Terms of Reference to the Committee are to explore the economic resources of, and other possibilities of development in, the State and to draw up a plan of action to be undertaken immediately and to be persued over a series of years to achieve in general the moral and material advancement as also social security of the people of this State and in particular to recommend:—

(i) how the agricultural, forestal and industrial resources of the State could properly be exploited so as to increase to the maximum, the income of the State and of the subjects of the State, with special reference to returned soldiers; and

(ii) how the system of land and other property rights could be regulated so as to bring about an equitable distribution of the increment in income; and

(iii) how the action of the State and co-operative effort among the people could be co-ordinated so as to bring about a progressive improvement in the standard of educational, cultural, mental and physical attainments of the men and women of the State, and also to create in them an awakening regarding their civic rights and responsibilities: and

(iv) how preventive and remedial medical facilities could be made easily and cheaply available to the villages; and

(v) how facilities, whithin the reach of the ordinary person, for occupational and technical education could be opened up to remove unemployment and provide trained personnel for industries, particularly those existing in the State.

It is desired that the Committee will submit its report in about six months.

*Members of the Committee*

1. Principal D. R. Gadgil, M. A., M. Litt.
   Gokhale Institute of Politics & Economics,
   Poona (*President*).

2. Mr. S. G. Vaze, B. A.
   Member of the Servants of India Society,
   Poona, and President, Phaltan State Legislative Council.

3. Lieut. Col. K. G. Gharpurey, I. M. S. (Retired), Poona.

4. Dr. Vasudeo Laxman Deshpande, M. B. B. S., B. Hy.
   Medical Officer i/c Infectious Diseases Hospital
   Poona.

5. Mr. K. V. Joshi, M. Ag.
   Retired Deputy Director of Rural Development, Bombay Province, Poona.

6. Prof. N. V. Kanitkar, M. Ag., B. Sc.
   Retired Chief Investigator, Dry Farming
   Research Scheme, Sholapur.

7. Mr. B. R. Sardesai, B. A., B. E., M. I. E.
   Retired Executive Engineer, Poona.

8. Mr. Bhaurao Paygonda Patil, Satara.

9. Mr. Jayant P. Naik, B. A. (Hons.)
   Hon. Secretary, Re-organization Department, Kolhapur City Municipality.

10. Mr. A. V. Sabde, B. A., LL. B.
    Pleader, Jamkhindi and Secretary, Dakshini Sansthan Lokasabha.

11. Mr. S. R. Bhonsale, B. A., LL. B.
    Finance Minister, Phaltan State (*Ex-officio*).

12. Mr. R. H. Shah, B. Sc., LL. B.
    Educational Minister, Phaltan State (*Ex-officio*).

13. Mr. R. S. Bapat, L. C. E.
    Sugar Factory, Canal & P. W. D. Officer, Phaltan State, and Rural Development Officer of the State (*Ex-officio*).

Additional members may be nominated by the Ruler of Phaltan and also co-opted by the Committee, if and when necessary.

**Malojirao**
Ruler of Phaltan

*[ भाषान्तर ]*

फलटण आज्ञापत्रिका

जाहीरनामा

( हुजूर आज्ञा नं. १२ )

फलटण, दि. २० नोव्हेंबर १९४४

भावी कालासाठीं नियोजन करण्याची जरूरी चालू महायुद्धानें अभूतपूर्व तऱ्हेनें सिद्ध केली आहे. म्हणून 'फलटण संस्थान पुनर्घटना समिति' या नांवाची एक समिति या जाहीरनाम्यानें पुढीलप्रमाणें नेमण्यांत येत आहे.

## कार्यक्षेत्र

समितीचें कार्यक्षेत्र पुढीलप्रमाणें राहील: समितीनें संस्थानांतील आर्थिक संपत्ती व विकास होण्यासारख्या इतर बाबी यांची पहाणी करावी; आणि साधारणतः या संस्थानांतील प्रजाजनांची नैतिक व ऐहिक वाढ व्हावी व समाजस्वास्थ्य रहावें या दृष्टीनें एक कार्ययोजना तयार करावी. ही योजना ताबडतोब हातीं घेऊन पुढें सतत कांहीं वर्षे चालू ठेवतां येण्यासारखी असावी. समितीनें विशेषतः पुढील प्रश्नांकडे लक्ष पुरवावें:

१. संस्थानचें व संस्थानांतील प्रजाजनांचें उत्पन्न जास्तींत जास्त वाढवण्याचे दृष्टीनें, व युद्धावरुन परत येणाऱ्या सैनिकांचा मुद्दा विशेष लक्षांत घेऊन, शेती, जंगलें व उद्योगधंदे याबाबतची जी नैसर्गिक संपत्ती संस्थानांत आहे, तिचा उपयोग जास्तींतजास्त कसा करुन घेतां येईल;

२. उत्पन्नांत होणाऱ्या वाढीची न्याय्य वांटणी होण्याचे दृष्टीनें जमीन व इतर मालमत्ता यांबाबतचे हक्क कसे नियंत्रित करतां येतील;

३. संस्थानांतील स्त्रीपुरुषांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, मानसिक व शारीरिक गुणांची वाढ होण्याचे दृष्टीनें, आणि त्यांचेमध्यें त्यांचे नागरिकत्वाचे हक्क व जबाबदाऱ्या यांची जाणीव निर्माण करण्याचे दृष्टीनें संस्थानचें कार्य व लोकांचे सहकारी प्रयत्न यांचा कसा मेळ घालतां येईल;

४. रोगप्रतिबंधक व रोगनिवारक असे वैद्यकीय उपचार खेडेगांवांस सहज व स्वस्त कसे उपलब्ध करुन देतां येतील;

५. बेकारी नष्ट करण्याचे दृष्टीनें व विशेषतः संस्थानांत चालू असलेल्या धंद्यांना कसबी कामगार मिळण्याचे दृष्टीनें, सामान्य माणसांस धंदेवाईक, यांत्रिक शिक्षण देण्याची कशी सोय करतां येईल.

समितीनें आपला अहवाल साधारणपणें सहा महिन्यांत द्यावा अशी इच्छा आहे.

## समितीचे सभासद

१. प्रा. ध. रा. गाडगीळ, एम्. ए., एम्. लिट्.
गोखले राजकारण अर्थशास्त्र संशोधन मंदिर, पुणें, (अध्यक्ष).

२. श्री. श्री. ग. वझे, बी. ए.
भारत सेवक समाजाचे सदस्य व फलटण संस्थान कायदेमंडळाचे अध्यक्ष

३. ले. क. खं. ग. घारपुरे, आय्. एम्. एस्. (रिटायर्ड), पुणें.

४. डॉ. **वा. ल. देशपांडे,** एम्. बी. बी. एस्., बी. हाय्.
सांसर्गिक रोगाच्या इस्पितळाचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी, पुणें.

५. श्री. **का. वा. जोशी,** एम्. एजी.
रिटायर्ड डेप्युटी डायरेक्टर ऑफ रूरल डेव्हलपमेंट मुंबई प्रान्त, पुणें.

६. प्रा. **ना. वि. कानिटकर,** एम्. एजी., बी. एस्सी.
रिटायर्ड चीफ इन्व्हेस्टिगेटर, ड्राय फार्मिंग रिसर्च स्कीम, सोलापूर.

७. श्री. **बा. रा. सरदेसाई,** बी. ए., बी. ई., एम्. आय्. ई.
रिटायर्ड एक्झि. एंजिनियर, पुणें.

८. श्री. **भाऊराव पायगोंडा पाटील,** सातारा.

९. श्री. **जयंत पी. नाईक,** बी. ए. (ऑ.)
ऑ. सेक्रेटरी रीऑर्गनायझेशन डिपार्टमेंट, कोल्हापूर सिटी म्युनिसिपॅलिटी

१०. श्री. **अ. बा. साबडे,** बी. ए., एल्एल्. बी.
वकील जमखंडी व चिटणीस दक्षिणी संस्थान लोकसभा.

११. श्री. **स. रा. भोसले,** बी. ए., एल्एल्. बी.
अर्थमंत्री सं. फलटण (*Ex officio*).

१२. श्री. **रा. हि. शहा,** बी. एस्सी., एल्एल्. बी.
शिक्षणमंत्री सं. फलटण (*Ex officio*)

१३. श्री. **रा. शं. बापट,** एल्. सी. ई., शुगर फॅक्टरी कॅनल व पी. डब्ल्यू. डी. ऑफिसर व रूरल डेव्हलपमेंट ऑफिसर, सं. फलटण (*Ex officio*).

जरूर लागल्यास संस्थानाधिपति नवीन सभासद नेमतील अगर समिति नवीन सभासद स्वीकृत करूं शकेल.

**मालोजीराव**
अधिपति, फलटण

वर उल्लेखिलेल्या सभासदांशिवाय ले. क. डॉ. **शं. प. जोशी,** आय्. एम्. एस्. (रिटा.) यांस समितीनें दि. ९ एप्रिल १९४५ च्या ठरावानें समितीवर स्वीकृत केलें. समितीचे तीन अधिकारी (Ex-officio) सभासदांपैकीं श्री. स. रा. भोसले, बी.ए., एल्एल्. बी., अर्थमंत्री, यांस दि. २४-११-४४ रोजीं कमी करण्यांत आल्यामुळें व श्री. रा. हि. शहा, बी. एस्सी., एल्एल्. बी., शिक्षणमंत्री, यांनीं दि. ५-७-४५ रोजीं आपल्या जागेचा राजीनामा दिल्यामुळें ते अनुक्रमें वर निर्देशिलेल्या तारखांनंतर समितीचें काम करूं शकले नाहींत. त्यांचे जागीं दि. ४-८-४५ च्या आज्ञापत्रिकेप्रमाणें श्री. **श्री. म. उपळेकर,** एम्.ए., एल्एल्.बी., शिक्षणमंत्री, व श्री. **का. ब. केसकर,** अर्थमंत्री, यांस समितीचे

सभासद नेमण्यांत आले. दि. १ डिसेंबर १९४४ पासून श्री. ह्. कृ. परांजपे, बी. ए., यांस समितीचे चिटणीस नेमण्यांत आले.

२. कार्य

समितीची पहिली सभा दि. २७-११-४४ रोजीं होऊन कामाची सर्व-साधारण रूपरेषा आंखण्यांत आली व पुढीलप्रमाणें उपसमित्या नेमण्यांत आल्या.

**शेती**—श्री. गाडगीळ (अध्यक्ष), श्री. कानिटकर, श्री. का. ना. जोशी, श्री. शहा, श्री. बापट.

**शिक्षण**—श्री. वझे (अध्यक्ष), श्री. पाटील, श्री. नाईक, श्री. सावडे, श्री. शहा.

**उद्योगधंदे व मजूर**—श्री. गाडगीळ (अध्यक्ष), श्री. वझे, श्री. शहा, श्री. बापट.

**आरोग्य**—ले. क. घारपुरे (अध्यक्ष), श्री. देशपांडे, श्री. शहा, (दि. ९-४-४५ पासून ले. क. जोशी)

**नगर व ग्रामरचना**—श्री. सरदेसाई (अध्यक्ष), श्री. नाईक, श्री. शहा, श्री. बापट.

शेतकी उपसमितीची सभा दि. १६-१-४५ रोजीं भरून तींत आर्थिक पाहणीचा आराखडा तयार करण्यांत आला. पुढें इतर उपसमित्यांशीं विचार-विनिमय करून हा आराखडा निश्चित करण्यांत आला. फेब्रुवारी व मार्च १९४५ मध्यें कुसूर, कांबळेश्वर, मुंजवडी, बिबी, निर्गुडी, दुधेबावी या सहा गांवांची समितीतर्फे प्राथमिक आर्थिक पाहणी करण्यांत आली. एकूण ८५८ कुटुंबांची माहिती गोळा करण्यांत आली. (पाहणीबाबतचें टिपण परिशिष्टांत दिलें आहे.)

समितीची दुसरी सभा दि. ९-४-४५ रोजीं होऊन झालेल्या पाहणीचे कामाबाबत विचार करण्यांत आला. याच सभेंत संस्थानच्या सरकारी आय-व्ययाबाबत चर्चा झाली. तिसरी सभा फलटण येथें दि. ९, १०, ११ ऑगस्ट १९४५ या दिवशीं घेण्यांत आली. या वेळेस समितीनें कांहीं नागरिकांस साक्षी देण्यास बोलाविलें व संस्थानांतील वेगवेगळे भाग समितीनें पाहिले. वेगवेगळ्या उपसमित्यांनीं संस्थानांतील प्रमुख अधिकाऱ्यांशीं चर्चा केली. प्रत्येक उपसमितीच्या स्थूल योजनांचा विचार करण्यांत आला. दि. ५ ऑक्टोबर १९४५ च्या चौथ्या सभेंत सर्व उपसमित्यांनीं आपापल्या योजना मांडल्या व त्यांवर चर्चा होऊन समितीचा पक्का अहवाल तयार करण्यासाठीं एक उपसमिति नेमण्यांत आली. सदर उपसमितीनें दि. ११ ते १५ ऑक्टोबर १९४५ मध्यें फलटण येथें अहवालाचा कच्चा खर्डा तयार केला. समितीची पांचवी व अखेरची सभा दि. ११-१-४६ ला होऊन पक्का अहवाल मंजूर करण्यांत आला.

### ३. आभार

समितीच्या कामांत स्वतः लक्ष घालून श्रीमंत राजेसाहेब यांनीं समितीस जी मदत केली व जें उत्तेजन दिलें त्याचा अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें अवश्य आहे. मे. दिवाणसाहेब यांनीं समितीच्या बऱ्याच बैठकींस हजर राहून समितीस आपल्या दीर्घ अनुभवाचा फायदा दिला. तसेंच इतर प्रसंगींहि आपला सल्ला देऊन व निरनिराळ्या खात्यांतून समितीस आवश्यक ती माहिती पुरविण्याची तजवीज करून त्यांनीं समितीस उपकृत केलें आहे. संस्थानचे माजी शिक्षणमंत्री श्री. रा. हि. शहा यांनीं ते समितीचे सभासद होते तोंपर्यंत आपल्या ज्ञानाचा समितीस फायदा दिला. संस्थानांतील निरनिराळ्या खात्याचे प्रमुख अधिकारी व इतर नोकर यांनीं समितीच्या कार्यांत तत्परतेनें सहाय्य केलें. फलटण नगरपालिकेचे अध्यक्ष व फलटण लोकलबोर्डाचे अध्यक्ष, त्याचप्रमाणें श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजर, यांनीं वेळोवेळीं माहिती पुरवून व आपल्या सूचना पाठवून बरीच मदत केली. संस्थानांतील कांहीं नगरिकांनीं समितीपुढें साक्षी देऊन उपयुक्त सूचना केल्या. समितीतर्फे केलेल्या आर्थिक पाहणीचे कामांत मे. को-ऑपरेटिव्ह मामलेदार, प्राथमिक शिक्षणाधिकारी, अनेक प्राथमिक शिक्षक व पाहणी केलेल्या गांवांचे पाटील आणि कुलकर्णी यांची फार मदत झाली. समितीचे चिटणीस रा. ह. कृ. परांजपे यांजवर पाहणीचें काम सर्वस्वीं सोंपविण्यांत आलें होतें, तें त्यांनीं उत्तम रीतीनें पार पाडलें. तसेंच कार्यवाहाचें इतर सर्व काम त्यांनीं चोखपणें करून समितीच्या कार्यास फार मदत केली.

## संस्थानबद्दलची सामान्य माहिती

### ४. भौगोलिक

मुंबई इलाख्यांत सातारा जिल्ह्याचे ईशान्येस फलटण संस्थान वसलेलें आहे. संस्थानचें क्षेत्रफळ ३९७ चौरस मैल असून १७°४९′ ते १८°६′ उत्तर अक्षांश व ७४°९′ ते ७४°४३′ पूर्व रेखांश एवढी त्याची व्याप्ती आहे. उत्तरेस नीरा नदी, पूर्वेस सोलापूर जिल्ह्याची हद्द, दक्षिणेस व पश्चिमेस सातारा जिल्ह्याची हद्द, या संस्थानच्या सरहद्दी आहेत. संस्थानांतील मुलूख नीरा नदीच्या खोऱ्यांत लांबट चौकोनी आकाराचा ३२ मैल लांबीचा व १४ मैल रुंदीचा एकवट असा आहे. संस्थानच्या दक्षिण हद्दीवर टेंकड्यांच्या रांगा आहेत. नैर्ऋत्य भागांतील प्रदेश टेंकड्यांचा व उंच असून पूर्वेच्या बाजूस कांहीं मैल सारखा उतरत आला आहे. पुढें पूर्व सरहद्दीपर्यंत सारखा सखल असा प्रदेश आहे. पावसाचें सरासरी मान जून, जुलै व ऑगस्ट महिन्यांत सुमारें ७ इंच, सप्टेंबर महिन्यांत ५ इंच, ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत ४ इंच, आणि इतर महिन्यांत २ इंच असें वार्षिक सरासरी १८ इंचांचें आहे.

### ५. लोकसंख्या

संस्थानची एकूण लोकसंख्या ७१,४७३ (१९४१) असून त्यांत ३६,११४ पुरुष व ३५,३५९ बायका आहेत. दर चौरस मैलास १८० अशी लोकसंख्या आहे. यापैकीं ९,९२८ इतकी फलटण शहरची लोकसंख्या असून बाकीची लोकसंख्या ७२ खेडेगांवांतून पुढीलप्रमाणें विभागली आहे.

| लोकसंख्या | | | गांवें |
|---|---|---|---|
| १- १०० | ... | ... | ३ |
| १०१- ४०० | ... | ... | २१ |
| ४०१-१००० | ... | ... | २७ |
| १००१-२००० | ... | ... | १७ |
| २००० पेक्षां जास्त | | | ४ |

### ६. शेती

संस्थानांतील सर्वात महत्त्वाचा धंदा म्हणजे शेती होय. संस्थानांतील एकूण क्षेत्रफळ २,५४,०४३ एकर असून त्यापैकीं १,५०,८७५ एकर इतकी जमीन वहित आहे. यापैकीं विहिरी व जुनीं कचीं धरणें याखालीं भिजणारें क्षेत्र ९,४५० एकर आहे. निरा नदीचा उजव्या फांट्याचा कालवा संस्थानच्या उत्तर भागांतून (सुमारें ३२ मैल) जातो. त्या कालव्याखालील भागांत एकंदर जमीन ७८,००० एकर आहे. त्यापैकीं फक्त ५०,००० एकर, कालव्याचें पाणी मिळूं शकेल असे आहेत. १९४४-४५ सालीं १,२३,३८७ एकर जिराईत पिकांखालीं, ९,४५० एकर विहिरीखालील बागाइती पिकाखालीं, १८,०३८ एकर कालव्याचे पिकाखालीं अशी वांटणी आहे. संस्थानांत पिकवल्या जाणाऱ्या वहित क्षेत्राची वांटणी सोबतच्या आंकड्यांवरून कळून येईल.

| पीक | | एकर | पीक | | एकर |
|---|---|---|---|---|---|
| ज्वारी | ... | ...९९,४९० | तंबाकू | ... ... | १२ |
| बाजरी | ... | ...२५,६०५ | करडी | ... ... | ७,४२५ |
| साळ | ... | ... ७४५ | हुंडी | ... ... | ८७१ |
| खपली | ... | ... ३,०३५ | गवत | ... ... | ८२४ |
| हरभरा | ... | ... ३,५११ | तूर | ... ... | ५५४ |
| मका | ... | ... ५८ | मूग | ... ... | १८० |
| भुइमूग | ... | ... ८९५ | हुलगा | ... ... | २१० |
| ऊंस | ... | ... ४,०४० | लागण पड... | ... | ३,३०० |
| कापूस | ... | ... १२० | | | |

एकूण एकर... १,५०,८७५

### ७. उद्योगधंदे

संस्थानांत सर्वांत मोठा औद्योगिक धंदा म्हणजे फलटण शुगर वर्क्स, लि. चा साखर कारखाना हा होय. कंपनीचें अधिकृत भांडवल रु. १,००,००,००० इतकें असून त्यापैकीं वसूल झालेलें भांडवल रु. ४०,००,००० इतकें आहे. १९४२-४३ सालीं या कारखान्यांत १३,५७८·७५ टन इतकी साखर तयार झाली. भर हंगामाचे वेळीं कंपनीच्या कामगारांची संख्या १,१६० व इतर वेळीं ७२४ अशी होती ( १९४२-४३ ).

गूळ करण्याचा धंदा संस्थानांत मोठ्या प्रमाणावर चालतो. सुमारें १,३५,००० मण गूळ प्रतिवर्षी तयार होतो. संस्थानांत एकूण सहा खाजगी बागाईतदारांचे यांत्रिक चरक आहेत. विणकामाचा धंदाहि महत्त्वाचा आहे. कापडाचे ६९ व घोंगडयांचे ७८ असे १४७ हातमाग संस्थानांत आहेत. घोंगडयांचा धंदा दक्षिण भागांत विशेष चालतो. कापड विणण्याच्या अनुषंगानें रेशीम व कापसाचें सूत रंगवण्याचा धंदा थोडया प्रमाणावर चालतो. करडी, भुईमूग व जवस यांचें तेल काढणें हाहि एक प्रमुख धंदा आहे. संस्थानांत सुमारें ५० तेलाचे घाणे आहेत.

किशोरसिंह मोटर सर्व्हिस कंपनी ही संस्थानांतील वाहतूक करणारी संस्था आहे. फलटण हद्दींतील मोटर वाहतुकीचा मक्ता या कंपनीस देण्यांत आला आहे. पुणें-फलटण, लोणंद-फलटण, फलटण-नातेंपुतें या रस्त्यांवर कंपनी मोटर वाहतुक करते. कंपनीचे दर ठरवलेले असून वक्तशीर वाहतुक केली जाते. फलटण शहरास वीजपुरवठा करणारी किशोरसिंह इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी आहे.

## संस्थानच्या उन्नतीसाठीं आजपर्यंत केलेलें कार्य

संस्थानच्या सर्वांगीण वाढीसाठीं दरबारनें बरेच प्रयत्न केले आहेत हें पुढील माहितीवरून लक्षांत येईल.

### शेती

### ८. पाणीपुरवठा

निरा नदीचा उजव्या फांट्याचा कालवा संस्थानांतून जातो. याचा संस्थानच्या जवळजवळ ⅓ भागास फायदा होतो. शेतीसाठीं जास्तींत जास्त पाणी मिळवून देण्याचा दरबारनें प्रयत्न केला आहे. युद्ध सुरू होईपर्यंत कालव्याखालीं भिजणाऱ्या जमिनीचें क्षेत्रफळ कसें झपाट्यानें वाढत होतें तें पुढील आंकड्यांवरून लक्षांत येईल.

१९३०-३१–१०९९२ एकर, १९३५-३६–११०१४, १९४०-४१–२२७७८. संस्थानच्या नैर्ऋत्य भागांत पाण्याची शेतीकरतां व पिण्यासाठींदुद्धां

पंचाईत पडते. येथील विहिरींना पाण्याचा मुबलक व सतत पुरवठा होत राहावा या हेतूनें १९४२ पासून पाणीमुराईचीं धरणें (Percolation dams) बांधण्याचें धोरण आंखण्यांत आलें. त्याप्रमाणें बिबी, आळजापूर, निर्गुडी व आदर्की येथें अशीं धरणें बांधण्यांत आलीं आहेत.

## ९. *बीं-बियाणें*

१९३०-३१ पासून दरबारनें शेतकऱ्यांस शेतीच्या चांगल्या पद्धती शिकविण्यासाठीं एक नमुनेदार शेत चालविलें होतें. त्यांतून शेतकऱ्यांस चांगलें बीं-बियाणें दिलें जाई. १९३४-३५ मध्यें हें शेत फलटण शुगर वर्क्स कं. ला ऊंस, कापूस वगैरे पिकांबाबत प्रयोग करण्याचे अटीवर चालविण्यास दिलें. पुढें शेतकऱ्यांना जास्त चांगलें बीं देण्याची कायमची सोय व्हावी या दृष्टीनें १९३८ सालीं फलटण येथें कालव्याखालील ११ एकर जमीन माफक खंडानें देऊन बीं-बियाण्यासाठीं शेत (Seed farm) लावण्यांत आलें. तेव्हांपासून त्या शेताचा विस्तार वाढत गेला असून आतां तें ११० एकरांचें मोठें शेत झालें आहे. संस्थानच्या ग्रामसुधारणा अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं व लोकल-बोर्डाचे मदतीनें शेतकऱ्यांस माफक दरांत उत्तम जातीचें बीं देण्यांत येतें. सध्यां येथें पुढील बीं तयार करण्यांत येतात. (१) अकोला बाजरी, (२) कोपरगांव नं. ३ भुईमूग, (३) A. L. F. १०२७ सुरत कापूस, (४) मोहोळ ३५/१ ज्वारी, (५) पुसा ४१६५ गहूं, (६) ८१ व ४ निफाड गहूं, (७) १२० निफाड तूर.

## १०. *सहकारी शेती*

ग्रामसुधारणा अधिकारी यांचे नेतृत्वाखालीं पिंप्रद व जिंती येथें सहकारी शेतीचा प्रयोग करण्यांत आला आहे. दरबारनें बिनव्याजी कर्ज देऊन प्रयोगास मदत दिली.

## ११. *गुरांचा दवाखाना व जनावरांची पैदास*

लोकल बोर्डानें १९३१ पासून फलटण येथें गुरांचा दवाखाना चालवला आहे. सध्यां एक अनुभविक कम्पाउन्डर हा दवाखाना चालवतात. जनावरांची चांगली पैदास होण्याचे दृष्टीनें लोकल बोर्डानें १९३१ पासून बैल व रेडे वळू ठेवण्यास सुरवात केली. सध्यां एक बैल वळू ठेवला आहे.

## १२. *इतर मदत*

कालव्याखालील जमिनींत उंसाची लागवड बरीच होत असल्यानें गुळाचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. त्यास उत्तेजन देण्यासाठीं दरबारनें चार यांत्रिक चरक विकत घेऊन ते गोखळी, टाकळवाडें, जिंती व होळ येथें ठेवले होते. येथें शेतकऱ्यांना योग्य दरानें ऊंस पिळून व गाळून दिला जाई. आतां हे चरक

स्थानिक शेतकऱ्यांनीं विकत घेतले आहेत. युद्धकाळांत पेंड व इतर खतें मिळण्याची अतिशय अडचण होत असे, तेव्हां शेतकऱ्यांस योग्य दरांत व वेळचेवेळीं पेंड पुरविण्याचे दृष्टीनें दरबारनें पेंड विकत आणून शेतकऱ्यांस विकली.

## १३. सहकार

ब्रिटिश हिंदुस्थानांत या योजनेचा प्रसार चालू झाल्याबरोबर दरबारनें पुढाकार घेऊन संस्थानांत चळवळीचा फैलाव केला. येथेंहि सहकारी पतपेढ्यांचा प्रसार विशेष झालेला असून इतर कांहीं प्रकारच्या सहकारी संस्थाहि चालू आहेत.

| वर्ष | शेतकी पतपेढ्या | बिगर शेतकी पतपेढ्या | शेतकी इतर संस्था | बिगर शेतकी इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १९२०-२१ | ७ (शेतकी, बिगर शेतकी मिळून) | | ६ (शेतकी, बिगर शेतकी मिळून) | |
| १९३१-३२ | ४७ | ८ | २ | ४ |
| १९३५-३६ | ४६ | ९ | ३ | ३ |
| १९४०-४१ | ५२ | ९ | ४ | ३ |
| १९४४-४५ | ५४ | १० | ५ | ३ |

संस्थानचे सहकारी मामलेदार हे सर्व संस्थांच्या कामाकडे लक्ष पुरवतात. प्रत्येक संस्थेचे सरासरी सभासद ३९·९ आहेत. पतपेढ्यांचें एकूण खेळतें भांडवल रु. ३,६२,८१८ असून एकूण येणें ३,५०,३८७ आहे.

## १४. श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि., फलटण

ही बँक १९२६ सालीं स्थापन झाली. बँकेची व्यवस्था सहा संचालकांचे मंडळामार्फत चालवली जाते. या संचालक मंडळापैकीं २ सरकारनियुक्त, २ पतपेढ्यांचे प्रतिनिधी व २ वैयक्तिक भागीदारांचे प्रतिनिधी असे असतात. बँकेचें अधिकृत भांडवल रु. २,००,००० असून त्यापैकीं खपलेलें भांडवल रु. १,४५,२५० व वसूल झालेलें रु. ६१,१७० आहे. बँक सहकारी पेढ्यांस ६ टक्के व्याजानें व व्यक्तीस ९ टक्के व्याजानें कर्ज देते. असें दिलेलें कर्ज एकूण २,७९,६०९ रु. आहे. याशिवाय रु. १२,२९,९५८ इतके वेगवेगळ्या ठिकाणीं गुंतवलेले असून रोख शिल्लक ४,०४,०८३ इतकी आहे. एकूण खेळतें भांडवल रु. १९,०४,६८६ आहे. (सर्व आंकडे सन १९४४–४५ चे आहेत.)

## १५. उद्योगधंदे

संस्थानांत उद्योगधंदे वाढवण्याचे दृष्टीनें दरबारनें केलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे फलटण शुगर वर्क्स लि. या कंपनीला दिलेलें उत्तेजन ही होय. प्राप्तीकराची दहा वर्षांची माफी, पंधरा वर्षांची आयात व निर्यात जकातीची माफी, जमिनी मिळवून देण्यास मदत या सर्व बाजूंनीं दरबारनें कंपनी उभारण्यास उत्तेजन दिलें.

### १६. हातमाग

संस्थानांत हातमाग बरेच आहेत. त्या दृष्टीनें शिक्षण व प्रयोग म्हणून आदरकी येथें एक खादी केंद्र उघडण्यास दरबारनें महाराष्ट्र चरखा संघास रु. १०,०००ची मदत केली.

### १७. शिक्षण–प्राथमिक शिक्षण

फलटण संस्थानांत शिक्षणाच्या वाढीकडे प्रथमपासून काळजीपूर्वक लक्ष पुरवलें गेलें आहे. १९२०–२१ सालांत संस्थानांत ३५ प्राथमिक शाळा होत्या. आतां त्यांची संख्या ९४ आहे. संस्थानांत सर्वत्र मोफत प्राथमिक शिक्षण दिलें जातें. विशेषतः गेल्या दहा वर्षांत शाळांची संख्या व विद्यार्थ्यांची संख्या फारच झपाट्यानें वाढलेली आहे (१९३३-३४–५० शाळा, १६२७ विद्यार्थी; १९४३-४४–९४ शाळा, ५९७६ विद्यार्थी). आतां बहुतेक सर्व खेडेगांवांतून लहानमोठ्या शाळा असून, शाळा नसलेलीं अशीं फक्त ११ गांवें आहेत. व त्यांचेपासूनसुद्धां एक–दीड मैलाचे आंत शाळा आहेत. फलटण संस्थानांतली शिक्षणाची प्रगती लोकसंख्येशीं विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण दाखवणाऱ्या खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| | मुलें | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| फलटण ... ... | १३·०० | ३·७८ | ८·३६ |
| मुंबई प्रान्त ... ... | १०·२४ | ४·२७ | ७·३६ |
| म्हैसूर ... ... | ५·३९ | २·१० | ३·७९ |

संस्थानच्या शाळांपैकीं १२ शाळा सात इयत्तांपर्यंतच्या, ४ सहा इयत्तांपर्यंतच्या व १३ पांच इयत्तांपर्यंतच्या आहेत. बाकीच्या ६५ शाळा ४ इयत्तांपर्यंतच्या आहेत.

१९४१ पर्यंत प्राथमिक शिक्षणाचें काम नगरपालिका व लोकलबोर्ड यांचेतर्फे होत असे. १९४१ नंतर तें खातें सरकारनें आपणांकडे घेतलें. १९४१ पासून दरवर्षी कांहीं शिक्षक सातारा येथें शिक्षणासाठीं पाठविले जातात. १९४२ पासून प्राथमिक शाळांसाठीं नवीन इमारती बांधण्यास सुरुवात झाली असून आजपर्यंत सहा नवीन इमारती बांधून झाल्या आहेत.

प्रौढ शिक्षणासाठीं बरड येथें कांहीं वर्षें प्रौढशिक्षण शाळा चालविण्यांत येत होती. फलटण येथेंहि १९३९-४० मध्यें या दृष्टीनें कांहीं प्रयत्न करण्यांत आले.

### १८. दुय्यम शिक्षण

१८९५ मध्यें स्थापन झालेली मुधोजी हायस्कूल ही सरकारी संस्था फलटण येथें दुय्यम शिक्षण देण्याचें काम करते. १९३० पर्यंत साधारण २०० विद्यार्थी शाळेचा फायदा घेत. गेल्या पांच वर्षांत विद्यार्थ्यांची संख्या विशेष

प्रमाणांत वाढली आहे (१९३९-४०–३६६; १९४४-४५–७३७). दुय्यम शिक्षणाचा जास्त विद्यार्थ्यांनीं फायदा घ्यावा या दृष्टीनें प्रथमपासून शाळेची फी अतिशय माफक ठेवली आहे. शाळेंत हरिजन व मुली यांस मोफत शिक्षण दिलें जातें. याशिवाय शें. १५ इतक्या मुलांस नादाऱ्या दिल्या जातात. श्रीलक्ष्मी शिष्यवृत्त्यांमधून हुशार मुलांस मदत दिली जाते.

### १९. उच्च शिक्षण

उच्च शिक्षणास मदत म्हणून दरबारतर्फे मुधोजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठीं दोन शिष्यवृत्त्या देण्यांत येतात.

### २०. वैद्यकीय मदत व सार्वजनिक आरोग्य

संस्थानांत वैद्यकीय मदत ही दरबार व लोकलबोर्ड यांचेमार्फत दिली जाते. दरबारतर्फे चालवलेला दवाखाना हा १८८३ मध्यें उघडला गेला. तेव्हांपासून वैद्यकीय मदतीचें काम खूपच वाढत गेलें आहे. सरकारी दवाखान्यावर होणारा खर्च १९३१ मध्यें रु. ४२२३ होता तो आज रु. २०,५०० इतका वाढला आहे. १९२८ मध्यें फलटण येथें श्री सगुणामाता सूतिकागृह उघडण्यांत आलें. १९४३ पर्यंत दरबार, लोकलबोर्ड व नगरपालिका यांची या संस्थेस मदत होत असे. १९४४ पासून सदर सूतिकागृह दरबार स्वत: चालवीत आहे. त्यावर दरबार प्रतिवर्षी रु. ८,५०० खर्च करतें. आज तेथें १५ बाळंतिणींची सोय होऊं शकते.

लोकलबोर्डातर्फे फलटण, निंबळक व बिबी येथें दवाखाने चालवलेले आहेत. फलटणचा दवाखाना पाश्चात्य पद्धतीचा असून बाकीचे दोन दवाखाने आयुर्वेदिक आहेत. या तीन ठिकाणचे डॉक्टर एकूण १० खेडेगांवांस साप्ताहिक भेटी देतात. देवी टोंचण्याचें कामहि लोकलबोर्डातर्फेच केलें जातें. नगरपालिकेनें गांवचें आरोग्य सुधारण्याचे दृष्टीनें गांवांत २० सार्वजनिक संडास बांधले आहेत.

### २१. पाणी पुरवठा

फलटण शहरास पाणी पुरवठा निर्गुडी या गांवाजवळून आणलेल्या पाण्याचा होतो. उस्वासांतील पाणी एका पक्क्या दगडी नळांत आणून तें फलटण शहरांतील सांठ्यांत आणलें जातें. १८८८ मध्यें ही सोय करण्यांत आली. उस्वासांतील पाणी कमी पडल्यास पुरवठा तुटूं नये या दृष्टीनें एक विहीर खोदून त्यास पंप बसविण्यांत आला आहे. फलटणला पाणी सांठवण्याचा एक मोठा सांठा असून त्यांत २,६०,००० गॅलन पाणी मावतें. त्यांतून नळाचे द्वारें तें पाणी लोकांस मिळतें.

२७ खेडेगांवांस लोकलबोर्डाचे आड आहेत. नवीन विहिरी बांधण्यास व जुन्या दुरुस्त करण्यास दरवर्षी लोकलबोर्ड सरासरी रु. ३,६०० खर्च करीत आहे.

### २२. रस्ते व सार्वजनिक इमारती

संस्थानांत महत्त्वाचे रस्ते पुढील आहेत. (१) महाड-पंढरपूर रस्ता ३२ मैल. (२) जुना पुणें-सातारा रस्ता ७ मैल. (३) फलटण-आदरकी रस्ता १९ मैल. (४) फलटण-मोग्राळें रस्ता ११ मैल. (५) फलटण-शिंगणापूर रस्ता १५ मैल. (६) फलटण-सांगवी रस्ता ६ मैल. (७) साखरवाडी रस्ता ३॥ मैल. (८) साखरवाडी-सरतेवाडी रस्ता ५॥ मैल. महाड-पंढरपूर रस्ता सोडून इतर सर्व रस्त्यांची व्यवस्था लोकलबोर्डाकडे आहे. त्यांवर गेल्या चार वर्षांतील (१९३९-४० ते ४२-४३) दरसाल सरासरी खर्च रु. १७,००० आहे.

फलटण शहरामध्यें विमानतळ, कचेऱ्यांच्या इमारती, नवीन तुरुंगाची इमारत हीं महत्त्वाचीं सार्वजनिक बांधकामें दरबारनें केलीं आहेत.

### २३. सरकारी उत्पन्न व खर्च

दरबारनें फडणिशी खात्याच्या बाबतींत घेतलेली विशेष काळजी म्हणजे साखर जकातीच्या उत्पन्नाबाबत होय. १९३४–३५ सालापासून सुरू झालेलें हें उत्पन्न युद्ध सुरू होतांच एकदम दुपटीनें वाढलें (१९३९–४०: रु. ४,०३,१९३; १९४०–४१: रु. ८,४३,४४०). तेव्हां तें कायम स्वरूपाचें उत्पन्न नाहीं असें लक्षांत घेऊन दरबारनें त्यांतून विशिष्ट (बहुधा कायम स्वरूपाचा) खर्चच करण्याचें ठरवलें व शिवाय त्यांपैकीं निम्मी अधिक रक्कम दरवर्षी शिल्लक टाकून संस्थानच्या आर्थिक वाढीसाठीं मोठी गंगाजळी निर्माण करून ठेवली. ही शिल्लक साखर जकातीच्या उत्पन्नाच्या युद्धजन्य वाढीमुळें १९३८–३९ मधील रु. ५ लाखांवरून १९४४–४५ अखेर रु. २३ लाखांवर गेली आहे. त्याचप्रमाणें लोकहिताच्या कामांसाठीं शेतीसुधारणा निधि, उद्योगधंदे सुधारणा निधि, क्षयरोग निवारण निधि, खेडेगांवांतील आरोग्यसाधन निधि, उद्योगसंवर्धन निधि, देअर मॅजेस्टीज् सिल्व्हर ज्यूबिली फंड असे विशिष्ट निधि निर्माण करून ठेवले ही मोठी उल्लेखनीय गोष्ट आहे. देअर मॅजेस्टीज् सिल्व्हर ज्यूबिली फंडांतून सूतिकागृहास दरवर्षी रु. ५०० मदत देण्यांत येते. शेतीसुधारणा निधि १९३५–३६ सालापासून सुरू झाला. त्यांतून गेल्या तीन वर्षांत रु. ५२,००० बंधाऱ्यासाठीं खर्च झाले असून त्यांत आज रु. ६६,५४० शिल्लक आहेत. उद्योगधंदे सुधारणा निधि हा १९३५–३६ सालीं सुरू झाला. त्यांतून विणकऱ्यांस धंद्याची माहिती घेण्यास मदत म्हणून रु. ११५ व रु. ६,५०० आदर्की खादीकेंद्रास मदत असा खर्च होऊन रु. ९,३६७ शिल्लक आहेत. क्षयरोग निवारण निधींत १९४०–४१ पासून सुरवात होऊन त्यांतून ३७५ रुपये क्षयरोग निवारण औषधासाठीं खर्च पडले असून ४,७७१ रुपये शिल्लक आहेत. खेडेगांवांतील आरोग्यसाधन निधींत सुमारें १ लाख रुपये शिल्लक असून उद्योगसंवर्धन निधींत तितकेच शिल्लक आहेत. या शेवटच्या दोन निधींचा पुनर्घटना योजनेंत उत्तम उपयोग करून घेतां येईल.

२४. अशा तऱ्हेनें संस्थानची आर्थिक व इतर अंगांची वाढ करण्यासाठीं दरबारनें आजवर स्पृहणीय अशी कामगिरी केली आहे. शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य वगैरे सर्व बाबींत दरबारनें पुढाकार घेऊन संस्थानची उन्नति करण्याचा प्रयत्न केला आहे. दरबारच्या या प्रगतिप्रिय धोरणाला अनुसरूनच समितीनें विश्वासानें पुढील कार्ययोजना आंखल्या आहेत.

## समितीनें सुचविलेल्या योजना

### २५. *योजनांचें सर्वसाधारण स्वरूप*

आर्थिक योजनांचें सर्वसाधारण स्वरूप आतां सर्वांच्या चांगल्या परिचयाचें आहे. आर्थिक योजना कालमर्यादेशीं संलग्न असून प्रत्येक कालखंडाच्या अंतीं गांठावयाचें ध्येय योजनेंत निर्देशिलें असतें. योजनेचीं सर्वांगें सूत्रबद्ध असून त्यांतला एकेक भाग निराळा हातीं घेतां येत नाहीं किंवा एकादाच सोडून देतां येत नाहीं. योजनेंत दूरपर्यंत होणाऱ्या प्रगतीची जरी बहुशा आंखणी केलेली असली तरी सुरुवातीच्या कालमर्यादेपलीकडे योजनेच्या स्वरूपाची तितकीशी निश्चिती नसते. योजनेचें स्वरूप नाफेर नसतें व चांगली योजना नेहमीं स्वयंप्रत्ययनेय असून अनुभवानें त्यांत वारंवार जरूर तो बदल केला जातो. योजनेच्या प्रत्येक अवस्थेंत प्रत्येक अंगाची साधावयाची प्रगति ही मर्यादित प्रमाणबद्ध व त्या अवस्थेंत आवश्यक एवढीच आंखलेली असते. या नूतन नियोजनशास्त्राच्या सर्व-साधारण तत्त्वांप्रमाणेंच समितीनेंहि आपली योजना तयार केलेली आहे. गेल्या पंचवीस वर्षांत सर्वत्र अनुभवानें सिद्ध झालेली गोष्ट ही कीं आर्थिक योजनेचा भर विशेषतः उत्पादनक्षमता वाढविण्यावर असावा. जसजसें कोणत्याहि समाजाचें उत्पन्न वाढतें तसतसें वाढत्या उत्पन्नाबरोबर इतर अंगांचाहि विकास होऊन या विकासांतून उत्पादन आणखी वाढविण्यास मदत होते. तसेंच प्राथमिक (कच्च्या मालाचें) उत्पादन वाढलें म्हणजे त्यावर आधारलेल्या इतर पुढील अवस्थांतील उत्पादनाचें क्षेत्र वाढत्या प्रमाणांत वाढत जातें. या वृद्धीस चक्रवाढश्रेणीची वृद्धि म्हणतां येईल. अशा रीतीनें प्राथमिक उत्पादनाचा पाया सुरक्षित असला आणि त्याचें क्षेत्र वाढतें असलें म्हणजे एकंदरच आर्थिक व सामाजिक प्रगति ही आरंभींच्या अवस्थेंत कांहींशी मंद पण पुढें वाढत्या दरानें अशी वाढत जाते. या अनुभवानुसार आम्ही आपल्या योजनेच्या सुरुवातीचा भर प्राथमिक उत्पादनाची सुरक्षितता व वाढ यांजवरच दिला आहे. अर्थात् कांहीं अनुत्पादक असे वाटणारे खर्च उत्पादनास परिणामीं पोषक असतात. इतकेंच नव्हे तर प्राथमिक उत्पादनाची वाढ होण्यासहि अगदीं सुरुवातीच्या अवस्थेंत त्यांचें महत्त्व मोठें आहे. म्हणून प्राथमिक उत्पादन हा जरी आमच्या योजनेचा गाभा असला तरी त्याच्या सभोंवतालच्या आवश्यक आणि इष्ट अशा सर्व अंगोपांगांची योजनेंत तरतूद केलेली आहे.

## २६. शेतीसुधारणा

फलटण संस्थानांतील प्राथमिक उत्पादन जवळजवळ सर्वांशीं कृषि-उत्पादन आहे. येथील बहुसंख्य प्रजा शेतकऱ्यांची असून खनिज वगैरे धंदे संस्थानांत बिलकूल नाहींत. म्हणून आमच्या योजनेचा मुख्य भर शेतीचें उत्पन्न सालोसाल सुरक्षितपणें शेतकऱ्याच्या पदरांत कसें पडेल व त्याची वाढ क्रमाक्रमानें कशी करतां येईल यावर आहे. स्थूलमानानें संस्थानच्या शेतीच्या क्षेत्राचे दोन विभाग पाडतां येतात. निरा नदीच्या कालव्याचा उजवा फांटा संस्थानांत पूर्वपश्चिम जातो. कालव्याच्या उत्तरेकडील प्रदेशांत कालव्याचें पाणी साधारणपणें सर्वत्र उपलब्ध असल्यामुळें हा प्रदेश आतां दुष्काळी मुलुखां-तून वगळतां येतो. पाणी पुरवठ्याची सुरक्षितता व कांहीं अंशीं विपुलता हीं येथें प्राप्त झाल्यामुळें जास्त खर्चाची शेती, उंची पिकांची लागवड या गोष्टी येथें करतां येतात. या भागाची प्रगति शास्त्रीय ज्ञानाचा पूर्ण फायदा घेऊन व शेतकऱ्यांस हें ज्ञान आणि वाढतें भांडवल हीं मिळवून देऊन शेतीच्या उत्पन्नांत भर टाकण्यावर अवलंबून आहे. कालव्याच्या दक्षिणेकडील भाग मात्र अजून बहुतः दुष्काळी म्हणण्यासारखा आहे. सालोसालच्या हंगामांत शक्य तितकी सुरक्षितता आणणें हीच या भागाची प्राथमिक गरज आहे. याच भागांत एकंदर जमिनीस उतार बराच असल्यामुळें जमिनीची होणारी धुपण हीहि मोठ्या प्रमाणांत दृष्टीस पडते. सालोसाल जमिनीचा वरचा सकस थर वाहून जाणें आणि पाऊस अनिश्चित असणें यामुळें या भागांतील उत्पन्न वाढविणें आज अशक्य होत आहे. जमिनीच्या धुपणावर आजचा सर्वमान्य इलाज म्हणजे जमिनीची प्रमाणशीर बंदिस्ती करणें हाच होय. व्यक्तिशः प्रत्येक शेतकऱ्यानें आपापल्या शेतांत आपल्यापुरते ताली व बांध घालून हें काम भागत नाहीं. प्रत्येक शेता-पुरता असा निराळा विचार झाल्यास सर्व प्रदेशांतील सर्व जमिनीची धुपण थांबत नाहीं आणि प्रत्येक शेतकऱ्याचें शेत हें पाणलोटाचे दृष्टीनें स्वतत्र नसल्यामुळें, इतर शेतांतूनहि त्यांत पाणी सारखें येत असल्यामुळें, त्याची बंदिस्ती स्वतंत्रपणें सुरक्षित रीतीनें कधीं करतां येत नाहीं. डोंगरमाथ्यापासून नदीच्या पात्रापर्यंत सर्व उताराचा प्रदेश उताराच्या सम प्रमाणांत अखंड बांध घालून एकदम सगळा बंदिस्त करणें हा जमिनीची धुपण थांबविण्याचा खरा उपाय आहे. कालव्यापासून शिंगणापूरच्या डोंगरापर्यंतचा फलटण संस्थानांतील सर्व दक्षिणेचा भाग दुष्काळी समजण्यास हरकत नाहीं. हा सर्व प्रदेश प्रमाणशीर बंदिस्त करणें ही आमची या भागाबाबतच्या योजनेची पहिली व प्रमुख पायरी आहे. ही बांधणीची योजना हातीं घेतल्यामुळें मुख्यतः दोन गोष्टी साधल्या जातील. एक तर जमिनीची धुपण थांबली जाऊन नवीन मातीचा थर, अत्यल्प प्रमाणांत कां होईना, बसू लागण्यास मदत होईल. दुसरें म्हणजे पावसाचें पाणी शक्य तितकें पडलें तेथेंच मुरलें जाऊन शेतांतील ओलावा शक्य तितक्या जास्ती कालापर्यंत टिकून राहणें शक्य

होईल. अर्थात् फार मोठा पाऊस पडला असतां सर्वच पाणी जेथल्या तेथें मुरेल असें नाहीं. तेव्हां अशाकरितां बंदिस्त भागांतील पाणी आज आहे त्याच जलमार्गानुसार म्हणजे नाले, ओढे यांच्या वाटेनें नदीपर्यंत जाईल अशी सोय या जमीन बांधणीच्या योजनेंत केली पाहिजे. अशी सोय न केल्यास कांहीं वर्षांनीं तरी फार मोठा पाऊस आला असतां बांधांस धोका उत्पन्न होऊन एकादे वेळीं त्यांतील कांहीं बांधांच्या पायऱ्या पाटोपाट एकसमयावच्छेदेंकरून ढांसळतील अशी भीति आहे.

## २७. *कोरडवाहू भागांतील पाणीपुरवठा*

जमिनीची धुपण थांबविली आणि पाणी शक्य तेथें जागच्या जागींच मुरविलें म्हणजे या भागांतील कोरडवाहू शेती आजच्यापेक्षां पुष्कळच जास्त सुरक्षित होईल व क्रमाक्रमानें जमिनीची उत्पादनक्षमताहि वाढेल अशी आम्हांस खात्री वाटते. परंतु असें झालें तरी या सर्व भागांत अवर्षणामुळें कांहींच धोका राहणार नाहीं असें मात्र नाहीं. फलटण संस्थानांतील गेल्या ५० वर्षांतील पर्जन्यमापना-वरून असें दिसतें कीं साधारणतः ४/५ वर्षांत एकादे वर्षी येथें ८ इंचांहूनहि पाऊस कमी पडतो. अशा वर्षी जमीन बांधणी कितीहि चांगली झाली तरी बऱ्याचशा भागांतील पीक बुडणें अथवा अगदीं कमी होणें हें अपरिहार्य आहे. याकरितां सुरक्षित पाणीपुरवठा वाढवून केवळ पावसावर अवलंबून राहणें शक्य तितकें कमी करणें हेंहि आवश्यक आहे. कोरडवाहू शेतीचें उत्पन्न हमखास पाणी देतां येणाऱ्या विहीर, पाट, कालवा यांसारख्या साधनांनीं भिजणाऱ्या जमिनी-खालच्या उत्पन्नापेक्षां केव्हांहि कमीच राहणार. पावसावर अवलंबून असणारी शेती पूर्णांशानें सुरक्षित कधींच गणतां येत नाहीं. आणि नियमित वेळेस ठराविक प्रमाणांत पाणी देणें अशक्य असल्यामुळें उंची पिकांची लागवड तेथें करतां येत नाहीं. म्हणून कोरडवाहू भागांतील पाणीपुरवठ्याचीं साधनें वाढविल्यास किंवा तेथील आजच्या साधनांची कार्यक्षमता जास्त केल्यास या भागांत उत्पन्न पुष्कळच वाढण्याचा संभव आहे. या भागांतील कृत्रिम पाणीपुरवठ्याचें मुख्य साधन म्हणजे विहिरी. शक्य असेल तेथें आजहि शेतकरी बऱ्याच प्रमाणांत विहिरी काढीत असतात. या विहिरींचा पाणीपुरवठा पद्धतशीर रीतीनें वाढविणें शक्य आहे. भूपृष्ठावरून वाहणारे जलमार्ग आणि भूपृष्ठाखालीं असलेले जलमार्ग या दोहोंच्या ज्ञानानें व प्रमाणशीर वाढीनें विहिरीचा पाणीपुरवठा वाढण्यासारखा आहे. याकरितां नदीनाल्यांतील पाणी हें झपाट्यानें वाहत जाऊं न देतां टिकटिकाणीं शक्य तितका वेळ अडवून त्याचा वरच्यावर उपयोग करणें अगर त्यामुळें भूपृष्ठाखालील पाण्याच्या पुरवठ्यांत वाढ करणें हें मुख्यतः व्हावयास हवें.

२८. याकरितां तीन प्रकारच्या योजना हातीं घेणें शक्य आहे. एक तर नदीस अगर मोठ्या ओढ्यास बांध घालून पुष्कळसें पाणी वर्षभर अडवितां आल्यास

त्यांतून कालवा काढून त्याखालीं जमीन भिजविणें. दुसरें म्हणजे लहान लहान पक्कीं धरणें घालून त्यांतून पाट काढणें. आणि तिसरें म्हणजे योग्य अशा जागीं मातीचीं धरणें घालून त्यामुळें जमिनीखालील पाणीपुरवठ्याची वाढ करणें. या तिन्ही प्रकारांनीं कोरडवाहू भागांत पाण्याखालील भिजलेली जमीन वाढविण्याची शक्यता आहे. मोठ्या धरणाची एकच योजना, बाणगंगा नदीवरची, शक्य दिसत आहे. या योजनेचा कच्चा आराखडा आधींच तयार झालेला आहे. जास्त तपशीलवार पाहणी करून धरणास लागणारा खर्च व त्याखालीं भिजणारी जमीन यांचा अंदाज नक्की घेतला पाहिजे. हा अंदाज झाल्यावर एकंदर योजनेंतील धरणाचें स्थान ठरवितां येईल. पाणीमुराईच्या बांधांच्या तेरा जागा आज योजून ठेवलेल्या आहेत व जवळजवळ तीस ठिकाणीं ओढ्यानाल्यांस पक्के बांध घालून पाट काढतां येतील असें दिसतें. प्रत्येक बंधारा व पाट यांवरील खर्च व त्याचा उपयोग यांच्या अंदाजानुसार कामांचें व्यक्तिशः महत्त्व ठरवितां येईल. व असें झाल्यानंतर एकंदर योजनेंतील सर्वांचा हातीं घेण्याचा अनुक्रम ठरेल.

## २१. *जमीनबंदिस्तीच्या योजना*

कोरडवाहू भागांतील जमीनबंदिस्तीच्या व पाणीपुरवठ्याच्या योजना एकदम सुरवात करून एकहातीं अमलांत आणण्यासारख्या आहेत. कारण जमीन बंदिस्तीकरितां लागणाऱ्या तज्ञ व कसबी कामगारवर्गाचा वर्षाच्या कांहीं भागांत पाणीपुरवठ्याच्या योजनेकडे उपयोग करून घेतां येईल. ज्या दिवसांत शेतांत पिकें नाहींत त्या दिवसांतच जमीनबांधणीची योजना बहुतांशीं अंमलांत आणली पाहिजे. या योजनेंत सबंध प्रदेशाची पूर्ण उतारमोजणी करून अखंड बांधांच्या ओळींची दिशा प्रथम आंखून घेतली पाहिजे. व नंतर या ठरलेल्या ओळींस अनुसरून बांध प्रमाणित उंचीचे सामुदायिक रीतीनें घातले गेले पाहिजेत. हें काम अर्थात् एका वर्षांत होण्यासारखं नसून तें १०-१२ वर्षांत करावें लागेल. ही योजनापूर्ती दोन प्रकारें करतां येईल. अगदीं डोंगरमाथ्यापासून सुरवात करून एकेक भाग क्रमाक्रमानें नदीपर्यंत पुरा करीत आणणें, हा एक प्रकार. दुसरा म्हणजे सर्वच प्रदेश एकदम हातीं न घेतां अगर सभोंवतीच्या सर्वांच डोंगरमाथ्यापासून सुरवात न करतां सलग वहित जमिनींचे निरनिराळे प्रदेश बंदिस्तीच्या योजनेकरितां वेगवेगळे हातीं घेऊन नंतर अगदीं शेवटीं निरनिराळे भाग जोडून घेऊन योजना सर्व प्रदेशभर पुरी करणें. एका दृष्टीनें पाहतां पहिला मार्ग जास्त शास्त्रीय व पद्धतशीर वाटतो. परंतु या योजनेचें महत्त्व व उपयोग हीं शेतकऱ्यांस पटवून देण्याकरितां त्याचें दृश्यफल हें जेथें जास्त मोठ्या प्रमाणांत उत्कट दिसेल तेथें ही योजना प्रथम हातीं घेणें युक्त आहे. मात्र या पद्धतींत योजनांचे निरनिराळे प्रदेश हे सलग आणि पाणी वाहण्याच्या दृष्टीनें स्वतंत्र असे हवेत. जरी खोऱ्याचा सर्व प्रदेश तत्त्वतः एकाच पाणलोटीचा भाग असला तरी कांहीं वेळेस तींत स्वतंत्र उपविभाग पाडण्याची शक्यता असते,

एकंदर प्रदेशाच्या सर्वोच्च भागांत अगर इतरत्र कांहीं ठिकाणीं पाणलोटीच्या दुसऱ्या भागांतून आंत पाणी येत नसतें. त्यामुळें उपविभागाच्या बंदिस्तीची आंखणी स्वतंत्र रीतीनें करतां येऊन एकंदर सर्व प्रदेशाच्या आंखणीशीं सुसंगत असेंच तिचें स्वरूप राहतें. बाहेरून पाणी आल्यास अर्थात् कोणत्याहि क्षेत्राचें स्वतंत्र असें बांधणीचें काम होऊं शकत नाहीं. उपविभाग जोंवर या दृष्टीनें स्वतंत्र आहेत तोंवर मात्र त्यांची बांधणी वेगवेगळी करण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारें स्वतंत्र प्रदेशाची आंखणी करून क्रमाक्रमानें जमीनबांधणीची योजना पूर्ण करण्यांत यावी.

## ३०. वृक्षारोपण

कोरडवाहू भागांत अगदीं डोंगरावरील अगर डोंगरालगतच्या क्षेत्रांत जमीन बांधणी करूनहि शेतीस उपयोगी असें क्षेत्र तयार होणें शक्य नाहीं. त्या अर्थी येथें बंधाऱ्याऐवजीं चर खणणें हें नेहमीं जास्त युक्त ठरतें. अशा चरांचा उपयोग विशेषतः वृक्षारोपणासाठीं करितां येतो आणि डोंगराळ भागांत झाडांची वाढ झाल्यास जमिनीची धुपण थांबण्यास मदत होते. यानें पाण्याच्या जोराच्या प्रवाहास किंचित आळा बसेल; त्याबरोबरच सरपण आणि झाडांची योग्य निवड केल्यास कांहीं अंशीं जनावरांचा चारा याचाहि पुरवठा वाढेल. हें काम जमीन-बांधणीच्या कामापैकींच असलें तरी यास वेगळा खर्च करावा लागेल. वृक्षारोपण झालेल्या भागांत राखीव जंगलासारखे निर्बंध घालून झाडांची वाढ योग्य होऊं शकेल याबद्दल काळजी घ्यावी लागेल.

## ३१. पाणीमुराईचे बंधारे

ही योजना आंखण्यास व अंमलांत आणण्यास लागणाऱ्या तज्ज्ञ व वरील दर्जाच्या कामगार वर्गाची माहिती परिशिष्टांत दिली आहे. या नोकरवर्गाचा स्थूलमानानें वर्षांतील ६ महिने जमीन बांधणीच्या योजनेस उपयोग होऊं शकेल. इतर ६ महिने त्यांना पाणीपुरवठ्याचें काम हातीं घेतां येईल. या पाणीपुरवठ्याच्या तीन प्रकारच्या योजनेपैकीं मातीचे बंधारे कांहीं विशिष्ट स्थळीं बांधण्याची योजना ही प्रथम हातीं घेण्यांत यावी. या योजनेमुळें या बांधाखालच्या प्रदेशांतील अस्तित्वांत असलेल्या बहुतेक विहिरींचें पाणी वाढून नवीन विहिरीहि काढणें येथें शक्य होईल असें आम्हांस वाटतें. अशा प्रकारच्या योजना आजवर फार मोठ्या प्रमाणांत कोठेंच हातीं घेतलेल्या नाहींत. हा उपक्रम कांहींसा नवीनच असल्यामुळें त्याच्यामुळें पाणीपुरवठा किती जास्त सुरक्षित होतो व वाढतो हें अभ्यासणें जरूर आहे. कोणताहि कच्चा मातीचा बंधारा घालण्याचे आधीं त्याच्या खालील विशिष्ट प्रदेशांतील विहिरींचें पाणी किती विपुल आहे व किती काळ टिकतें याचें मापन करण्यांत यावें, व नंतर बंधारा घालून झाल्यावर दर वर्षी हें मापन चालू ठेवावें; आणि या भागांत ज्या नव्या विहिरी काढल्या जातील

त्यांबद्दलहि अशी माहिती गोळा करीत जावी. शास्त्रीय अभ्यासाचे दृष्टीनें या मापनाचा उपयोग होईलच, शिवाय नवीन जमीन पाण्याखालीं येऊन अगर जुन्या पाण्याखालील जमिनीचा पाणी देण्याचा काळ वाढून व्यक्तिशः कोणत्या क्षेत्रांचा असल्या कामामुळें फायदा झाला हेंहि निश्चित करतां येईल. व्यक्तिशः शेतकऱ्यांस होणाऱ्या फायद्याचें मापन झालें म्हणजे त्यांवर आकारावयाच्या पाणीपट्टीचें प्रमाण ठरविण्यास मदत होईल. असल्या कामाचा बोजा शक्य तितका पाणीपट्टीच्या उत्पन्नांतून भागवावा अशी आमची शिफारस आहे. योग्य पाणीपट्टी न आकारली तर हीं सर्व कामें हल्लींच्या दुष्काळनिवारणार्थ हातीं घेतलेल्या कामासारखींच मानावीं लागतील; आणि मग त्यांची वाढ याकरितां उपलब्ध असलेल्या निधीमुळें मर्यादित होईल. म्हणून कालवे, पाट, पाणीमुराईचे बंधारे यांमुळें पाण्याखालील क्षेत्र बऱ्याच प्रमाणांत वाढून विशिष्ट शेतकऱ्यांना पुष्कळ फायदा होतो असें दिसल्यास योग्य पाणीपट्टी आकारण्यास हरकत नसावी. जितक्या प्रमाणांत खर्च पट्टीच्या उत्पन्नांतून भागवितां येईल, तितक्या प्रमाणांत असल्या कामांची संख्या व व्याप्ति हीं वाढवितां येतील.

### ३२. धरणें

पाणीमुराईच्या बंधाऱ्यांमुळें होणारे फायदे आज कांहींसे अनिश्चित व आगाऊ मापन न करतां येण्यासारखे आहेत. बाणगंगेवरील धरण व इतर पाट काढण्याकरितां बांधावयाचीं पक्कीं धरणें यांचा प्रकार मात्र असा नाहीं. बाणगंगेवरील मोठ्या धरणाखालीं किती जमीन भिजवतां येईल हें योजना तपशिलांत तयार झाली म्हणजे ठरवितां येईल, आणि नंतर कालव्याखालच्या जमिनीहून कांहींसा कमी परंतु त्याच पद्धतीनें पाण्याचा आकार धरून धरणापासून येणारें उत्पन्न निश्चित होईल. विशिष्ट शेतकऱ्यांस असल्या योजनांमुळें विशेष महत्त्वाचा फायदा मिळणार आहे, आणि या लहानलहान योजना ठिकठिकाणीं बहुसंख्य हातीं घ्यावयाच्या म्हणून यांतून फायदा झालेल्या शेतकऱ्यांस योग्य ती पट्टी आकारण्याचें धोरण सुरुवातीपासूनच संस्थाननें ठरवावें असें आमचें मत निश्चित आहे. अर्थात् प्रत्येक निरनिराळ्या योजनेचें स्वरूप स्वयंपूर्ण असलें पाहिजे आणि प्रत्येक योजना सर्वांशीं त्यावर होणाऱ्या उत्पन्नांतून पुरी झाली पाहिजे असा आमचा कटाक्ष नाहीं.

### ३३. हप्तेबंदीनें वसूली

जमीन बंदिस्तीच्या योजनेचा खर्च असाच ज्यांच्या जमिनींची बांधणी झाली त्यांजकडून बऱ्याच प्रमाणांत वसूल होणें आवश्यक आहे. कालवा, धरण इत्यादींमुळें वर्षोवर्षी पाणीपुरवठा उपलब्ध होतो आणि त्यांचे खर्चाबाबत वार्षिक पाणीपट्टी आकारणें सोयीचें होतें. जमीन बांधणीचे सुपरिणाम बंदिस्तीनंतर पांच-सात वर्षांत पुरे स्पष्ट होतात, व यांत वार्षिक नवीन पुरवठ्याचा कांहींच

भाग नसतो. बांधणीचा खर्च हा उत्पादन घटकाचें स्वरूप- सुधारण्याकरितां केलेल्या मोठ्या भांडवली खर्चासारखा आहे; तेव्हां त्याची वसुली भांडवली खर्चाकरितां काढलेल्या कर्जासारखी हप्तेबंदीनें झाली पाहिजे. बांधणीमुळें होणारा जमिनीच्या किंमतींतील व उत्पादनांतील फरक हा बांधणी झाल्यानंतर चारपांच वर्षांनीं अगदीं स्पष्ट रीतीनें दिसूं लागेल असें आम्हांस वाटतें. फायदा असा दिसूं लागल्यामुळें बांधणीस लागलेल्या खर्चाची फेड हप्त्याहप्त्यानें करणें शेतकऱ्यांस जड जाणार नाहीं. प्रत्येक प्रदेशांतील बांधणीचा खर्च हा एका स्वतंत्र योजनेचा खर्च असा धरला जावा. या योजनेंत समावेश झालेल्या सर्व क्षेत्रास बांधणीचा सारख्या प्रमाणांत फायदा होईल असें नाहीं. स्थूलमानानें जास्त कसदार जमिनीची धुपण थांबल्यास तिला जास्त फायदा होईल. उलट आधींच फार धुपलेल्या माळजमिनीवर बंदिस्ती झाल्यावरहि नवीन मातीचा थर बनूं लागणें ही क्रिया फार मंद गतीनें होईल. किंबहुना आमचे मतें जमीन बांधणी पुरी झाल्यावरहि अशा निकृष्ट जमिनीची वारंवारची नांगरट थांबविणें हें आवश्यक आहे. याकरितां जमीन बांधणीच्या योजनेखालीं कांहीं निकृष्ट जमिनींत कित्येक वर्षें नांगर न धरतां त्यावर गवतच उगवूं द्यावें असा निर्बंध घालणें श्रेयस्कर ठरेल. एवंच, निरनिराळ्या जमिनींस बहुतांशीं त्यांच्या कसाप्रमाणें अगर मगदुराप्रमाणें जमीन बांधणीच्या योजनेचा फायदा होण्याचा संभव आहे. जमीन बांधणीवर आलेला खर्च योजनेंतील एकंदर क्षेत्रफळावर न्यायतः वांटण्यास प्रत्येक शेतकऱ्याचें योजनेंतील क्षेत्रफळ व त्याच्या क्षेत्राचा सरासरी मगदूर या दोन्ही गोष्टी विचारांत घेऊन निश्चित केलें पाहिजे. खर्चाच्या वांटणीचीं हीं सर्वसाधारण तत्त्वें मान्य झाल्यास प्रत्येक योजनेंत प्रत्येक शेतकऱ्यावर बसणाऱ्या प्रमाणशीर खर्चाचें आगाऊ वांटणीपत्रक तयार करतां येईल. आमचे मतें तज्ज्ञ अधिकारी व कामगारवर्ग यांस लागणारा सर्व योजनांवरील खर्च हा सरकारनें सोसावा. यापलीकडे प्रत्येक योजनेस लागणारा विशिष्ट खर्च हा त्या योजनेंतील शेतकरी वर्गास लांब मुदतीच्या दिलेल्या कर्जाप्रमाणें लेखावा. अर्थात् यावर व्याज कोणत्याहि प्रकारें आकारण्यांत येऊं नये. फक्त मुदलाची हप्तेबंदीनें वसुली व्हावी. हप्त्यांस सुरुवात बांधणीची योजना पुरी झाल्यावर पांचव्या वर्षी व्हावी. हप्ते एकंदर २० वर्षांवर विभागले जावे.. या हप्त्यांची वसुली वार्षिक जमीनमहसूल वसुलीबरोबर होऊन तहकुबीचे नियम महसुलाप्रमाणेंच यांसहि लागू करावे.

### २४. योजनेचा अंदाजी खर्च

या सर्व योजनेस तज्ज्ञ अधिकारी व कामगारवर्ग यांचा खर्च वगळून २२,४०,००० रुपये लागतील असा आमचा आजचा अंदाज आहे. हा खर्च ५ वर्षांनंतरच्या काळांत सम प्रमाणांत विभागला गेल्यास व त्याची हप्तेबंदी सम प्रमाणांत झाल्यास एकंदर २७ वर्षांत खर्च व वसुली यांचा मेळ कसा बसेल हे पुढील तक्त्यांत दाखविण्यांत आलें आहे.

| वर्ष | खात्यावर खर्च रु. | बांधणीचा खर्च रु. | त्या सालीं वसूल होणारी रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | १२,००० | २,२४,००० | ... |
| २ | १२,००० | २,२४,००० | ... |
| ३ | १२,००० | २,२४,००० | ... |
| ४ | १२,००० | २,२४,००० | ... |
| ५ | १२,००० | २,२४,००० | १६,००० |
| ६ | १२,००० | २,२४,००० | ३२,००० |
| ७ | १२,००० | २,२४,००० | ४८,००० |
| ८ | १२,००० | २,२४,००० | ६४,००० |
| ९ | १२,००० | २,२४,००० | ८०,००० |
| १० | १२,००० | २,२४,००० | ९६,००० |
| ११ | ... | ... | १,१२,००० |
| १२ | ... | ... | १,२८,००० |
| १३ | ... | ... | १,४४,००० |
| १४ | ... | ... | १,६०,००० |
| १५ | ... | ... | १,६०,००० |
| १६ | ... | ... | १,६०,००० |
| १७ | ... | ... | १,६०,००० |
| १८ | ... | ... | १,६०,००० |
| १९ | ... | ... | १,४४,००० |
| २० | ... | ... | १,२८,००० |
| २१ | ... | ... | १,१२,००० |
| २२ | ... | ... | ९६,००० |
| २३ | ... | ... | ८०,००० |
| २४ | ... | ... | ६४,००० |
| २५ | ... | ... | ४८,००० |
| २६ | ... | ... | ३२,००० |
| २७ | ... | ... | १६,००० |
| एकूण | १,२०,००० | २२,४०,००० | २२,४०,००० |

### ३५. *बांध दुरुस्ती*

आंखणी करून जमीन बांधणी ही जरी एकदांच व्हावयाची असली तरी बांधाच्या दुरुस्तीचें काम तदनंतर सालोसाल करावें लागणार. बांध नीट स्थितींत ठेवण्याची जबाबदारी ही प्रत्येक शेतकऱ्यावर व्यक्तिशः व गांवांवर सामुदायिक रीतीनें ठेवण्यांत आली पाहिजे. विशेषतः मोठे पाऊस झाल्यानंतर बांधांची पाहणी करणें व त्यांत जरूर ती दुरुस्ती करणें हें सामुदायिक रीतीनें

घडवून आणणें महत्त्वाचें आहे व याकरतां प्रत्येक गांवाची बांधपंचायत स्थापणें सोईस्कर होईल. अशा रीतीनें बांध दुरुस्तीबद्दल स्थानिक जबाबदारी मुख्यतः मानली तरी एकंदर दुरुस्ती खरोखर नीट होत आहे किंवा नाहीं हें तपासणें आणि विशेष जरूरी पडल्यास मोठ्या प्रमाणांत ती घडवून आणणें याकरितां संस्थाननें थोडा नोकरवर्ग कायम बाळगणें आवश्यक आहे. या नोकरवर्गाचें मुख्य काम दुरुस्तीबाबतची स्थानिक जबाबदारी शेतकरी व पंचायती कशा पार पाडीत आहेत हें पाहणें व आवश्यक प्रसंगीं त्यांस मदत करणें हें राहील. या नोकरवर्गाचा नेहमींचा खर्च संस्थाननें सोसावा.

### १६. दुर्जल शेती

कोरडवाहू भागांतील जमीन बांधणीच्या अनुषंगानें नवीन शास्त्रीय पद्धतीची कोरडवाहू शेती अवलंबिणें हें तितकेंच अवश्य आहे. सुधारलेल्या कोरडवाहू पद्धतींत निरनिराळ्या प्रकारच्या सुधारणा समाविष्ट होतात. नांगरट आणि कुळपणी यांचें ठराविक प्रमाण व काळ, नवीन प्रकारचीं बीं-बियाणें, विशिष्ट खताचा विशिष्ट उपयोग, बेवडाच्या ठराविक पद्धति, सुधारलेलीं कुळव, पाभर इत्यादि औतें, पाळ्या घालणें व जमीन पड टाकणें याबद्दलची विशिष्ट पद्धति हीं सर्व नवीन कोरडवाहू शेतींत येतात. या सगळ्या पद्धतींचा जितका जास्त प्रसार या भागांत होईल तितका जमीन बांधणीचा जास्त फायदा शेतकऱ्यांस मिळेल. याकरितां संस्थाननें करावयाच्या मुख्य गोष्टी सुधारलेलीं औतें व बियाणें यांचा पुरवठा उपलब्ध करून देणें आणि इतर नवीन पद्धतींचीं प्रात्यक्षिकें, पत्रकें इत्यादि द्वारां प्रचार करणें या आहेत. बियाण्यांच्या पुरवठ्याची योजना ही सर्वच भागाकरितां स्वतंत्र स्वयंपूर्ण आंखावी लागेल. प्रचार आणि प्रसाराच्या कामाकरितां शेतकी खात्याचा एक स्वतंत्र विभाग करून त्यांत यासाठींच योजलेल्या कामगार वर्गाची नेमणूक करावी लागेल. सुरवातीस या भागांतील पुढारलेल्या शेतकऱ्यांस सोलापूर, विजापूर जिल्ह्यांत जेथें नवीन पद्धतींचा प्रत्यक्ष अवलंब केला जातो तेथेंहि नेऊन आणण्यानें उपयोग होण्यासारखा आहे.

### १७. धरणांवरील खर्च

पाणीमुराईचे बंधारे वर सांगितल्याप्रमाणें एकंदर १३ ठिकाणीं बांधतां येतील असा आज अंदाज करण्यांत आला आहे. प्रत्येकीं सरासरी रुपये १०,००० या हिशेबानें यांवरील एकंदर खर्च १,३०,००० रुपये होईल. बाणगंगेवरील धरणाचा खर्च अंदाजें १,७०,००० रुपये होईल व पक्क्या ३० धरणांचा एकंदर खर्च रुपये ४,५०,००० व्हावा. या सर्व योजनांमुळें १२ ते १५ हजार एकर जमीन भिजून त्यांतील बरीचशी भाजी, फळें इत्यादि विशेष किफायतशीर पिकाचे लागवडींत आणतां येण्याचा संभव आहे. आम्ही वर दर्शविल्याप्रमाणें या नवीन पाणी

पुरवठ्याचा ज्यांस प्रत्यक्ष फायदा मिळतो त्यांजवर लहानशी पट्टी लादली असतां तिचें उत्पन्न सालिना रु. १८,००० पर्यंत होण्याचा संभव आहे.

### ३८. कालव्याखालील शेती

संस्थानांतील शेतीचा दुसरा मुख्य भाग म्हणजे कालव्याखालील शेती. येथें जमिनीची धुपण किंवा पाण्याचा पुरवठा हे मुद्दे महत्त्वाचे नाहींत. कालव्याखालील असलेल्या प्रदेशांत पाण्याच्या पुरवठ्यांतील क्षेत्रफळ शक्य तितकें कसें वाढवावयाचें व या पाणीपुरवठ्याचा जास्तींत जास्त उत्पादनाकडे कसा उपयोग करावयाचा हेच प्रश्न महत्त्वाचे आहेत. आजच्या पाणीवांटण्याच्या पद्धतींत प्रत्येक शेतकरी स्वतंत्रपणें आपल्यास हवें तें पीक करतो व मिळेल तसें पाणी घेतो. अशामुळें बऱ्याचशा जमिनींत पाणी हवें त्यापेक्षां जास्त घेतलें जातें आणि बिवडाची अंमलांत आणलेली पद्धत सर्वांत युक्त नसते. तसेंच निरनिराळ्या शेतकऱ्यांचीं भिजलेलीं शेतें हीं निरनिराळ्या ठिकाणीं असल्यामुळें सर्व चाऱ्यांतून पाणी दूरवर न्यावें लागतें. आणि त्यामुळें पाण्याचा वृथा नाश होतो. दर गांवांत भिजलेली जमीन जर सर्व एका क्षेत्रांत आणली गेली तर तिला पाणी देणें हें सोपें होईल इतकेंच नव्हे तर तेवढ्याच पाण्यांत आजच्या अलग अलग स्वतंत्र तुकड्यांपेक्षां पुष्कळच जास्त क्षेत्रफळ भिजवितां येईल. सर्व भिजलेली जमीन एका ठिकाणीं आणावयाची तर त्या सलग क्षेत्रांतील शेती व बिवड ही सर्व एकाच प्रकारची असली पाहिजे. असें झाल्यास हळूहळू सर्व पीक सामुदायिक रीतीनें घेतल्यानें जास्तच फायदा होण्याची शक्यता निर्माण होईल. नाशिक जिल्ह्यांतील बंधाऱ्याखालीं फड पद्धतींत अशी सलग पाण्याखालील क्षेत्र व सर्वसामान्य बिवड पद्धती हीं अमलांत आलेलीं आहेत. कालव्यावरील पाणीवांटप हें जर सर्व संस्थानच्या हद्दीपुरतें संस्थानच्या हातीं येऊं शकलें तर ह्या फड पद्धतीचा अवलंब करण्यास शक्य तितकें शेतकऱ्यांस वळवून ती सार्वत्रिक जारी करावी. यामुळें पाण्याखालील क्षेत्रफळ वाढणें, फाजील पाणी दिल्यामुळें जमिनीची होणारी नासाडी थांबणें व सुधारलेल्या पद्धतींचा, पिकांचा, बियाणांचा प्रसार होणें या सर्व गोष्टी साधतां येतील.

### ३९. दूधदुभत्याचा धंदा

आज कालव्याखालील भिजलेल्या जमिनींत सर्वांत किफायतशीर पीक उंसाचें ठरलेलें आहे. युद्धकालांत गुळाचे भाव विशेष वाढल्यामुळें उंसाखालील क्षेत्राची कमालीची वाढ झालेली आहे. ह्या गुळाचे उत्पन्नांत होणारा फायदा दीर्घकाल टिकेल असें वाटत नाहीं. इतर दृष्टीनेंहि उंसाच्या पिकाखालील क्षेत्र फार मोठें राहणें हें श्रेयस्कर नाहीं. तेव्हां या प्रदेशांतील उंसाच्या खालोखाल इतर किफायतशीर शेतीच्या पद्धतीचा विचार करणें आवश्यक आहे. सर्व दृष्टीनें पाहतां या प्रदेशांत दूधदुभत्याच्या धंद्याचा शक्य तितका जास्त फैलाव होणें इष्ट

आहे असें आम्हांस वाटतें. जमिनीचा कस टिकणें, शेतकऱ्याचें प्रत्यक्ष पोषण होणें आणि सर्वसाधारणपणें फारसा चढउतार न होतां उत्पन्न टिकून राहणें या सर्व गोष्टी दूधदुभत्याचा धंदा या भागांत प्रस्थापित झाला असतां साधतां येतील. दूधदुभत्याचा धंदा म्हणजे मुख्यतः म्हशीचें पालन. आज म्हशी या भागांत बहुतांशीं परप्रान्तांतून आणाव्या लागतात; येथें कोठेंच उच्च दर्जाच्या म्हशीची पैदास होत नाहीं. महाराष्ट्राचा बहुतेक भागच म्हशीच्या आयातीवर अवलंबून असून म्हशीच्या पैदाशीचा स्थानिक धंदा बसूं शकल्यास संस्थानासच नव्हे तर इतर बाजूच्या जिल्ह्यांसहि त्यामुळें उपयोग होण्यासारखा आहे. आज परिस्थिति अनुकूल असूनहि म्हशी फार कमी प्रमाणांत पाळल्या जातात, आणि दुधाचा धंदा शेतकरी जवळजवळ करीतच नाहींत हें परिशिष्टांत दिलेल्या माहितीवरून दिसून येईल. या धंद्याची पायाशुद्ध स्थापना चांगल्या जातींच्या म्हशींचा कळप स्थापून झाली पाहिजे. हें प्राथमिक काम प्रत्यक्ष सरकारनें हातीं घ्यावें. परप्रान्तांतून बऱ्याचशा म्हशी सुरवातीस आणून त्यांतील कमी दुधाच्या हळूहळू निवडून काढून उत्तम दूध देणाऱ्या आणि वाढत्या चांगल्या दर्जाच्या अशा म्हशींच्या पैदाशीची व्यवस्था करावयास पाहिजे. अशी पैदास एकदां होऊं लागली म्हणजे तिचा प्रसार संस्थानभर करून दूधदुभत्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर व संघटित पद्धतीनें चाललेला असा अस्तित्वांत आणतां येईल.

### ४०. *सरकारी दुग्धालय*

म्हशींची पैदास करण्याचें प्राथमिक काम सरकारनेंच हातीं घेतलें म्हणजे अल्प प्रमाणांत त्याच्या अनुषंगानें दुधाचा धंदा चालविणेंहि प्राप्त होईल. तेव्हां या म्हशीच्या पैदाशीच्या धंद्यास जोडून एक आदर्श दुग्धालय अगर दुग्धशाला सरकारला चालवून दाखवितां येईल. एकदोन वर्षांनंतर म्हशींची व दुधाची पैदास यावर चालू बुडीत खर्च कांहीं न होतां त्यांतून थोडासा फायदाच होऊं शकेल. परंतु सुरवात करण्यास लागणारें मूळचें भांडवल सरकारनें आपणच धंद्यांत घातलें पाहिजे. या भांडवलाच्या फेडीची अपेक्षा न करतां त्यांतून होणारा फायदा निदान सुरवातीचीं कांहीं वर्षें धंद्यांतच जिरवून धंद्याचें प्रमाण व कार्यक्षमता हीं वाढविण्याकडे त्याचा उपयोग करावा. उत्तम दुभत्या जनावरांचा पुरवठा होऊं लागल्यावरहि तीं शेतकरी आपोआप घेईल असें मानून चालणार नाहीं. सुरवातीस तरी याबद्दल प्रचार करावा लागेल. फड पद्धतीचा अवलंब व दुभत्याच्या धंद्याची संघटना यांची सांगड घालून सरकारनें कांहीं सवलती देऊन दुहेरी प्रसार करण्यास मदत करावी. सहकारी रीतीनें खरेदीविक्रीची व्यवस्था करणें आणि खवा, चक्का, लोणी इत्यादि धंद्याकरितां दूध एकवटणें या सर्व गोष्टी मुद्दाम नेमलेल्या तज्ञांकरवीं करून घ्याव्या लागतील. सरकारी दुग्धशालेच्या मुख्य अधिकाऱ्याचे हाताखालीं कांहीं कामगार देऊन हें काम करावें लागेल. दुभत्या

जनावरांच्या पैदाशीप्रमाणें निदान कांहीं ठिकाणीं तरी बैलांची पैदास करणें किफायतशीर ठरेल. बैलांची संस्थानांतील पैदास सुधरविण्याकरितां गीर अगर खिल्लार जातीची निवड करण्यांत यावी. गीर जातीची पैदास आपल्याकडे प्रस्थापित होऊं शकल्यास उपयुक्त बैलांबरोबरच दुभत्या गाईहि उपलब्ध होऊन खेडेगांवांतील दुधाचा पुरवठा बऱ्याच प्रमाणांत वाढूं शकेल.

## ४१. पशुवैद्यक खात्याची वाढ

दुधाचा धंदा अगर उत्तम बैलांची जोपासना या दोहोंसाठीं तज्ञ पशुवैद्य उपलब्ध असणें हें फार आवश्यक आहे. आज संस्थानांत लोकलबोर्डानें चालविलेला एक लहान पशुवैद्यक दवाखाना एवढाच आहे. ही वैद्यकीय मदत आजहि अपुरी असून धंद्याची वाढ झाल्यास फारच कमी ठरेल. तेव्हां फलटण येथें एक मोठा दवाखाना काढून येथून तज्ज्ञ फिरत्या पशुवैद्यांची सोय करण्यांत यावी. याबरोबरच आज फलटणास असलेल्या दवाखान्याइतपत लहानसा एकादा दवाखाना पूर्व अगर पश्चिम भागांत आणखी एका ठिकाणीं काढण्यांत यावा. संस्थानांत पूर्व भागांत धनगरांचा मेंढ्यांचा व लोंकरीचा धंदा मोठ्या प्रमाणांत अस्तित्वांत आहे. या धंद्याच्या वाढीस हा भाग अनुरूप आहे. येथील मेंढयांची पैदास सुधारणें हें आवश्यक असल्यामुळें बरड येथें बाहेरून उत्तम जातीचे मेंढे आणून लहान सुधारलेल्या मेंढयांचा कळप तयार करून त्यांचा प्रसार करण्याचें केंद्र उघडण्यांत यावें. या केंद्राच्या अनुषंगानें पशुवैद्याची आपोआप सोय करतां येईल व तसें झाल्यास या भागांतील धनगरांस या बाबतींत जरूर ती मदत मिळूं शकेल.

## ४२. फलसंवर्धन

कालव्याखालील भागांत दुसरी विशेष उत्तेजनार्ह बाब म्हणजे फलसंवर्धन. संस्थानच्या पूर्वेकडील कोपऱ्यांत कांहीं भाग असा आहे कीं जेथें उंचावरील हलक्या जमिनींत नदींतील पाणी पंपानें चढवून फळांची लागवड विशेष चांगल्या रीतीनें होऊं शकेल. या भागांत सर्व प्रकारच्या फळांची लागवड करण्यास उत्तेजन देणें आवश्यक आहे. इतरत्रहि कांहीं ठिकाणीं हलक्या जमिनींवर फळांची लागवड केल्यास इतर पिकांपेक्षां तें जास्त किफायतशीर होणें संभवनीय आहे. कोरडवाहू भागांतील विहिरीच्या शेतींतहि बऱ्याच ठिकाणीं फळबागा करतां येतील. या सर्व कामाकरितां एका कामगाराची निवड करून फळबागवाल्यास कलमें करणें, बागांची जोपासना व निगा राखणें इत्यादि माहिती पुरविण्यास ठेवावें. तसेंच फलटण येथें शेतीशाळेच्या बरोबरीनें फलसंवर्धनाचे लहान मुदतीचे शिक्षणक्रम देण्यांत यावे. श्रीमंत राजेसाहेबांनीं आपल्या खासगी बागेंत निरनिराळ्या प्रकारचे प्रयोग आधींच सुरू केले आहेत. त्यांचा अनुभव जमेस धरून फळांची वाढ व आधुनिक संवर्धन पद्धति यांचा प्रसार शक्य तोंवर करणें हें शेतकी खात्याचें एक महत्त्वाचें काम असावें.

### ४३. नवीन शेतीपद्धति

कालव्याखालील जमिनींत शाळूचें उत्पन्नहि कांहीं नवीन पद्धति स्वीकारल्यास बरेंच वाढण्याजोगें आहे. उदाहरणार्थ, हरळी व कुंदा हीं काढण्याचा विशेष प्रयत्न करणें, नांगरट व कुळव हीं पद्धतशीर रीतीनें करणें, खत नवीन पद्धतीनें तयार करून तें वेळेवर जमिनीस देणें असें केल्यास जोंधळ्याची पैदास एकंदर बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढेल. कोरडवाहू भागांत त्यास अनुरूप अशी शेतीपद्धति प्रसृत करण्याबद्दल जो अधिकारी व कामगारवर्ग नेमण्यांत येईल त्यांजकडूनच अशा तऱ्हेचें कालव्याखालील भागांतील काम होऊं शकेल.

### ४४. यांत्रिक मशागत

जमीन बांधणी सार्वत्रिक झाली म्हणजे नवीन पद्धतीनें नांगरट नीट होणें हें विशेष महत्त्वाचें आहे. पण कोरडवाहू भागांत नांगरटीकरितां नेहमीं लागणाऱ्या गुरांचा पुरवठा आजहि विशेष समाधानकारक नाहीं. तसेंच ज्या शेतकऱ्यांची विहिरी अगर पाटाखालील जमीन फार थोडी आहे त्यांस वर्षभर गुरांस व्यवस्थित काम देतां येत नाहीं व त्यांनीं राखलेल्या गुरांमुळें एकंदर चाऱ्याच्या पुरवठ्यावर वृथा ताण पडतो. याकरितां यांत्रिक शक्तीनें नांगरट व कुळव या गोष्टी होऊं शकल्यास अनेक दृष्टीनें फायदा होईल. यांत्रिक नांगर आणि इतर औतें किंमती असल्यामुळें तीं व्यक्तिशः शेतकरी घेऊं शकणार नाहीं. तेव्हां असे कांहीं नांगर सरकारनें विकत घेऊन शेतकऱ्यांस कामाकरितां भाड्यानें द्यावेत. या पद्धतीचा उपयोग शेतकऱ्यांस समजूं लागल्यावर यांत्रिक सामुग्रीचा चालू खर्च तसेंच त्यांतील भांडवलावर व्याज हीं दोन्ही भाड्याच्या उत्पन्नांतून भागूं शकतील. यांत्रिक नांगराचा जितका जास्त प्रसार होईल तितकी गुरांची अनवश्यक संख्या कमी होऊन गुरांची पैदास सुधारणें व दुभत्या जनावरांस चाऱ्याचा वाढता पुरवठा होणें या दोन्ही गोष्टी घडून येतील.

### ४५. सुधारलेलें बीं-बियाणें

शेतकी सुधारणेंतील सर्वच भागांतील एक प्रमुख बाब बीं-बियाणें व रोपें यांची प्रत व दर्जा सुधारणें ही होय. उत्कृष्ट दर्जाच्या आणि निरनिराळ्या तऱ्हेच्या बियांचा पुरवठा शेतकऱ्यास केल्यास इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां पिकाची पैदास व शेतकऱ्याचें उत्पन्न अधिक वाढवितां येतील. उत्तम बीं तयार करून तें पसरविणें ही बाब विशेष महत्त्वाची असल्यामुळें तीं सरकारनें प्रत्यक्ष आपल्या हातीं घेतली पाहिजे. हल्लीं लोकलबोर्डाच्या ताब्यांत या कामास असलेलें शेत सरकारनें आपल्या व्यवस्थेखालीं घेऊन आणखी मोठ्या प्रमाणांत हें काम चालू करावें. बाहेरून आलेल्या बियांची प्रथम येथें निपज करून परीक्षा घेतली जावी आणि येथें तयार झालेलें बीं शुद्ध करून व वाढवून शेतकऱ्यांस गटागटानें वाटलें

जावें. निरनिराळ्या गटांत विवक्षित पुढारलेल्या शेतकऱ्यांकडून या बियांचा ठरलेल्या पद्धतीनें क्रमशः वाढावा करून हें सर्व पसरविण्याचा प्रयत्न व्हावा.

### ४६. *जमिनींचें केंद्रीकरण*

येणेंप्रमाणें शेतीचें उत्पन्न वाढविण्याकरितां या भागांत करतां येण्याजोग्या मुख्य गोष्टी आहेत. शेतीची हल्लींची उत्पादन घटकांची व्यवस्था बदलणें हा एक उपाय शेतीचें उत्पन्न वाढविण्यास सांगितला जातो. हा उपाय अमलांत आणण्यास अर्थात् कालावधी लागतो. कारण शेतकऱ्यांचीं मनें वळविणें व त्यांची अनुमति मिळविणें या गोष्टी पुनर्व्यवस्था करण्याचे आधीं झाल्या पाहिजेत. कालव्याखालील भागांत वर दर्शविल्याप्रमाणें फड पद्धतीचा अवलंब केल्यास बऱ्याच अंशीं सामुदायिक शेती अमलांत आणल्यासारखें होईल. कोरडवाहू भागांत यांत्रिक साधनांचा उपयोग फैलावल्यास सामुदायिक अगर सहकारी शेतीचा प्रसार होण्याचा संभव आहे. जमीन बांधणीचे वेळेस या दृष्टीनें हातीं घेतां येण्याजोगें एक कार्य महत्त्वाचें आहे. प्रत्येक शेतकऱ्याची एकंदर वहित जमीन गांवाच्या निरनिराळ्या भागांत अनेक तुकड्यांत पसरलेली असते. त्याऐवजीं ती शक्यतोंवर एका किंवा अगदीं थोड्या विभागांत केंद्रित होणें हें सर्वांसच फायदेशीर आहे. अशा रीतीनें जमीन एकवटण्याचे प्रयत्न पंजाब व मध्यप्रान्तांत झाले आहेत. पंजाबांतील प्रयत्न तेथील विशिष्ट परिस्थित्यनुसार कांहींसे सहज रीतीनें घडून येण्यासारखे होते. मध्यप्रान्तांत ठराविक प्रमाणांत जमीनमालकांची संमति मिळाल्यास हें वहित जमिनीचें केंद्रीकरण गांवांत सक्तीनें घडवून आणणें कायद्यानें करतां येतें. अशा प्रकारचा कायदा संस्थानांत केल्यास आणि या कल्पनेचा प्रचार जमीन बांधणीच्या कामाचे आधीं केल्यास अनेक तुकड्यांत जमीन विभागल्याचे आजचे गैरफायदे बव्हंशीं टाळतां येतील. जमिनीच्या प्रमाणशीर बांधणीमुळें शेतांचें जुनें स्वरूप बरेंच बदलण्याचा संभव आहे. या वेळेसच शेत जमिनीच्या अदलाबदली करून केंद्रीकरणाचें कार्यहि सुलभतेनें होऊं शकेल.

### ४७. *कृषि योजना अधिकारी*

आम्ही वर सुचविलेल्या योजनांकरितां विशिष्ट अधिकारी व कामगारवर्ग नेमावा लागेल. जमीन बांधणी व कोरडवाहू भागांतील पाणीपुरवठा या दोहोंमिळून यांचा एक स्वतंत्र संच लागेल. म्हशींची पैदास व दुग्धशाळा, पशुवैद्यकाचे दोन दवाखाने, मेंढ्यांच्या पैदाशीचें बरड येथील केंद्र आणि फलटण येथील बीं-बियाणाचें शेत यांसहि विशिष्ट अधिकारी व कामगारवर्गाची जरूरी लागेल. याशिवाय नवीन पद्धतीच्या शेतीचा कोरडवाहू भागांत प्रचार करणें, फलसंवर्धन, फडपद्धति इत्यादींची कालव्याखालील भागांत स्थापना करणें यांस फिरता कामगारवर्ग लागेल. या सर्व उद्योगांत एकसूत्रता यावी आणि सर्व प्रकारचे दुहेरी खर्च टाळले जावे, तसेंच निरनिराळ्या योजना एकमेकांस पोषक ठराव्या म्हणून शेतकी खात्याचा

म्हणून एक प्रमुख अधिकारी नेमून त्याच्या नियंत्रणाखालीं या चालाव्या. आम्ही सुचविलेल्या सर्व योजना या अधिकाऱ्यानें तपशीलवार निश्चित करून त्या तडीस नेण्याकरितां सर्व प्रकारचे उपाय अमलांत आणावे.

## ४८. कर्जनिवारण

जमीनबंदिस्ती, पाणी पुरवठा, नवीन सुधारलेल्या शेतीच्या पद्धतीचा स्वीकार इत्यादि सर्व गोष्टी शेतकरी निष्कर्जी झाल्याखेरीज चटकन होणें शक्य नाहीं. शेतकऱ्याचें जुनें कर्ज त्यास सहज झेपेल एवढेंच राहून नित्य व्यवसाय व नैमित्तिक व्यवहारांत लागणाऱ्या नवीन पैशाचा पुरवठा त्यास अल्प व्याजाचे दरांत झाल्यास शेतीच्या पैदाशीच्या अभिवृद्धीस फारच मदत होईल. शेतकऱ्यास अगदीं पूर्णपणें निष्कर्जी नाहीं तरी अल्पकर्जी करणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. याकरितां सर्व जुन्या कर्जाची पाहणी करून तें शेतकऱ्यास झेपेल इतकें कमी करण्याबाबत जगभर गेल्या पंधरावीस वर्षांत निरनिराळ्या उपाययोजना केल्या गेल्या आहेत. या सर्व उपाययोजनांचा नवीन कर्जाची नीट तरतूद झाल्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं. जुन्या कर्जातून मुक्त होऊन परत त्याच सावकाराकडे जाण्याचा प्रसंग येणें यांत शेतकऱ्याचा फायदा न होतां वेळेस तोटाच होतो. तेव्हां सार्वत्रिक कर्जव्यवहार करणारी एखादी नवीन संस्था अस्तित्वांत येणें हें कर्जमुक्तता योजनेनंतर आवश्यक असतें. सुदैवानें फलटण संस्थानच्या जवळजवळ प्रत्येक गांवांत हल्लीं सहकारी पतपेढ्या अस्तित्वांत आहेत. या सहकारी पतपेढ्यांमार्फत होत असलेला व्यवहार आज फारसा मोटा नाहीं व त्यांची सभासद संख्याहि आज सर्वव्यापी नाहीं. केवळ जमिनीचे तारणावरच कर्ज देण्याच्या नियमाचा या पेढ्या आज कडक रीतीनें अंमल करतात. त्यांचा व्याजाचा दरहि आज कोठेंच ९ टक्केहून कमी नाहीं. पतपेढ्यांच्या हल्लींच्या व्यवहार पद्धतींत थोडासा फरक करून व्याजाचा दर उतरविल्यास त्यांस खेडेगांवांतील शेतकरी व बिगर शेतकरी या सर्वांस लागणाऱ्या सर्व प्रकारच्या पैशाच्या गरजा भागवितां येतील. कांहीं मोठे शेतकरी सहकारी पतपेढ्यांत सभासद होऊं इच्छित नसल्यास त्यांस फलटण बँकेमार्फत प्रत्यक्ष कर्जहि देतां येईल. आमच्या मतें या बाबींत शक्य तितक्या लवकर पुढील प्रयत्न करण्यांत यावेत. आज नसतील तेथें सहकारी पतपेढ्या स्थापून सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांची संख्या वाढविणें, केवळ जमिनीच्या तारणाऐवजीं जामिनावरहि पैसे देण्याचा प्रघात पाडणें आणि व्याजाचा दर किमान ६। टक्केपर्यंत खालीं आणणें. याच वेळेस कर्जमुक्ततेचा कायदा व सावकार नियंत्रण कायदा हे दोन्ही पास करण्यांत यावेत. या कायद्यांबाबतची योजना नुकत्याच हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या शेतकीकर्ज समितीच्या अहवालांत दिलेल्या योजनेनुसार असावी.

## ४९. सहकारी बँक

हा एकंदर व्यवहार सुव्यवस्थित करण्याची बरीच मोठी जबाबदारी आमच्या योजनेंत लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेवर पडणार आहे. आज बँकेचा बराचसा पैसा जवळजवळ बिनव्याजी पडून आहे. त्यास शेतकी व्यवहारांत पेढ्यांमार्फत अगर प्रत्यक्ष वाव मिळाल्यास बँकेचें उत्पन्न बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढेल. असें झालें म्हणजे बँकेस आपले दर पुष्कळ कमी करतां येतील आणि ६। टक्केपर्यंत प्रत्यक्ष शेतकऱ्यास कर्ज मिळणें शक्य होईल. आमच्या योजनेनुसार सहकारी पतपेढी व बँक या दोहोंसहि सर्व प्रकारचे व्यवहार करतां यावेत आणि त्यांनीं शेतकी आर्थिक व्यवहाराचें सर्व क्षेत्र व्यापावें. हे व्यवहार करतांना शक्य तितकें सुरक्षित व्हावें म्हणून बरेच निर्बंधात्मक नियम पतपेढ्यांच्या पंचसमितीकरितां बारकाव्यानें करावे लागतील. आणि सहकारी खातें व बँक या दोहोंसहि पतपेढयांच्या व्यवहारावर बरीच देखरेख ठेवावी लागेल. विशेषतः शेतकऱ्याच्या सर्वच गरजा भागवा-वयाच्या म्हटल्या तर शेतकऱ्याची एकंदर कर्जफेडीची शक्ति ही तपशीलवार अजमावणें आणि ज्या कार्याकरितां कर्ज मागितलें जातें त्याकडे त्याचा विनियोग होतो याबद्दल दक्षता बाळगणें हीं कामें महत्त्वाचीं आहेत.

## ५०. सहकारी पतपेढ्या

हल्लीं संस्थानांत पतपेढ्यांचे कार्यवाह एकंदर १२ असून सरासरीनें प्रत्येक कार्यवाह पांच पेढ्यांचा कारभार पाहतो. पेढयांचा कारभार वाढल्यावर एका इसमास दोहोंहून अधिक पतपेढयांचा व्यवहार करणें शक्य होणार नाहीं. आज पेढयांच्या कार्यवाहांची नोकरीबाबतची परिस्थिति ही कांहींशी अनिश्चित आहे. या सर्वांस प्राथमिक शिक्षकांप्रमाणेंच सरकारी नोकर समजण्यांत येऊन त्यांच्या पगाराचें मानहि निश्चित करण्यांत यावें. आजच्याप्रमाणें त्यांस सरकारनें पेढयांचे दिमतीस देऊन आजच्याप्रमाणें त्यांच्या पगाराबाबत पेढयांच्या भांडव-लाच्या मानानें आकारणी करण्यांत यावी. सरकारी कार्यवाहांची हल्लींची १२ ची संख्या हळूहळू ३० पर्यंत वाढवीत न्यावी. ही संख्या अशी वाढेपावेतों जेथें शक्य असेल तेथें एकाद्या शिक्षकास आपल्या गांवांतील पेढीचें काम पहावयास सांगून तेथील भर पगारी कार्यवाहांचें काम कमी करण्याचा प्रयत्न व्हावा. अशा प्रकारें काम केलेल्या व शिकलेल्या शिक्षकांनूनच नवीन कार्यवाहांची भरती करणें उपयुक्त ठरेल. परंतु त्यांस कायम करण्यापूर्वी बाहेरून विशेष शिक्षण देऊन आणून किंवा फलटणास त्याकरितां निराळा वर्ग काढून त्यांस जास्त माहितगार बनवावें. या कार्यवाहांच्या वाढलेल्या संख्येमुळें पेढयांचा व्यवहार वाढल्यानंतर सरकारास कांहीं निराळा खर्च पडेल असें वाटत नाहीं. परंतु पेढयांच्या व्यवहारा-वरील देखरेखींत विशेष दक्षता बाळगणें आवश्यक आहे. आजचे सहकारी मामलेदार व त्यांचे दुय्यम यांस सोसायट्यांचे हिशेब तपासणें यापलीकडे

देखरेखीचें असें विशेष काम करणें शक्य नाहीं. तेव्हां आमच्या योजनेंतील पतपेढ्यांच्या वाढत्या व्यवहारावर देखरेख करण्यास दोन अगदीं स्वतंत्र अधिकारी सहकारी खात्यांत नेमण्यांत यावेत. शिवाय आर्थिक व्यवहारावर बँकेची थोडी-बहुत देखरेख राहीलच. या अधिकाऱ्यांनीं तपशीलवार देखरेख करून शिवाय नवीन सोसायट्या स्थापणें आणि अस्तित्वांत असलेल्यांच्या व्यवहाराचें क्षेत्र वाढविणें याकडे विशेष लक्ष द्यावें.

### ५१. *सहकारी विक्रीमंडळ*

संस्थानांतील एकंदर शेतीचें स्वरूप लक्षांत घेतां इतर प्रकारच्या सहकारी मंडळास येथें विशेष वाव नाहीं. फलटण येथें गूळ व कपास बाजाराची स्थापना झाल्यास एकादें सहकारी विक्रीमंडळ येथें काढतां येईल. इतरत्र विक्रीमंडळाची फारशी गरज दिसत नाहीं, अथवा ती उपयुक्त ठरण्याचा विशेष संभव नाहीं. शेतकऱ्यांस लागणाऱ्या विशिष्ट मालपुरवठ्याचें काम सभासदांची आगाऊ मागणी नोंदून घेऊन पतपेढीसहि करतां येण्याजोगें आहे. पतपेढ्यांचा या प्रकारचा व्यवहार वाढण्याची बरीच शक्यता आहे. केवळ मालपुरवठ्यासाठीं निराळीं मंडळें काढण्याची जरूरी नाहीं. विक्रीमंडळाच्या अभावीं कर्जवसुलीचें काम विशेष जिकिरीचें व धोक्याचें होण्याचा संभव असतो; संस्थानांतील बरेंचसें मौल्यवान पीक विक्रीस बाहेरच्या बारामती वगैरे ठिकाणीं गेल्यास वसुलीबाबत विशेषच काळजी घ्यावी लागेल. दूधदुभतें, फळलागवड वगैरे नवीन धंदे येथेंच स्थापल्यास त्याच्या विक्रीबाबत सहकारी पद्धतीनें व्यवस्था होऊं शकेल आणि मग विक्रीमंडळा-मार्फत कर्जवसुली आपोआप करतां येऊन आज सर्वमान्य झालेल्या पद्धतीप्रमाणें उत्पादन, कर्ज, विक्री व वसुली यांची सांगड घालतां येईल.

### ५२. *बँकेवर सरकारी नियंत्रण*

शेतीबाबतच्या आमच्या योजनेनें बँकेस विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. तसेंच या योजनेप्रमाणें चालू ठेवींच्या पैशांचा कांहीं भाग शेती व्यवहारांत प्रसंगीं घालावा लागेल. असें झाल्यास बँकेस वेळ पडल्यास छोट्या मुदतीचें कर्ज देण्याची जबाबदारी कदाचित् संस्थानास उचलावी लागेल. संस्थानचा शिल्की पैसा आजहि बँकेकडे असतो. ही पद्धत चालू ठेवून शिवाय एकंदर ठेवींच्या सुरक्षिततेची हमी संस्थानास घ्यावयास हवी. बँकेचें वाढतें व्यवहारक्षेत्र व संस्थानची त्याबद्दलची जबाबदारी यांकडे पाहतां बँकेवर संस्थानचें थोडेंसें अधिक नियंत्रण असणें अपरिहार्य आहे. संस्थाननें बँकेचे कांहीं भाग आजच विकत घेतलेले आहेत. याचें प्रमाण ५१ टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत यावें. ही वाढ आवश्यक तेवढी रक्कम नवीन भांडवलरूपानें वाढवून तें सर्व भांडवल संस्थाननें भरून करण्यांत यावी. बँकेचें सर्व नियामक मंडळ संस्थाननें नेमलेलें असावें अशी आमची योजना नाहीं. केवळ वेळ लागल्यास संस्थानच्या धोरणानुसार

आणि एकंदर योजनांस पोषक असा बँकेचा कारभार राहतो हें पाहण्यापुरतें सरकारी प्रतिनिधींचें बहुमत नियामक मंडळावर असावें. बाकी व्यवहार हल्लीं-प्रमाणें होत राहण्यास हरकत नाहीं.

### ५३. *लांब मुदतीचीं कर्जें*

विशेषतः कोरडवाहू भागांत नवीन विहिरी पाडणें हें फार महत्त्वाचें आहे हें वर दर्शविलें आहे. याकरितां सरकारनें एक निराळा यांत्रिक संच व त्यावर आवश्यक कामगार नेहमीं ठेवून शेतकऱ्यांस विहिरीबाबत मोफत सल्ला देणें व त्यास ठराविक दरांत विहिरी लागल्यास खणून देणें हीं कामें करावींत. विहिरी बांधण्यास बराच खर्च लागतो आणि हा शेतकऱ्यांस बहुतेक कर्ज काढून उभारावा लागतो. विहिरींस लागणारें कर्ज लांब मुदतीचें असतें. या कर्जावर व्याजाचा दर माफक असल्याशिवाय कर्जफेड करणें कठीण होतें. याकरितां विहिरी व इतर विशिष्ट शेतकी सुधारणेचीं कामें याजला ४ टक्केपर्यंत व्याजानें बँकेमार्फत कर्ज देण्याची व्यवस्था करण्यांत यावी. यांत गुंतविली जाणारी रक्कम फार मोठी असणार नाहीं आणि बहुतांशीं हा व्यवहार करण्यांत बँकेला विशेष खोट येणार नाहीं.

५४. सर्व प्रकारच्या शेती व्यवहारास मदत करण्याकरितां बँकेस लहान, मध्यम व लांब या सर्व मुदतींचीं कर्जें देण्याची व्यवस्था करावी लागेल. हल्लींच्या मॉर्टगेज़ (जमीन गहाण) बँकेचा व्यवहार समाधानकारक नाहीं. तेव्हां ही संस्था बंद करून बँकेंतच लांब मुदतीच्या कर्जाकरितां एक स्वतंत्र विभाग असावा. या विभागांतील व्यवहाराचा एक भाग म्हणूनच विहिरी व इतर शेत सुधारणेच्या कामीं विशिष्ट सवलतीच्या दरानें वर दर्शविल्याप्रमाणें कर्जें देण्यांत यावीं. अशा कर्जांचे एकंदर व्यवहार फार वाढल्यास व त्यामुळें बँकेस विशेष तोशीस लागते असें वाटल्यास याबाबत सरकारनें कांहीं रक्कम व्याजाच्या सुटीच्या भरपाईदाखल बँकेला देण्यास हरकत नाहीं.

### ५५. *नवीन कायदे*

या शेतकी योजनेबाबत जे कांहीं नवीन कायदे करावे लागतील त्यापैकीं कांहींचा उल्लेख आधीं आलेलाच आहे. शेतजमिनीचें केंद्रीकरण, सावकार नियंत्रण कायदा, जुन्या शेती कर्जाबाबतचा कायदा, इत्यादींचा उल्लेख वर आला आहे. जमीन बंदिस्ती घडवून आणणें व ती कायम राखणें या बाबतहि दोन कायदे करावे लागतील. मुंबई प्रान्तांतील १९४२ च्या कायद्याच्या पद्धतीचा एक शेतजमीनसंरक्षण कायदा, तसेंच बंधारे दुरुस्त राखण्याबद्दलचा एक कायदा हे दोन्ही करणें आवश्यक आहे. फार निकस जमीन सारखी नांगरून अधिक खराब होऊं नये किंवा विशिष्ट भागांत विशेषतः कालव्याखालील शेतींत विशिष्ट पिकांचीच विशिष्ट वेळीं लागवड व्हावी याकरितां जमिनीच्या उपयोगाच्या निय-

ग्रणाचा असा एक कायदाहि करावा लागेल. या कायद्याअन्वयें विशिष्ट टापूंत विशिष्ट पद्धतीनुसार जमिनीचा उपयोग व्हावा असे सरकारी हुकूम जारी करतां येतील. तसेंच पाणी पुरवठ्याच्या योजनांमुळें ज्यांस फायदा होतो त्यांवर पट्टी लादण्याचा अधिकार सरकारास हल्लींच्या महसूल नियमांत नसल्यास तोहि कायद्या-अन्वयें घ्यावा लागेल. पाटाखालील पाण्याचा उपयोग न करणाऱ्यास तो करावयास लावणें अगर केला नसला तरी त्यास पट्टीस पात्र करणें या गोष्टी वरील दोन्ही कायद्याच्या योगें करतां येतील. जनावरांच्या पैदाशीचा दर्जा वाढविणें व चांगली पैदास वंशपरंपरा कायम राखणें या गोष्टी करण्यास ठराविक वळू सोडून बाकीच्या जनावरांस सक्तीनें खच्ची करण्याचे अधिकार सरकारनें आपल्याकडे कायद्याअन्वयें घेतले पाहिजेत. या कायद्याच्या क्षेत्रांत प्रसंगानुसार, बैलांखेरीज रेडे, मेंढे इत्यादीहि आणतां येतील.

५६. संस्थानांतील कांहीं भागांतील माल विक्रीसाठीं बारामती व संस्थानच्या बाहेरच्या इतर गांवीं जातो. संस्थानांतील बाजाराचें मुख्य गांव म्हणजे फलटण. येथें बाजाराची जागा व वखारी बांधण्याची योजना आहेच. या बाजाराचें नीट नियंत्रण व्हावें म्हणून एक नियंत्रक समिति नेमावी लागेल. तसेंच सर्व ठिकाणच्या, अडत्या दलालांच्या व्यवहाराचें नियंत्रण करणें याकरितां शेतकी माल नियंत्रण कायदा निरनिराळ्या ठिकाणीं आहे, त्या प्रकारचा येथेंहि करून घ्यावा लागेल.

## ५७. उद्योगधंदे

येथवर शेतीच्या प्राथमिक उत्पादनाचा विचार करण्यांत आला. याखेरीज दुसरा महत्त्वाचा उत्पादनाचा प्रकार म्हणजे उद्योगधंद्याचा होय. संस्थानांत मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक कारखाना साखरवाडी येथें एक साखरेचा आहे. या साखरेच्या कारखान्याच्या वाढीमुळें संस्थानचें उत्पन्न मोठ्या प्रमाणांत वाढलें असून संस्थानच्या शेतकरी व बिगर शेतकरी वर्गास मजुरी मिळविण्याची एक सोयहि झाली आहे. दुसरा मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक कारखाना निघण्याची आज तरी सहज शक्यता दिसत नाहीं. साखरवाडीचा कारखानाच वाढल्यास किंवा तेथें हल्लींच्या उत्पादनास जोड म्हणून इतर कारखाने काढले गेल्यास याचाहि प्रत्यक्ष अप्रत्यक्ष फायदा संस्थानास व येथील प्रजेस होईल. या कारखान्याची वाढ होणें हें अर्थात् कारखान्याच्या मालकांच्या इच्छा व योजना यांवर अवलंबून आहे. नवीन यंत्रसामुग्री चांगली मिळूं लागल्यानंतर हल्लींचा कारखाना बदलून त्याऐवजीं १००० टनी नवीन संच आणविण्याचा कारखाना मालकांचा मानस आहे. असें झाल्यास कारखान्यांतील उत्पादनाचें प्रमाण वाढून एकंदर उत्पादन कमी खर्चाचेंहि होईल. तसेंच कारखान्याच्या जोडीस एखादा अल्कोहोल तयार करण्याचा कारखाना काढावा असाहि विचार दिसतो. परंतु या सर्व गोष्टी पुढील निरनिराळ्या प्रकारच्या परिस्थितीवर अवलंबून असल्यामुळें त्यांजबद्दल

आज कांहींच निश्चित सांगतां येत नाहीं. कारखान्याबाबतची संस्थानची दुसरी जबाबदारी म्हणजे त्यांतील मजुरांच्या परिस्थितीची देखरेख ही होय. साखर कारखान्यांतील मजुराबाबत नेहमींची अडचणीची बाब हंगामांत मजुरांची राहण्याची व्यवस्था. इतर कारखान्यांप्रमाणें साखरवाडीचीहि परिस्थिति याबाबत पूर्णपणें समाधानकारक नाहीं. कारखाना-मालकांनीं ठराविक वर्षांत मजुरांच्या राहण्याची कायम सोय बऱ्याच अंशीं करण्याची एक योजना तयार केली आहे. गेलीं कांहीं वर्षें इमारतीस लागणारी सामुग्री न मिळाल्यामुळें त्यांस ही योजना पार पाडतां आली नाहीं. आतां सामुग्री मिळावयास लागल्याबरोबर योजनेप्रमाणें थोड्या वर्षांत याबाबत परिस्थिति सुधारली जाईल यांकडे अधिकाऱ्यांनीं लक्ष ठेवणें जरूर आहे. हिंदुस्थान सरकारनें वेळोवेळीं मजूर संरक्षणाबाबत केलेले कायदे संस्थानांत लागू केलेले आहेतच. याचप्रमाणें यापुढें ज्या कांहीं नवीन योजना वेतन-संरक्षण, आरोग्यविमा, पगारी रजा इत्यादिबाबत हिंदुस्थान सरकार किंवा मुंबई सरकार प्रत्यक्ष घडवून आणील त्यांची शक्यतोंवर आणि शक्य तितक्या त्वरेनें अंमलबजावणी संस्थानांतहि केली जावी अशी आमची शिफारस आहे. हल्लीं अंमलांत असलेले व पुढें येणारे निर्बंध हे बरोबर पाळले जातात किंवा नाहीं हें पाहणें, तसेंच मजुरांच्या एकंदर सोयी, हित व गाऱ्हाणीं यांकडे लक्ष पुरवणें हें एका विशिष्ट अधिकाऱ्याकडे सोंपविणें जरूर आहे.

## ५८. *ग्रामीण उद्योगधंदे*

बिनयांत्रिक उद्योगधंद्यांत नेहमींच्या खेडेगांवांतील धंद्यांचा समावेश होतो. गूळ करणें हा उंसाच्या शेतीच्या अनुषंगानें करावयाचा धंदा या संस्थानांत बराच महत्त्वाचा आहे. गूळ चांगला करतां येणें, त्याची प्रतवारी नीट लावून तो व्यवस्थित रीतीनें बाजारांत पाठविणें या गोष्टी करण्यास संस्थाननें मदत केली पाहिजे. याकरतां फलटणास शेतकी हायस्कूलच्या जोडीस इतर छोट्या शिक्षणक्रमाप्रमाणें एक गुळव्यांचा शिक्षणक्रमहि स्थापावा. प्रतवारीची व्यवहार्य योजना तयार करतां आल्यास संस्थानच्या अधिकाऱ्यांमार्फत संस्थानांतून बाहेर जाणाऱ्या गुळाची प्रतवारी लावून विशिष्ट नांवांनीं व शिक्क्यांनीं युक्त असा माल बाहेर पाठविण्याची योजना करतां आल्यास पाहावें.

५९. संस्थानांतील इतर धंदे म्हणजे लोंकर व सुताचे माग, कांतडें कमावणें, तेल काढणें, दोर वळणें इत्यादि आहेत. लोंकरीच्या मागाचा विशिष्ट धंदा येथील पूर्व भागांत असून त्यांत बरीच व्यवस्थेशीर प्रगति करणें शक्य आहे. लोंकरीची पैदास जास्त विपुल व चांगली करणें याबाबतची योजना शेतकी विभागांत निर्देशिलेली आहे. लोंकरीचें सूत काढणें व लोंकरी कापड विणणें हें तज्ज्ञांकडून दाखवण्याकरतां एक लहानसें शिक्षणकेंद्र बरड येथें काढण्यांत यावें. लोंकर चांगल्या दर्जाची मिळूं लागल्यास उच्च तऱ्हेचें कापड काढणें किंवा लष्करी

कांबळ्या वगैरे विणणें याचें पद्धतशीर शिक्षण या केंद्रांत दिलें जावें. बरड येथें लोंकर-विणकरांची एक लहान सहकारी मंडळी आज अस्तित्वांत आहे. या मंडळीस उत्तेजन देऊन तिच्यामार्फत सुधारलेली पद्धति आणि माल यांचा प्रसार करणें हेंहि या केंद्राधिकाऱ्यांनीं करावें.

६०. खुद्द फलटण येथें जुन्या पद्धतीच्या तेलाचे घाणे बरेच आहेत. यांत कांहीं नवीन सुचविण्यांत आलेल्या सुधारणा करतां आल्यास त्यांचें काम जास्त काटकसरीचें होऊं शकेल. त्याचप्रमाणें तेलाची प्रतवारी अधिकृतरीत्या लावण्यांत आल्यास धंद्याची बाहेरची मागणी वाढवितां येईल.

## ६१. *औद्योगिक अधिकारी*

इतर नेहमींच्या खेडेगांवांतील उद्योगधंद्यांबाबत विशेष कांहीं सांगतां येण्यासारखें नाहीं. या सर्वांकडे लक्ष देणें व त्यांस तज्ञ मदत जेवढी शक्य असेल तेवढी करणें याकरितां संस्थाननें एक औद्योगिक अधिकारी नेमावा. लहान यांत्रिक व बिनयांत्रिक उद्योगांची तज्ञ माहिती असलेला हा अधिकारी असावा. याचें मुख्य काम लहान प्रमाणावरील संस्थानांतील धंद्यांची पाहाणी करणें आणि त्यांस आपली कार्यपद्धति, कच्च्या मालाचा पुरवठा, पक्क्या मालाचे उत्पादनाचे प्रकार आणि खरेदी, उत्पादन, विक्री याबाबतची व्यवस्था हीं सर्व सुधारण्यास मदत करणें हीं असावीत. सर्वच उद्योगधंद्यास एका अधिकाऱ्यास पूर्णपणें मदत करतां येणार नाहीं किंवा सर्व प्रकारच्या धंद्यांतील कारागिरांच्या शिक्षणाची सोय संस्थानांत करणें शक्य नाहीं. तेव्हां ठिकठिकाणच्या धंद्यांची प्रगति होण्याकरितां सर्व प्रमुख केंद्रांतील प्रत्यक्ष काम करणाऱ्यांपैकीं विशेष शिकाऊ असतील अशा कांहींची निवड करून संस्थानाबाहेर प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी विशिष्ट धंद्याचें शिक्षण मिळेल अशा ठिकाणीं शिकण्याकरितां संस्थाननें सर्व खर्च सोसून पाठवावें. अशा शिकाऊ कारागिरांवर फक्त एकच अट लावण्यांत यावी.—शिक्षण घेऊन परत आल्यावर आपल्या धंद्यांत आपल्याच केंद्रांत किमान कांहीं वर्षें काम करीत राहणें व शिकून आलेल्या ज्ञानाचा फायदा केंद्रांतील इतर कारागिरांस देणें. एवढ्याच अटीवर त्यांस पाठविण्यांत यावें. नवीन औद्योगिक अधिकाऱ्याकडेच यांत्रिक कारखान्यांतील व इतर औद्योगिक मजुरांच्या हितसंरक्षणाचें काम सोपविण्यांत यावें.

## ६२. *विजेचा पुरवठा*

संस्थानांत आज विजेचा पुरवठा अल्प प्रमाणांत फक्त फलटण येथें आहे. नवीन पद्धतीच्या लहान यांत्रिक धंद्याची वाढ स्वस्त वीज पुरवठ्याचा मार्ग संस्थानांतून गेल्यास विचारांत घेण्याजोगी आहे. आज हा मार्ग संस्थानांतून जाईल अशी शक्यता वाटत नसल्यामुळें त्याबद्दल कांहीं लिहिण्याची जरुरी नाहीं.

## ६३. प्राथमिक शिक्षण

शेतकी व उद्योगधंदे यांची वाढ झाल्यास संस्थानचें एकंदर उत्पन्न खचित वाढेल. आणि प्राथमिक आर्थिक उत्पादनाचा व व्यवहाराचा विस्तार हाच संस्थानच्या सर्वांगीण विकासाचा खरा पाया होय. परंतु संस्थानांतील प्रजेस उत्पादनक्षम करणें आणि वाढत्या संपत्तीचा योग्य फायदा मिळवून देणें याकरितां इतरहि गोष्टी आधींच साधल्या पाहिजेत. यांतील विशेष म्हणजे शिक्षण व आरोग्य यांची वाढ हीं होत. केवळ लिहितांवाचतां आल्यामुळें मनुष्य कार्यक्षम अगर सुसंस्कृत होतो असें नाहीं. परंतु त्याची कार्यक्षमता वाढविण्यास अगर त्यास चांगला नागरिक बनविण्यास शिक्षणाचा प्राथमिक अवस्थेंत तरी फार उपयोग होतो हें निश्चित. यामुळेंच प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करणें ही राष्ट्रविकासांतील प्रमुख बाब म्हणून सर्वमान्य झालेली आहे. कोणत्याहि महत्त्वाच्या योजनेंत सक्तीच्या मोफत शिक्षणाचा समावेश झाला पाहिजे हें निर्विवाद आहे. हें जितकें खरें तितकेंच ही योजना फाजील मोठी न बनवितां ती शक्य तितकी कमी खर्चाची ठेवणें हेंहि व्यवहार्यतेच्या दृष्टीनें आवश्यक आहे. आणि म्हणून आज अमलांत असलेल्या सर्वसाधारण सक्तीच्या योजनांस अनुसरून ६ पासून ११ वर्षांच्या वयापर्यंतच्या सर्व मुलांमुलींस मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण देण्याचा उपक्रम तावडतोबीनें करण्यांत यावा अशी आम्ही शिफारस करतों. आज फलटण संस्थानांत स्थूलमानानें ५८०० विद्यार्थी फलटण शहर व खेडेगांवें मिळून प्राथमिक शिक्षण घेत आहेत. आजच्या चौथीपर्यंतच्या वर्गांतील मुलांमुलींची ही संख्या आहे. स्थूलमानानें हे विद्यार्थी बहुतेक सर्व ६ ते ११ या वयाचे असतील असें धरण्यांत आलें आहे. एकंदर लोकसंख्येंत या वयो-मर्यादेंतील मुलामुलींची संख्या शेंकडा १५ असते असें मानतात. सन १९४१ च्या खानेसुमारीच्या आंकड्यावर हें प्रमाण बसविल्यास १०७२० इतकीं मुलें सक्तीच्या कायद्याखालीं शाळेस जाण्यास पात्र ठरतील. यांतील ५८०० एवढी संख्या आजच शाळेंत आहे असें धरल्यास नवीन ४९२० ची सोय संस्थानभर सक्तीचें शिक्षण झाल्यास केली पाहिजे. आजचा एकंदर दर विद्यार्थ्यामागें खर्च पाहिल्यास तो फलटण शहरांत १९॥ रुपये व जानपदविभागांत १५॥ रुपये असा पडतो. वर दिलेलें १५ टक्क्याचें प्रमाण सर्वत्र लागू धरल्यास फलटणांत जादा ६८५ विद्यार्थी व जानपदविभागांत ४४०० विद्यार्थी एवढ्यांची सोय नव्यानें करावी लागेल व आजच्या खर्चाच्या मानानें या एकंदर योजनेस रु. ८२००० लागतील. परंतु एवढा खर्च पुढील योजनेस लागेल असें वाटत नाहीं. कारण आजचें फलटणमधील प्राथमिक शिक्षणाचें दर विद्यार्थ्यामागें पडणाऱ्या खर्चाचें प्रमाण विशेष जास्त दिसतें. दर शिक्षकामागें विद्यार्थ्यांचें प्रमाण संस्थानांत आज फार कमी आहे. तसेंच वरच्या इयत्तांच्या म्हणजे सातवीपर्यंतच्या शाळा संस्थानांत अनवश्यक ठिकाणींहि काढलेल्या दिसतात. शिक्षण सक्तीचें झालें म्हणजे

कालान्तरानें विद्यार्थ्यांची संख्या सर्व शाळांतून बरीच वाढून दर शिक्षकामागें विद्यार्थ्यांची संख्याहि वाढेल. हें आणखी घडवून आणण्याकरितां बालवर्ग व पहिला वर्ग यांची हजेरी सबंध दिवस न ठेवतां अर्धा दिवस ठेवण्यांत यावी. शिक्षणशास्त्राच्या दृष्टीनेंहि ही गोष्ट श्रेयस्कर आहे. असें झाल्यास दर शिक्षकास आजच्यापेक्षां जास्त विद्यार्थ्यांच्या संख्येस सहज शिकवितां येईल. त्याचप्रमाणें ५-६-७ वी हे तीन वर्ग मिळून निदान २५ विद्यार्थी जेथें टिकूं शकत नाहींत तेथें ७ वी पर्यंतच्या शाळा नवीन काढूं नयेत असा नियम करावा. शिक्षण सक्तीचें व मोफत झाल्यावरहि इष्ट संख्या गांठीत नाहींत अशा जुन्या शाळाहि बंद कराव्या. या दोन्ही प्रकारांनीं दर शिक्षकामागची संख्या बरीच वाढली जाईल. याचे उलट बाजूस खर्च वाढण्याची एक बाब नमूद करावयास हवी. हल्लींचा व्ह. फायनल पास झालेल्यांचा सुरवातीचा पगार रु. १२॥ आहे तो मुंबई प्रान्ताप्रमाणें रु. १५ तावडतोबीनें करण्यांत यावा. एकंदर सर्व गोष्टींचा विचार करतां सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सार्वत्रिक अमलांत आणण्यास एकंदर खर्च वार्षिक रु. ७५००० जादा येईल असा आमचा अंदाज आहे.

*६४. प्राथमिक शिक्षक*

सक्तीची योजना अमलांत आणावयाची तर तिच्या प्रगतींत मुख्य अडचण म्हणजे नवीन शिक्षकांची आहे. आज ५७०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरितां २०२ प्राथमिक शिक्षक लागतात. वर सांगितल्याप्रमाणें पुढील योजनेंत दर शिक्षकामागें विद्यार्थ्यांचें प्रमाण बऱ्याच अंशीं वाढेल. हें प्रमाण सरासरीनें दर शिक्षकास ३० असें धरलें तर एकंदर सक्तीचें शिक्षण सार्वत्रिक करण्यास जवळजवळ १५० अधिक शिक्षक नोकरीस लावावे लागतील. शिक्षकांचा पुरवठा बहुतांशीं संस्थानांतून प्रतिवर्षी व्ह. फा. पास झालेल्यांतूनच व्हावयाचा. गेल्या तीन वर्षांत संस्थानांतून व्ह. फा. पास झालेल्यांची संख्या प्रतिवर्षी सरासरीनें ६०-६५ पडते. यांतून अलीकडे कांहीं वर्षे दरवर्षी जवळजवळ १० नवीन शिक्षक भरती केले जात असतात. या संख्येहून अधिक १५ म्हणजे एकूण दरवर्षी २५ यापेक्षां अधिक शिक्षक आणखी कांहीं वर्षे मिळूं शकतील असें वाटत नाहीं. शिक्षकांच्या भरतीच्या ह्या अडचणीमुळें सक्तीची योजना पूर्णपणें अमलांत आणण्यास १० वर्षांचा अवधि लागावा. मध्यंतरीं कांहीं कारणानें शिक्षकांचा पुरवठा बराच वाढल्यास योजना अमलांत आणण्याचा वेळ कमी करण्यास हरकत नाहीं. परंतु कांहीं झालें तरी ८ वर्षें तरी या कार्यास लागतील, असें आम्हांस वाटतें. योजनेकरितां नोकरीस लावलेले नवीन शिक्षक हे एकदम ट्रेंड मिळणें शक्य नाहीं. सुरवातीस व्ह. फा. पास झालेले शिक्षक नोकरीस लावून आजच्याप्रमाणेंच ठराविक योजनेनुसार त्यांस ट्रेंड करून आणावें. आज दर वर्षी १० म्हणजे वेळेस एकंदर वीस असे शिक्षक ट्रेनिंगकरितां परगांवीं पाठविले जातात. शिक्षकांची

एकंदर संख्या वाढणार तेव्हां ट्रेनिंगकरितां पाठवावयाची संख्याहि वाढविली पाहिजे. ही संख्या आजच्या १० ऐवजीं १५ करावी असें आमचें मत आहे. याहून जास्त शिक्षक ट्रेनिंगकरितां पाठविल्यास सुरवातीचे काळांत नवीन योजनेंत जुन्या अनुभवी शिक्षकांची फार उणीव भासेल. पांच वर्षांनंतर बरेच शिक्षक ट्रेनिंग घेऊन आल्यावर ही संख्या वाढविण्यास हरकत नाहीं. ट्रेंड शिक्षक आयते तयार मिळावे म्हणून एकादा विद्यार्थी व्ह. फा. पास झाल्यावर आपण होऊन ट्रेनिंगकरितां जात असल्यास त्यास कांहीं अटींवर संस्थाननें शिष्यवृत्ति द्यावी.

## ६५. *हजेरी अधिकारी*

सक्तीची प्राथमिक योजना यशस्वी होण्यास त्याबाबत खेडेगांवांतून प्रचार करणें, पालकांस तिचें महत्त्व समजावून सांगणें व विद्यार्थी शक्यतोंवर स्वखुषीनें शाळेंत येतील हें पाहणें अवश्य आहे. याकरितां स्वतंत्र हजेरी अधिकाऱ्यांची नेमणूक करावयास हवी. दर हजेरी अधिकाऱ्याच्या क्षेत्रांत सरासरी २० शाळा असाव्यात. याहून अधिक शाळांवर देखरेख त्यास नीटपणें करतां येणार नाहीं. जसजसें सक्तीच्या शिक्षणाचें क्षेत्र वाढत जाईल तसतसे हजेरी अधिकारी नेमावे. योजना पूर्णपणें अमलांत आल्यावर एकंदर तीन ते चार हजेरी अधिकारी नेमावे लागतील. हे हजेरी अधिकारी हल्लींच्या प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांपैकीं असावेत. त्यांस प्रवास व दैनिक भत्ता त्यांचे पगारापलीकडे जादा देण्यांत यावे. हजेरी अधिकाऱ्यांची नेमणूक झाल्यावर प्राथमिक शिक्षण खात्यांतील नोकरवर्गांत जास्त वाढ करावयाची जरूरी नाहीं. प्राथमिक शिक्षणाधिकारी हे कायमचे नेमून त्यांच्या हाताखालील दोन इन्स्पेक्टरांच्या पगाराचें स्केल तावडतोब मुक्रर केलें जावें. हजेरी अधिकारी हे इन्स्पेक्टरांचे हाताखालीं काम करतील.

## ६६. *सक्तीची योजना*

प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीची योजना क्रमाक्रमानें अमलांत आणावयाची ती एकंदर संस्थानचे निरनिराळे गट पाडून प्रतिवर्षी एकेका नवीन गटास सक्ती लागू करून अमलांत आणावी. अगदीं सुरवातीस फलटण शहरांत सक्तीचें शिक्षण सुरू करावें आणि नंतर खेडेगांवांचे सहासात गट करून क्रमाक्रमानें योजनेचा उपक्रम व्हावा. याकरितां आम्हीं पुढें निर्देशिलेल्या फलटण गटाचे (१) फलटण शहर (२) उत्तर विभाग व (३) दक्षिण विभाग असे तीन विभाग मानावे. म्हणजे आम्ही पाडलेले इतर चार ज्ञानपद गट जमेस धरून एकंदर सात विभाग होतील. यांतील शेवटच्या विभागांत सुरवातीपासूनच्या सातव्या वर्षी योजनेचा अंमल होईल.

६७. सक्तीचें शिक्षण ६ ते ११ या वर्षांच्या मुलांमुलींकरितां असावें. योजनेच्या पहिल्याच वर्षी या सर्वच वयाच्या मुलांमुलींस सक्ती लागू करूं नये. १०-११ वर्षांच्या मुलांस बालवर्गांत आणून एकदोन वर्षे शिक्षण देण्यांत हशील नाहीं. तेव्हां पहिल्या वर्षी सक्ती ६ ते ९ या वयोमर्यादेंत व्हावी, दुसऱ्या वर्षी ६ ते १० व तिसऱ्या वर्षी ६ ते ११ असा मर्यादेचा विस्तार करून योजना अंमलांत आणल्यानंतर तिसऱ्या वर्षी दर गटांत ती पूर्णपणें जारी व्हावी. आज संस्थानांत ज्यास शाळा साधारणपणें सोयीस्कर उपलब्ध नाहीं असें एकहि गांव नाहीं. त्यामुळें बहुतकरून नवीन शाळा काढण्याचा प्रसंग या योजनेचे अंमलामुळें येणार नाहीं. मात्र प्रत्येक शाळेंत विद्यार्थ्यांच्या संख्येंत बरीच वाढ होऊन शाळेकरितां जास्त जागा मिळविणें आवश्यक होईल. तसेंच क्रीडांगणें, अभ्यास, व्यायाम इत्यादींचीं उपकरणें व साहित्य हें जादा पुरवावें लागेल. याचा आजच तपशीलवार अंदाज करतां येणें शक्य नाहीं. तरी आम्ही एकंदर खर्चाचा अंदाज .१५० नवीन शिक्षक यांस सरासरीप्रमाणें लागणारा पगार, इतर साहित्य, उपकरणांकरितां कांहीं टोक रक्कम आणि हजेरी अधिकाऱ्यांचा पगार या सर्व बाबी मिळून केलेला आहे. दहा वर्षांच्या योजनेस एकंदर ७५००० रुपये धरले तर सक्तीच्या योजनेचा खर्च स्थूल मानानें वर्षास ७५०० याप्रमाणें वाढत जाऊन योजना सुरू झाल्यापासून १० व्या वर्षी तो आजच्याहून एकंदर ७५००० रुपये जादा होईल.

## ६८. *शालागृह*

आज फक्त ८ प्राथमिक शाळांच्या सरकारी मालकीच्या अशा पक्क्या इमारती आहेत. शाळांच्या इमारतींची वाढ शक्य तितक्या लवकर होणें इष्ट आहे. सन १९४५-४६ च्या बजेटांतच या कामाकरितां ३०००० रुपये दाखविलेले आहेत. यांतील २३००० रुपये नवीन शालागृह बांधण्यावर खर्च करावयाचे आहेत. ही रक्कम नवीन योजनेंत दरवर्षी ३५००० पर्यंत वाढवावी. एवढ्या रकमेंत सरासरीनें ५ ते ६ शालागृहें बांधून व्हावींत. असें झाल्यास १० वर्षांत बहुतेक सर्व शाळांच्या स्वतःच्या पक्क्या इमारती होतील. शालागृहें बांधण्याच्या योजनेंत जे गांवकरी जागा, पैसा, मजुरी इत्यादि कोणत्याहि प्रकारें विशेष मदत करण्याची उत्सुकता दर्शवितील त्यांस उत्तेजन म्हणून त्यांचे गांवीं आधीं शाळा बांधण्यांत यावी. शालागृहें बांधतांना शिक्षणतज्ञ व आरोग्यतज्ञ या दोहोंचाहि प्रथम सल्ला घेण्यांत यावा. शालागृहें शक्यतोंवर कमी खर्चाचीं असावींत. फार टिकाऊ शालागृहें बांधण्याकडे विशेष लक्ष देऊं नये. कारण एक तर त्यांस सुरवातीस फार खर्च लागतो, आणि शिवाय कांहीं वर्षांनीं विद्यार्थी-संख्या आणि उपकरणें साहित्य इत्यादिकांची वाढ यामुळें शाळेची पुनर्बांधणी करावी लागण्याचा संभव असतो. असें झाल्यास जुन्या फार पक्क्या इमारतींची कधींकधीं अडचण भासते.

## ६९. वाचनालयें

प्राथमिक शिक्षणाबरोबर कांहीं प्रौढ शिक्षणाची योजना नेहमीं हातीं घेण्यांत येते. पूर्णपणें अशिक्षित असलेल्या प्रौढांस केवळ साक्षर करण्याच्या योजनेस सुरवातीस तरी विशेष श्रम खर्ची घालूं नयेत. परंतु प्राथमिक शाळांतून बाहेर पडलेले विद्यार्थी साक्षर राहून आपल्या शिक्षणाचा सतत उपयोग व कांहीं प्रमाणांत विकास करतील यावर मात्र प्रथमपासून भर दिला पाहिजे. शाळेतल्या जुन्या विद्यार्थ्यांची साक्षरता व शिक्षणाबद्दल आस्था टिकविणें हेंहि एक काम दर गांवांतील प्राथमिक शाळेचें समजलें जावें. याकरितां दर शाळेस जोडून एक लहान वाचनालय आणि दर गटकेंद्राच्या शाळेत एक फिरतें पुस्तकालय असें असण्याची जरूरी आहे. या पुस्तकालयांतून पुस्तकें वाचावयास नेण्यास प्रवृत्त करणें व त्याच्या अनुषंगानें मधून मधून सामान्य माहिती वगैरेबाबत वर्ग भरविणें हीं कामें शिक्षकांचीं नेहमींचीं समजलीं जावीं. अशा उपक्रमाबद्दल शिक्षकांस कांहीं विशेष भत्ता द्यावा. ग्रामपुस्तकालयें उघडण्यांतहि जेथें गांवकरी सुरवातीस वर्गणी देण्यास तयार असतील त्यांस आधीं संधि द्यावी.

## ७०. शेतकी शाळा

प्राथमिक शाळेचा व त्यांतील शिक्षणाचा शेतकीशीं जितका संबंध जोडतां येईल तितका जोडावयास हवा. सुरवातीस सर्वच शिक्षणक्रमास असें नवीन वळण देणें अशक्य होईल. योग्य असे शिक्षक व आवश्यक अधिक साहित्य हे दोन्हीहि आणखी कित्येक वर्षें मिळणार नाहींत. मुख्य गटकेंद्राच्या गांवीं मात्र या दृष्टीनें तातडतोबीनें प्रयत्न करणें शक्य आहे. याकरितां गटकेंद्राच्या शाळेतील ५–६–७ वीचे वर्ग नवीन शेतीप्रधान शाळांच्या अभ्यासक्रमानुसार चालवावे. दर शाळेस याकरितां थोडी बागाईत व थोडी जिराईत शेतजमीन, एकदोन ट्रेंड शिक्षक, एकादा कामगार असा विशेष संच लागेल. अशा नवीन शाळांस इतर सातवीच्या शाळांपेक्षां सरासरीनें दरवर्षी २००० रुपये जादा लागावेत. अशा शाळा तरडगांव आणि निंबळक येथें एकेक व फलटण येथील शाळांपैकीं एक अशा तीन एकदमच सुरू कराव्या. तसेंच बरड येथील शाळेत लोंकर कांतणें व विणणें आणि शेळ्यांची जोपासना यांवर मुख्यतः आधारभूत असलेला शिक्षणक्रम, जो खंडाळा पेठ्यांत आंखण्यांत आला आहे तोहि सुरू करावा. त्यास जादा खर्च लागेल पण तो शेतकी शाळांस लागेल इतका असणार नाहीं. कारण शाळेकरतां तेथील शेती व उद्योगकेंद्रांचा सहज उपयोग करून घेतां येईल. यानंतर आदर्की व पिंपळाचीवाडी येथील शाळांतहि शेतकी शाळांचा उपक्रम करून इतरहि मोठ्या सातवीच्या शाळांत हाच अभ्यासक्रम क्रमाक्रमानें लावण्यांत यावा.

### ७१. दुय्यम शिक्षण

आज फलटणला एक इंग्रजी दुय्यम शाळा असून तींत जवळजवळ ७५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेंत मुली व अस्पृश्य विद्यार्थी यांजकडून फी घेण्यांत येत नाहीं, व इतरहि फीचें प्रमाण फार कमी आहे. एकंदर पाहतां दुय्यम शिक्षणावर होणारा आजचा खर्च प्राथमिक शिक्षणावरील खर्चाचे मानानें बराच जास्त वाटतो. आमच्या मतें या फीच्या विशेष सवलती चालू ठेवण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. तसेंच फीच्या हल्लींच्या दरामध्यें वाढ करण्यासहि कांहींच हरकत नाहीं. पहिल्या तीन वर्गांत रु. १-८-०, ४ थी व ५ वी रु. २-८-० व ६ वी व ७ वी रु. ४-०-० अशी जरी फी आकारली तरी इतर जवळपासच्या कोणत्याहि केंद्रापेक्षां येथील फीचें मान बरेंच कमी राहील. फी वाढीबरोबर नादारांची संख्या एकंदर विद्यार्थ्यांच्या संख्येच्या ३० टक्के इतकी केल्यास सर्व प्रकारच्या गरजू विद्यार्थ्यांची पूर्णपणें सोय करतां येईल. अशा फी वाढीमुळें आजचें फीचें उत्पन्न एकंदरींत जवळजवळ दुपटीनें वाढेल असा अंदाज आहे.

### ७२. शेतकी व औद्योगिक शाळा

दुय्यम शिक्षणाची वाढ शेतकी व औद्योगिक शिक्षणाच्या दिशेनें व्हावयास हवी. आजच्या हायस्कूलची इमारत हायस्कुलास अपुरी पडत आहे. आणि ती हायस्कूल आजच्याच स्वरूपांत राहिल्यास लवकरच बरीच वाढवावी लागेल. मुलींची शाळा स्वतंत्र असावी व त्यास इमारतहि स्वतंत्र बांधावी अशी योजना शिक्षणमंत्र्यांकडे आधींच गेलेली आहे. आम्ही या योजनेशीं सहमत असून मुलींची शाळा स्वतंत्र करून ती निराळ्या इमारतींत न्यावी अशी शिफारस करतों. हायस्कूलच्या चौथीपासून सातवीपर्यंतच्या वर्गाबाबत नवीन शेतकी व औद्योगिक विभाग जोडणें ही आमची दुसरी शिफारस आहे. हल्लींच्या हायस्कूलमध्यें मुलांचे तिसरीपर्यंतचे वर्ग व मॅट्रिकचे चौथी, पांचवी, सहावी व सातवीचे वर्ग एवढे असावेत. औद्योगिक व शेतकी शाळा या चौथी ते सातवीच्या वेगळ्या काढण्यांत याव्यात. यांची इमारत अगर इमारती स्वतंत्र असून त्या प्रयोगशाळा शेत, इत्यादींच्या सोयींनें युक्त असाव्या. या दोन्ही शाळा एका इमारतींत अगर जवळजवळच्या इमारतींत असल्या तरी त्यांचे मुख्य अध्यापक वेगळे असावे. औद्योगिक शाळेस लागणारा इमारत, यंत्रशाला, विज्ञानशाला इत्यादींकरितां जो मूळ खर्च लागेल तो त्याकरितां राखून ठेवलेल्या रौप्य ज्यूबिली निधींतून करण्यांत यावा. शेतकी शाळेस लागणारी इमारत वगैरे कामाकरितां मात्र निराळी तरतूद केली पाहिजे. सरासरीनें ५०,००० रुपये हा खर्च होईल असा अंदाज आहे. हल्लींचें हायस्कूल, स्वतंत्र मुलींची शाळा, शेतकी व औद्योगिक शाळा या सर्वांस मिळून वार्षिक खर्च ५५ ते ६० हजार रुपये लागेल. या सर्व मिळून फीचें उत्पन्न ३० टक्के नादारीचें

प्रमाण वगळून रु. १५,००० पर्यंत येईल असा अंदाज आहे. वर सांगितलेलें ३० टक्के नादारीचें प्रमाण हें केवळ सरासरीनें समजून शेतकी शाळा व औद्योगिक शाळा यांत हें प्रमाण विशेष जास्त म्हणजे ५० टक्क्यांपर्यंत असावें. या शाळांत शेतकरीवर्ग व कारागीरवर्ग यांचे मुलांस शिक्षणाकरितां विशेष शिष्यवृत्त्यादि देण्यांत याव्या. एकंदर दुय्यम शिक्षणावर या सर्व बाबी मिळून रु. ४० ते ४५ हजार ऐन खर्च होईल. म्हणजे आजच्या या बाबींवरच्या ऐन खर्चाहून सरासरी १५ हजारानें तो जास्त होईल.

## ७३. *लोकशाळा*

दुय्यम शिक्षणाबाबत आणखी एक प्रयोग करण्यासारखा म्हणजे लोकशाळेचा आहे. मॅट्रिकच्या दर्जाचें इंग्रजीशिवाय सर्व दुय्यम शिक्षण मातृभाषेतून असें लोकशाळांतून देण्यांत यावें. कांहीं कालानें सर्व प्राथमिक शिक्षक व्ह. फा. चे ऐवजीं लोकशाळेची परीक्षा पास झालेले असावेत असें शिक्षणतज्ञांचें मत आहे. लोकशाळेची योजना स्वतंत्र लोकशाळांच्या अभावीं अजून कोठें यशस्वी झाली नाहीं. स्वतंत्र लोकशाळा काढून ती प्रयोगादाखल चालविणें हें अत्यंत इष्ट आहे. म्हणून फलटण येथें एक व दुसरी शक्य झाल्यास तरडगांव येथें अशा दोन लोकशाळा काढण्यांत याव्या. लोकशाळेस नक्की किती खर्च लागेल याचा अंदाज करणें कठिण आहे. परंतु मोठ्या प्राथमिक शाळेच्या अनुषंगानें लोकशाळेचे वर्ग काढल्यास मूळ खर्च रु. ५,००० साहित्य वगैरेंस, आणि प्रतिवर्षी रु. ५,००० ऐन खर्च एवढ्यांत लोकशाळा चालवितां येईल असें वाटतें.

## ७४. *व्यावसायिक शिक्षणक्रम*

शेतकी व औद्योगिक शाळांची जी योजना आम्ही सुचविली आहे त्यास जोडून इतरहि शेतकी व औद्योगिक शिक्षण देणें सोपें पडेल. फलसंवर्धन, दूधदुभत्याचा धंदा, कोंबडी पाळणें इत्यादि विशिष्ट शेतकी व्यवसायाबद्दल छोट्या मुदतीचे शिक्षणक्रम फलटण येथें देतां येतील. तसेंच औद्योगिक बाबी, सुतार व लोहार काम, मोटर ड्रायव्हर व मेकॅनिक, वीजकाम व दुरुस्ती, हातमाग, कातडें कमावणें, दोर वळणें इत्यादि ग्रामीण उद्योग या सर्वांचे असेच लहान लहान शिक्षणक्रम औद्योगिक शाळेच्या अनुषंगानें काढतां येतील. हे सर्व शिक्षणक्रम ६ महिन्यांपासून दोन वर्षें इतक्याच अवधीचे असावे. या सर्वांत व्ह. फा. पास झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश मिळावा आणि यांतील सर्व शिक्षण पूर्णत्वानें मराठींतून देण्यांत यावें. हे शिक्षणक्रम चालविण्यास स्वतंत्र इमारती अशा लागणार नाहींत. शेतकी व औद्योगिक हायस्कुलांचा तज्ञ कामगार नोकरवर्ग थोडासा वाढविला म्हणजे याची सहज सोय होऊं शकेल. अमुक एक शिक्षणक्रम काढावा किंवा नाहीं हें केवळ स्थानिक परिस्थितीवर अवलंबून राहील. हे शिक्षणक्रम प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण देण्याकरितां काढावयाचे.

तरी संस्थानांत चालू असलेल्या उद्योगांत प्रत्यक्ष उपयोग होईल आणि प्रत्येक शिक्षणक्रम घेतलेले विद्यार्थी त्या विशिष्ट व्यवसायांतच परत जातील अशी खात्री करून घेऊनच नंतर कोणताहि शिक्षणक्रम काढण्यांत यावा. शिक्षण योजनेबाबत एकच महत्त्वाचा कायदा प्राथमिक सक्तीच्या शिक्षणाचा करावा लागेल.

## ७५. आरोग्य – मध्यवर्ति रुग्णालय

शिक्षणाबरोबरच प्रजेच्या आरोग्याकडे लक्ष देणें हें फार महत्त्वाचें आहे. आरोग्यरक्षण व संवर्धन यांचा मुख्यत: दोन प्रकारें विचार करावा लागतो. एक प्रकार प्रत्यक्ष आजाऱ्यांना उपचार व शुश्रूषा आणि दुसरा रोगांचा प्रादुर्भाव व फैलाव मर्यादित करणें व टाळणें, आणि एकंदर जनतेस जास्त सुदृढ बनविणें. रोगावर इलाज व रोग्याची शुश्रूषा याबाबतहि प्राथमिक उपचार व रुग्णालयांतील उपचार व शुश्रूषा असे दोन भाग पाडतां येतात. आज संस्थानांत फक्त प्राथमिक उपचाराची सोय केलेली आहे. फलटणास व इतर दोन गांवीं दवाखाने असून तेथें रोग्यांस तपासून औषध दिलें जातें. फलटणांतील श्रीसगुणामाता सूतिकागृहांत मात्र बाळंतपणीं राहण्याची प्रत्यक्ष सोय आहे. सर्व संस्थानांत एका ठिकाणीं तरी ज्यास रुग्णालयांतील उपचार आवश्यक आहे अशा सर्व रोग्यांची तरतूद केली पाहिजे. हल्लींचें श्रीसगुणामाता सूतिकागृह आणि एक नवीन मध्यवर्ति रुग्णालय हीं एके ठिकाणींच आणून त्याकरितां फलटण येथें एक इमारत बांधण्यांत यावी. मुख्य सर्वसाधारण रुग्णालयाखेरीज सूतिकागृह, शिशुसंगोपनकेंद्र, रुग्णालयाबाहेरील रोग्याचें उपचारकेंद्र व दवाखाना आणि रुग्णालयास जोडून लागणारीं नेत्र-दंतवैद्यक खातीं, शस्त्रक्रियागृह इत्यादि सर्व एकाच स्थलीं व एका इमारतींत समाविष्ट असावीं. या इमारतींस आणि प्राथमिक साहित्यास अंदाजें २,००,००० रुपये खर्च लागेल. बरेंच वैद्यकीय शास्त्रीय साहित्य हिंदुस्थान सरकारच्या जादा सांठ्यांतून सवलतीच्या दरानें मिळण्याचा संभव आहे. रुग्णालयाचा एक प्रमुख अधिकारी असावा. हाच संस्थानचा प्रमुख वैद्यकीय अधिकारी असून याच्या हाताखालीं आरोग्यखातेंहि असावें. रुग्णालयाच्या प्रमुख अधिकाऱ्याशिवाय सूतिकागृह आणि इतर विभागास लागणारा योग्य तो तज्ञ व इतर अधिकारी व कामगारवर्ग नेमण्यांत यावा. सर्व प्रकारच्या सामान्य व निकडीच्या शस्त्रक्रियांबाबत ज्याचा विशेष उपयोग होईल अशा तऱ्हेचा प्रमुख वैद्यकीय अधिकारी नेमण्यांत यावा.

## ७६. खेडेगांवांतील दवाखाने

जानपद भागांतील औषधोपचाराकरितां आज फलटणास असलेल्या दवाखान्याप्रमाणें ५ दवाखाने गट केंद्रांचे ठिकाणीं उघडण्यांत यावेत. या दवाखान्यांवर प्रत्येकीं एकेक तज्ञ एल्. सी. पी. एस्. डॉक्टर नेमावा. तसेंच सुईण, नर्स व कंपौंडर असे एकेक दर केंद्रास नेमण्यांत यावे. दवाखान्यांत येणाऱ्या

रोग्यांस प्राथमिक उपचार करून औषध देणें आणि गटाचे हद्दींत असलेल्या सर्व खेड्यांत नडीचे वेळीं प्राथमिक उपचाराकरितां जाणें हें गटकेंद्रांतील वैद्याचें मुख्य काम राहील. ५ गटकेंद्रांत दवाखाने सुरू झाल्यावर हल्लींचे आयुर्वेदीय दवाखाने चालू ठेवण्याची गरज भासणार नाहीं. नवीन दवाखान्यांत आयुर्वेदीय अगर इतर तऱ्हेचीं औषधें देण्यास हरकत नाहीं. परंतु तीं तज्ञांनीं पारखलेलीं अशींच असावीं. फलटणास एक मोठें रुग्णालय असल्यावर त्याचा उपयोग सर्व भागांस करून देण्याकरितां या रुग्णालयास जोडून दोन रुग्णवाहनें ठेवण्यांत यावीं. रुग्णालयांत उपचार आवश्यक असलेल्या रोग्यांस संस्थानांतील सर्व भागांतून या वाहनांतून फलटणास आणण्यांत यावें. निरनिराळ्या गटकेंद्रांतील दवाखान्याच्या अधिकाऱ्यानें आपल्या पाहणींत आलेल्या सर्व रोग्यांची सूचना ताबडतोबीनें फलटणास पाठवावी. रुग्णालयांत रोग्याबाबत परस्पर सूचना आल्यास गटकेंद्राच्या अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार रोगी फलटणास आणण्याची व्यवस्था करावी. सूतिका धरून एकंदर ५० रोग्यांची सोय मध्यवर्ति रुग्णालयांत होऊं शकल्यास ती प्राथमिक अवस्थेंत तरी पुरी पडेल असें आम्हांस वाटतें.

७७. खेडेगांवांतील गटांत सूतिकांची सोय ही बहुतांशीं घरीं सुईणच जाऊन करण्यांत येईल. परंतु विशिष्ट परिस्थितींत बाळंतिणीस फलटणमधील सूतिका-गृहांत नेण्याची जरूरी अगर शक्यता नसून कांहीं स्थानिक विशेष सोय करणें आवश्यक भासेल; अशा वेळीं सूतिकांकरितां आणि इतर कांहीं आकस्मिक समया-करितां म्हणून तीन-चार रोगी ठेवण्याची सोय प्रत्येक केन्द्रदवाखान्यास जोडून करण्यांत यावी. दर गटकेन्द्राचे ठिकाणीं एक दवाखाना व त्यास जोडून तीन-चार रोग्यांची राहण्याची सोय होऊं शकेल एवढी इमारत बांधण्यांत यावी. दवाखाना अधिकारी, कामगार व आरोग्यखात्याचे सफाई कामगार यांचीहि राहण्याची सोय सरकारी इमारती बांधूनच बहुतेक गट केन्द्रगांवीं करावी लागेल.

## ७८. *सार्वजनिक आरोग्यखातें*

रोग्यांच्या सोईइतकेंच रोगनिवारणार्थ केलेल्या उपाययोजनेचें महत्त्व आहे. तेव्हां संस्थानच्या चीफ मेडिकल ऑफिसरचे हाताखालीं पण एक स्वतंत्र विभाग म्हणून सार्वजनिक आरोग्यखातें काढलें जावें. या सार्वजनिक आरोग्यखात्याचें मुख्य केन्द्र फलटणची हल्लींच्या दवाखान्याची इमारत ही असावी. या आरोग्यखात्यास जोडून रोगनिवारणार्थ लागणाऱ्या सर्व उपचारांनीं सज्ज असें एक मोटरवाहन ठेवावें. या वाहनाचा विशेष उपयोग सांथीच्या रोगांचा उद्भव किंवा प्रसार थांबविण्याकडे करण्यांत यावा. तसेंच विशेष सांथीच्या रोगांचा प्रादुर्भाव नसतांहि रोगप्रतिबंधक निरनिराळ्या उपचारांची माहिती प्रसृत करणें व गटकेन्द्रांत विशेष रोगप्रतिबंधक कामीं मदत करणें याकरितां या वाहनांचा उपयोग करावा. आमचे मतें रोगप्रतिबंधक खात्याचा जितका जास्त विस्तार होईल

तितकें विशेषतः खेडेगांवांतील आरोग्य वाढविण्यास मदत होईल. या खात्यांत सुरवातीस एक तज्ञ वैद्यक परीक्षा पास झालेला आरोग्याधिकारी व त्याचे हाताखालीं एक तज्ज्ञ कामगार एवढे नेमले असतां पुरें पडेल.

### ७९. *गांवसफाई*

प्रत्येक गटकेंद्रगांवांत दवाखान्यास जोडून एक गांवसफाई कामगारवर्ग ठेवण्यांत यावा. एक सॅनिटरी सब्-इन्स्पेक्टर, एक मुकदम व दोन भंगी व दोन कुली इतका संच दर गटकेंद्रगांवीं नेमण्यांत यावा. सुरवातीस यांचें काम मुख्यतः केंद्रगांवीं जरी केंद्रित झालें तरी हळूहळू गटांत समावेश होणाऱ्या सर्व खेडेगांवांतून गांवसफाईस या कामगारवर्गाची मदत व्हावी. चराचे पायखाने योग्य ठिकाणीं पाडून त्यांचा उपयोग करावयास लावणें, तेथील व इतरत्र सर्व सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता कायम राखणें, खेड्याच्या रस्तासफाईचें काम बरोबर होतें हें पहाणें आणि एकंदरीनें रोगप्रतिबंधक सर्व योजना केंद्रगांवांत व गटाचे इतर गांवांत पार पाडणें हा या कामगारांचा संच नेमण्याचा उद्देश आहे. खुद्द फलटणास या खात्यांत एक सॅनिटरी इन्स्पेक्टर नेमण्यांत यावा व याच्या हाताखालीं म्युनिसिपॅलिटीचा सॅनिटरी खात्यांतील सर्व कामगारवर्ग ठेवण्यांत यावा.

### ८०. *खेडेगांवांतील पाणीपुरवठा*

स्वच्छ पाण्याचा पुरवठा हें आरोग्यसाधनाचें प्रमुख अंग आहे. संस्थानांतील बऱ्याच गांवांस आज विहिरी आहेत. एकदोन गांवीं विहिरी पायऱ्यांच्या आहेत, तेथें पायऱ्या काढून टाकून केवळ रहाट ठेविले पाहिजेत. दहाएक ठिकाणीं हल्लींच्या विहिरी जास्त खोलवर खणून पाणी-पुरवठा वाढविण्याची जरूरी आहे. आणि जवळजवळ २० ठिकाणीं नवीन विहिरी बांधाव्या लागतील अगर जुन्या कच्च्या विहिरी पक्क्या कराव्या लागतील. आज पाणी पुरवठ्याबाबत विशेष अडचण सर्वत्र अस्पृश्यवर्गास भासत असते. प्रचार कितीहि झाला तरी व्यवहारांत आणखी बरींच वर्षे ही अडचण कायम राहण्याचा संभव आहे. याकरितां जेथें जरुरी असेल तेथें नवीन विहिरी - अस्पृश्यांकरितां म्हणून जरी नव्हे तरी विशेषें त्यांना उपयोग व्हावा या दृष्टीनें सोयीस्कर अशा बांधण्यांत याव्या. गटकेंद्राचे ठिकाणीं विहिरीस हातपंप बसविण्यांत यावेत. व यांचे योगें लहानलहान टाक्यांत पाणी सांठवून नळानें विशेषतः अस्पृश्यांना पाणी-पुरवठा करण्याचे प्रयोग करण्यांत यावेत. गटकेंद्राचे ठिकाणीं आरोग्य सफाईखात्याचे कामगार असल्यामुळें तेथें असल्या योजना यशस्वी होण्याचा जास्त संभव आहे. तेव्हां प्रथम प्रयोग अशा गांवीं व्हावेत. १९४५-४६ सालचे अंदाजपत्रकांत दर्शविलेली रु. ४,००० ची रक्कम विशेषतः या कामीं खर्च करण्यांत यावी.

## ८१. केंद्रगांवें

दवाखाने व आरोग्यखात्याचा कामगारवर्ग यांचीं केंद्रगांवें म्हणजे आदर्की बु., तरडगांव, बरड, निंबळक व साखरवाडी हीं असावीं. साखरवाडींतील दवाखाना संस्थानच्या मालकीच्या असलेल्या जागीं बांधण्यांत यावा, व तेथील बाजाराची स्वच्छता राखणें हें सफाईकामगाराचें एक काम असावें. साखरवाडी केंद्रांत समावेश होणारीं बहुतेक इतर गांवें साखर कारखान्याच्या जमिनीच्या हद्दींतील असल्यामुळें तेथील सफाईचें बरेंच काम कारखान्याकडेच जाईल. यामुळें येथील दवाखान्याचा व आरोग्यसफाई खात्याचा कामगारवर्ग इतर केंद्रांपेक्षां कांहींसा कमी ठेवलेला चालेल. साखरवाडीच्या कारखान्याच्या रुग्णालयांत केवळ कारखाना कामगाराची सोय होऊं शकते, म्हणून या भागांतील इतर जनतेकरितां एक केंद्रदवाखाना साखरवाडीस उघडणें अवश्य आहे.

## ८२. मार्गयोजना

आर्थिक व्यवहार वाढविण्यास चांगल्या मार्गांची फार आवश्यकता आहे. तसेंच सर्व प्रकारच्या सोयी जनतेस सौकर्यानें मिळवून देणें हेंहि चांगल्या रस्त्याशिवाय साधूं शकत नाहीं. याकरितां रस्त्यांची वाढ व दुरुस्ती हीं कोणत्याहि योजनेंत फार महत्त्वाचीं ठरतात. आमच्या योजनेंतील मुख्य गोष्टी म्हणजे फलटण येथें सर्व प्रकारच्या महत्त्वाच्या बाबींचें केंद्रीकरण करणें, व बहुतेक प्राथमिक गरजा जानपद विभागाचे गट पाडून प्रत्येक गटाच्या केंद्रस्थानीं भागविण्याचा प्रयत्न करणें; याकरितां प्रत्येक गांवाचा आपल्या गटकेंद्राशीं संबंध जोडणें आणि सर्व गटकेंद्रांची आणि बहुतेक गांवांची प्रत्यक्ष वाहतुक फलटणशीं सुकर करणें आवश्यक आहे. आमची नवीन रस्त्यांची योजना आणि हल्लींचे रस्ते वाढविण्यासंबंधींची योजना या दोन्ही मुख्यत्वें या कल्पनांवर आधारलेल्या आहेत.

## ८३. ग्राममार्ग

युद्धोत्तर कालांतील अखिल भारतीय मार्गयोजनेंत रस्त्यांचें वर्गीकरण करून प्रत्येक प्रकारच्या रस्त्याबद्दलची किमान रुंदी व प्रकार याच्या निश्चित मर्यादा आंखून दिल्या आहेत. त्या बहुतांशीं या संस्थानच्या योजनेंत लागू करण्यांत आल्या म्हणजे बाजूच्या जिल्ह्यांतून संस्थानांतील रस्त्यांशीं मिळणाऱ्या रस्त्यांबाबत कोणत्याच बाबतींत तफावत राहणार नाहीं. हें साधण्याकरितां महाड–पंढरपूर रस्ता कांहींसा रुंदवावा लागेल, आणि त्यांत इतर कांहीं महत्त्वाच्या दुरुस्त्याहि कराव्या लागतील. दोन्ही बाजूंचा खालसा हद्दींतील रस्ता नवीन योजनेप्रमाणें दुरुस्त झाल्यानंतरच हें काम हातीं घेतलेलें बरें. बाहेरील विभागांशीं जोडणाऱ्या रस्त्यांबाबत एक प्रमुख काम फलटण–मोगराळे रस्त्याचें आहे. मोगराळे घांटापर्यंत फलटण हद्दींतून चांगला रस्ता झाल्यास पुढील रस्ता ब्रिटिश हद्दींत जुळवून

घेण्याची योजना आतां ठरली असल्यामुळें हें काम आधीं हातीं घेणें आवश्यक आहे. तसेंच फलटण, शिंगणापूर रस्त्यापैकीं शेवटचे ५ मैल अगदींच निकामी झाले आहेत. यांची चांगली दुरुस्ती करणें हेंहि महत्त्वाचें व जरूरीचें आहे. या रस्त्यामुळें जवळपासच्या विशेषतः पूर्व व दक्षिण या भागांचें दळणवळण आजपेक्षां पुष्कळ जास्त वाढेल. कालव्याच्या भागांत एकहि सलग पूर्व–पश्चिम असा रस्ता आज नाहीं. आणि या भागांतील रस्त्यांची एकंदर परिस्थिति दक्षिण भागापेक्षां जास्त वाईट आहे. ही सुधारण्याकरितां फलटणपासून आसूपर्यंत एक आणि दुसरा रावडी बु., मिलकटी, साखरवाडी ते वडजल असे जुळून रस्ते करावयाचें आम्ही योजिलें आहे. इतरत्र कांहीं ठिकाणीं आजचे गांवामधील रस्ते अगदीं जुजबी, बैलवाटहि नाहीं, अशा स्वरूपाचे आहेत. त्यास प्रथम सुधारणें जरूरीचें आहे. मार्गदुरुस्तीचें हें बहुतेक काम किरकोळ स्वरूपाचें असलें, तरी निदान प्रथम बांधणीच्या वेळीं बऱ्याच खर्चाचें असतें. याकरितां रस्त्यांस एकंदर लागणारा खर्च दहाएक वर्षांवर विभागून महत्त्वाच्या व जरूरीच्या बाबी प्रथम व नंतर इतर अशा क्रमानें हातीं घ्यावयाच्या आहेत.

## ८४. *नगररचना*

फलटण शहराची सुधारणा व वाढ करणें व त्यांतील रस्त्यांची नवीन आंखणी करणें हेंहि एक योजनेच्या दृष्टीनें महत्त्वाचें काम आहे. यांतील प्राथमिक बाबी म्हणजे नवीन रस्ते पाडण्याकरितां लागणाऱ्या जागा मिळवणें आणि पडीक जागा व पडकीं घरें हीं त्यांच्या मालकांस स्वच्छ करावयास लावणें. हें सर्व करण्याच्या आधीं शहराची मोजणी व पाहणी होणें जरूर आहे. अशी पाहणी झाल्यानंतर नवीन रस्त्यांची आंखणी नीट करून एका ठरलेल्या मानानुसार लहानमोठे रस्ते, बोळ वगैरे रुंदावण्याचें काम हातीं घ्यावें. शहरांतील मोठे रस्ते शक्य तितके सरळ रेषेंत जातील या दृष्टीनें योजना करणें, बाणगंगेचे बाजूच्या कांहीं ठिकाणीं जुनी तटबंदी पाडून नदीच्या कांठानें उंचावर एक अर्ध वर्तुळाकार रस्ता करणें, मलटण भागांत निदान अर्धा मैल लांबीचा रस्ता लगेच करणें इत्यादि गोष्टी प्रथम कराव्या लागतील. भावी नगररचनेच्या दृष्टीनें नगरवाढीची पुढील योजना आतांच आंखून ठेवून आंखणी केलेली जागा ही सरकारनें आपले ताब्यांत घेतली पाहिजे. इतर कांहींहि लगेच करावें लागलें नाहीं तरी आजपासून पुढील योजनेचें प्राथमिक स्वरूप आखून ठेवलें पाहिजे, म्हणजे जसजशी शहराची वाढ होईल तसतसा योजनेचा एकेक भाग अवश्य तसा अमलांत आणला जाईल.

## ८५. *शहरांतील पाणीपुरवठा*

फलटण शहराचा पाणीपुरवठा आज विशेष चांगला आहे. तरी शहराची बरीच वाढ झाल्यावर हा पुरेसा न पडण्याचा संभव आहे. पाणीपुरवठ्याबाबत आज प्रथम हातीं घेण्याचें काम हें शहरांतील पाणी वांटणाऱ्या नळ्यांची

हल्लींची व्यवस्था बदलून सुधारणें हें होय. कांहीं ठिकाणीं नळ्या फार लहान आहेत, व कांहीं ठिकाणीं त्या गटाराच्या बाजूनें जात आहेत त्यामुळें पाणीपुरवठ्यास गैरसोय व धोका उत्पन्न होतो. या गोष्टी प्रथम दुरुस्त झाल्या पाहिजेत. तदनंतर नगररचनेच्या योजनेंतील नवीन भागास पाणी पुरविणें आणि पाण्याचा मूळ उगमस्थानाचा पुरवठा वाढवून तो आणण्याचा मार्ग जास्त रुंदावून दुरुस्त करणें या बाबी क्रमाक्रमानें हातीं घ्याव्या लागतील.

## ८६. *शहरसफाई*

शहराचें आरोग्य सुधारण्याकरितां हल्लींची शहरसफाईची योजना सुधारावी लागेल. हल्लीं बरेच ठिकाणीं गटारें कच्चीं असून सांडपाणी नदींत सोडण्याची योजना ही असमाधानकारक आहे. याकरितां नदीलगतच्या खालपटच्या भागांतील वस्तींतील गटारें पक्कीं करून या सर्व भागांतील ओल व घाण हीं काढून लावावीं लागतील. एकंदर खासगी व सार्वजनिक संडासांची संख्या कमी असल्या-मुळें सार्वजनिक न्हाण्या आणि त्याचलगत सार्वजनिक संडास हे शहराच्या गरीब वस्तीस लागून आमच्या तपशीलवार योजनेप्रमाणें बांधण्यांत यावेत. पुढेंमागें पाणीपुरवठा वाढवून जिकडे तिकडे नवीन तऱ्हेचे संडास व जमिनीखालून मैला वाहण्याची व्यवस्था हीं करतां येतील. या गोष्टी सवडीप्रमाणें हातीं घेण्यांत याव्या.

## ८७. *ग्रामरचना*

नगर रचनेप्रमाणें ग्रामरचनेचें कामहि महत्त्वाचें आहे. याची प्राथमिक अवस्था गांवांतील पडकीं घरें आणि मोकळ्या जागा साफ ठेवणें, रस्त्यांची आणि त्यांच्या बाजूच्या गटारांची आंखणी करून सर्व सार्वजनिक जागा आणि पाणवठे हे स्वच्छ राखणें, खत कचऱ्याचे ढीग विवक्षित स्थलीं आणि विवक्षित प्रकारें राखले गेले आहेत हें पाहणें. या प्राथमिक गोष्टी झाल्यानंतरच खेडे-गांवांतील घरांची अगर मार्गांची रचना सुधारणें याकडे पाहतां येईल. वर दिलेल्या योजनेप्रमाणें प्रत्येक गटकेंद्राचे गांवीं आरोग्य व सफाई कामगार वस्ती करून राहतील. यांनीं सुरवातीस ग्रामरचनेच्या प्राथमिक योजनेची अंमल-बजावणी केंद्र गांवांत करून नंतर हळूहळू ग्रामपंचायतीच्या साहाय्यानें गटांतील इतर गांवांतहि घडवून आणावी.

## ८८. *सार्वजनिक इमारती*

या एकंदर योजनेची पूर्तता करण्याकरितां फलटणास आणि इतर ठिकाणीं निरनिराळ्या लहानमोठ्या इमारती बांधाव्या लागतील. त्यांतील कांहींच्या योजना आधींच तयार केल्या गेल्या आहेत. मुलींच्या शाळेच्या व इतर शाळांच्या इमारतींचा तसेंच दवाखान्याच्या इमारतींचा उल्लेख वर आलेलाच आहे. त्याशिवाय पोलिसांकरितां राहण्याच्या खोल्या, कापूस व गूळ यांचा बाजार व

वखारी, आठवड्याच्या बाजाराची व्यवस्थेशीर बांधणी या गोष्टी फलटणास करावयाच्या आहेत. फलटण येथें एका लहानशा रहदारी बंगल्याची जरूरी असून चावडी व रहदारी खोली अशा संयुक्त इमारती सर्व केंद्रगांवीं बांधाव्या लागतील. फलटण मुक्कामीं प्रमुख अधिकाऱ्यांकरितां घरें बांधण्याचीहि एक योजना आहे. ही योजना कर्ज काढून भाड्याच्या उत्पन्नांतून त्याची फेड करणें अशा प्रकारें बसवितां आल्यास तीहि हातीं घेण्यास हरकत नाहीं. या अगदीं प्राथमिक अशा गरजा झाल्या. याशिवाय दुसऱ्याहि कांहीं दुय्यम निकडीच्या इमारतींचा उप-समितीच्या अहवालांत निर्देश केला आहे. रस्ते, इमारती खात्यामार्फत होणारीं कामें हीं बहुतांशीं हल्लींच्या अधिकारी व कामगार वर्गामार्फत होण्यासारखीं आहेत. इंजिनिअर खात्याचें जमीन बांधणीचें एक महत्त्वाचें काम सुरू होणार असून त्याकरितां एक विशिष्ट अनुभव व माहिती असलेला अधिकारी नेमावा लागेल. या अधिकाऱ्यासच सबंध इंजिनिअर खात्याचे प्रमुख करून बांधणीचें काम व रस्ते इमारतीचें नवीन काम याची सांगड घालण्याची व्यवस्था व्हावी. याशिवाय एकंदर इंजिनिअर खात्याकरितां वारंवार अगर विशिष्ट प्रसंगीं लागणारा सल्ला देणारा असा एक सल्लागारहि नेमण्याची जरूरी पडण्याचा व बाहेरील इतर तज्ञांचा विशिष्ट बाबतींत सल्ला घ्यावा लागण्याचा संभव आहे.

## ८१. परतलेले सैनिक

समितीस युद्धावरून परतलेल्या सैनिकांचा विचार विशेष करण्यास सांगितलें आहे. सैनिक व त्यांचीं कुटुंबें यांची खरी उन्नति साधावयाची म्हणजे ते जेथें रहातात तेथील एकंदर परिस्थितीच सुधारली पाहिजे. आमच्या सर्वच योजनांचा हा रोख आहे. सैनिकांस कांहीं विशेष सवलती अर्थातच देतां येतील. परतलेल्या सैनिकांस संस्थानांत नोकरीस लावणें व त्यांच्या कुटुंबीयांस शिक्षणाकरतां मदत देणें वगैरेबाबत दरबारनें आपलें धोरण जाहीर केलें असून त्याबरहुकूम व्यवस्था करण्यांत येत आहे. शेतीसुधारणा करणें अगर उद्योगधंदा प्रस्थापित करणें याकरितां सवलतीचीं कर्जें सैनिकांस संस्थाननें देणें योग्य होईल. अशा प्रकारें सैनिकांस व्यक्तिशः मदत करतां येईल. ज्या गांवांतून सैनिक भरती मोठ्या संख्येनें अगर प्रमाणांत झाली त्यासहि एकंदर योजनांच्या अंमलबजावणींत आधींचें स्थान देतां येईल. पाण्याची सोय, वाचनालय उघडणें, शाळा व चावडी इमारती, ग्राममार्ग अशा बाबतींत या गांवांच्या योजना आधीं हातीं घेणें युक्त ठरेल. फलटण शहर व फलटण गट यांतूनच विशेष सैनिक भरती झाली

आहे. आमच्या योजनेंतील बऱ्याच बाबींचें केन्द्रीकरण साहजीकच फलटण येथें झालें आहे, तेंहि या दृष्टीनें इष्टच आहे.

## १०. खर्चाचे अंदाजी आंकडे

खर्चांचे तपशीलवार आंकडे परिशिष्टांत दिले आहेत ते निरनिराळ्या उपसमित्यांनीं तयार केलेले आहेत. हे आंकडे अंदाजी स्वरूपाचे असून त्यांची निश्चिती करण्यास प्रत्येक योजना हातीं घेण्याच्या आधीं तात्कालिक जास्त तपशीलवार हिशेब करावा लागेल. युद्धोत्तर काळांत सर्व वस्तूंचे किंमतीचें मान कोठें स्थिरावतें यावर कायम खर्चाचें मान अवलंबून राहील. या दृष्टीनें आमचे आंकडे केवळ स्थूल अंदाजाचे असें मानलें पाहिजे. चालू खर्चाच्या अंदाजांत अधिकारी व नोकर यांचे पगाराचें मान हें महत्त्वाचें आहे. याबद्दलहि आज निश्चिती नाहीं. उपसमित्यांनीं आपणांस योग्य वाटेल असें मान धरून चालू खर्चाचा अंदाज केला आहे. योजना हातीं घेण्याच्या आधीं संस्थानास निरनिराळ्या खात्यांतील पगाराबद्दल आपलें कायम धोरण ठरवावें लागेल.

## ११. कायम स्वरूपाचा खर्च

कायम स्वरूपाच्या एकंदर खर्चाचे उत्पादक आणि अनुत्पादक असे दोन भाग पाडतां येतील. ज्या कायम स्वरूपाच्या खर्चामुळें पुढें संस्थानच्या उत्पन्नांत निश्चित वाढ होण्याचा संभव आहे असा खर्च आज कर्ज काढून करण्यासहि हरकत नाहीं. तसेंच जो खर्च सुरवातीस संस्थान करीत असलें तरी कालान्तरानें ज्यांस या खर्चाचा फायदा होईल त्यांजकडून तो वसूल होण्याचा संभव असल्यास त्याकरितां संस्थाननें कर्ज काढणें गैर ठरणार नाहीं. परंतु जेथें वसूली पूर्णांशानें होण्याचा संभव नाहीं अगर वसूली होण्यास कालावधी लागून व्याज वसूल होणार नाहीं, तेथें संस्थानास जेवढी ऐन तूट सोसावी लागेल याचा अंदाज केला पाहिजे. आम्ही सुचविलेल्या योजनांत पाणीपुराईचीं व इतर धरणें बांधल्यामुळें पाणीपट्टीचें उत्पन्न निश्चित वाढणार आहे. तेव्हां या योजनांवर लागणाऱ्या खर्चापैकीं कांहीं भाग कर्ज म्हणून काढण्यास हरकत नाहीं. जमीन बांधणीवरील सर्व खर्चच हप्तेबंदीनें वसूल करावा अशी आम्ही शिफारस केली आहे तेव्हां याकरितां लागणारी सर्व रक्कम कर्जाऊ उभारण्यास हरकत नाहीं. रकमेवरील व्याज वसूलींत धरलेलें नाहीं, तें संस्थाननें सोसलें पाहिजे. आमच्या अंदाजांत जमीन बांधणी-वरील चालू खर्चांत व्याजाच्या आकाराचा समावेश केला आहे. फलटण नगर-

रचनेवरील खर्चहि कांहीं वर्षांनीं जमीन विक्री व जमिनींच्या किंमतीच्या वाढीवरील कर इत्यादि मार्गांनीं बऱ्याच अंशीं भरून येण्यासारखा आहे. यांतीलहि मोठ्या भागाकरितां कर्ज काढतां येईल. इतर कांहीं कायम खर्च विशिष्ट कामांकरितां आधींच सांचविलेल्या निधींतून भागवतां येतील. शेती सुधारणानिधी, उद्योग संवर्धननिधी, खेडेगांव औषधोपचार निधी इत्यादि निधींतील रकमा आम्ही सुचविलेल्या योजनांत लावण्यानें निधी करण्याचे मूळ हेतू सिद्धीस जातील. कर्ज काढून हातीं घेतां येण्यासारखीं कामें व विशिष्ट निधींतून भागवितां येण्याचीं कामें यांशिवाय इतरांकरितां संस्थानच्या गंगाजळींतून खर्च केला पाहिजे. हिंदुस्थान सरकार युद्धोत्तर योजनांकरितां प्रान्तिक व संस्थानी सरकारांस कर्ज रूपानें मदत करणार आहे. त्यांतून कर्जाऊ लागणाऱ्या रकमेचा शक्य तितका मोठा भाग उभारण्याचा प्रयत्न व्हावा.

## १२. चालू खर्च

योजनांमुळें संस्थानच्या चालू वार्षिक खर्चांतहि वाढ होईल. कांहीं योजनांमुळें थोडेंफार उत्पन्न सरकारास मिळेल. हें उत्पन्न मुख्यतः शेतीविषयक योजनांतून मिळेल. त्याचा अंदाज सरासरीनें वार्षिक रु. ७५,००० असा करण्यांत आला आहे. शिक्षण, आरोग्य इत्यादि खात्यांतील उत्पन्न हें तत्संबंधीं केलेल्या सोईकरितां कांहीं सर्वसाधारण अगर विशिष्ट आकार करण्यावर अवलंबून आहे. एकंदर योजनांमुळें वार्षिक ऐन खर्च तीन सव्वातीन लाखानें वाढेल अशी अटकळ आहे.

## १३. *अधिकारी व तज्ञ समिती*

आम्ही आंखलेल्या योजना पार पाडण्याकरितां नवीन अधिकारी व नोकरवर्ग हा किती नेमावा लागेल हें वेळोवेळीं दाखविलेंच आहे. यामुळें खात्याच्या हल्लींच्या रचनेंत कांहीं फरक करावा लागणार नाहीं. तसेंच मंत्र्यांच्या दरम्यान खात्यांची झालेली विभागणी हीहि बदलण्याची जरूरी नाहीं. बहुतेक खात्यांस एक विशिष्ट प्रमुख असणार. हे सर्व प्रमुख आणि विशिष्ट कामाकरितां नेमलेले तज्ञ अधिकारी या सर्वांची संयुक्त सभा दर तिमाहीस एकदां तरी उभयतां मंत्र्यांनीं घ्यावी. या सभेंत झालेल्या चर्चेचीं तपशीलवार टिपणें ठेवावींत. योजनेच्या दर तिमाहींत झालेल्या प्रगतीचा आढावा घेणें आणि ती सुसूत्र राखणें या गोष्टींवर मुख्यतः तिमाही सभेंत भर द्यावा. योजनेकरितां अधिकारी वर्ग जरी वाढविला असला तरी सर्वच प्रकारचे तज्ञ मिळविणें लहान संस्थानास शक्य

नाहीं. याकरितां योजनेची प्रगती वारंवार तपासून त्यांत आवश्यक असलेल्या दुरुस्त्या करणें, पुढील योजनांचें रूप निश्चित करणें इत्यादि गोष्टींकरितां संस्थानास बाहेरील तज्ञांची गरज पडण्याचा संभव आहे. संस्थाननें प्रत्येक बाबतींत लायक तज्ञांची निवड करून त्यांजकडून वेळोवेळीं सल्ला मिळूं शकेल अशी सोय करावी. शिवाय अशा तज्ञांचें एक कायमचें मंडळ बनवून ठेवावें. विशिष्ट तज्ञांची प्रसंगशः मदत घेऊन सर्व तज्ञ मंडळास मधूनमधून संयुक्त रीतीनें मागील प्रगति तपासणें व पुढील योजना दुरुस्त करून निश्चित करणें हें काम करण्यास सांगावें. अशा रीतीनें क्रमाक्रमानें तज्ञांचा सल्ला घेत जाऊन योजना पूर्ण करीत जावी.

## १४. *जनतेचें सहकार्य*

कोणत्याहि प्रकारचें नियोजन पार पाडण्यांत जनतेचें सहकार्य हें अत्यंत महत्त्वाचें आहे. सर्वच योजना जनतेचें सहकार्य मिळाल्यास सुकर होतील, आणि तरच त्यांचें शाश्वत फळहि दिसेल. प्रचलित राज्यघटनेनुसार सर्व-साधारण योजनेस प्रतिनिधि मंडळाची वगैरे संमति मिळविणें हें क्रमानें होईलच. परंतु मुख्यतः खेड्यांतील शेतकरी आणि बिगर शेतकरी वर्गाचा नित्याचा पाठिंबा योजनेच्या सर्व अंगास मिळविणें जरूरीचें आहे. याकरितां गटकेंद्रांत काम सुरू झाल्याबरोबर शक्य तितक्या लवकर केंद्रगांवीं ग्रामपंचायती स्थापण्यांत याव्या. सफाई वगैरे कामाकरितां संस्थानाचा नोकरवर्ग आधींच तेथें उपलब्ध असल्यामुळें पंचायत स्थापल्याबरोबर कर लादावे लागतील अशी या गांवीं विशेष भीति बाळगावयास नको. या पंचायतीस इतर कामाबरोबरच दवाखाना, शाळा इत्यादि केंद्रगांवीं मुद्दाम स्थापलेल्या संस्थांचे सल्लागार म्हणून नियुक्त करण्यांत यावें. केंद्रगांवांत पंचायतीचें काम नीट चालू झाल्यानंतर गटांतील शक्य तितक्या इतर गांवीं ग्रामपंचायती स्थापन करण्याचा प्रयत्न करावा. ज्या गटांत बऱ्याच ग्रामपंचायती स्थापन होतील तेथें या पंचायतींची मिळून गटसमिति स्थापन करून तिच्यामार्फत गटांतील शिक्षण, आरोग्य, सहकार, सफाई, शेतीसुधारणा इत्यादि सर्व प्रकारच्या कामांची वाढ करून घ्यावी. या सर्व गोष्टी करण्यास प्राथमिक अवस्थेंत मुद्दाम प्रचारक नेमल्यास विशेष उपयोग होण्याचा संभव आहे. याकरितां एक प्रचारगाडी तयार करून त्यांत प्रचाराचीं निरनिराळीं साधनें ठेवून एका पगारी प्रचारकाकरवीं तिचा सबंध संस्थानभर संचार करवावा. अशा योजनेमुळें सुरवातीस जनमत अनुकूल बनवितां येईल. एवढेंच नव्हे तर

पुढेंहि याच्यायोगें शेतकी, सहकार, शिक्षण, आरोग्य इत्यादि खात्यांचें चालू कार्य जनतेस समजावून देणें, त्यांच्या कार्यांत सहकार्य मिळवणें, तसेंच थोडेंसें मनरंजन करून प्रौढ शिक्षणाचें कार्यहि कांहींसें पार पाडणें या सर्व गोष्टी साधतां येतील. प्रचारकांमार्फत वांटलें जाणारें छापील साहित्य विशेष सुबोध, वाचण्यास सुलभ व आकर्षक असें ठेवल्यास शिक्षण प्रसाराच्या योजनेसहि मदत होऊं शकेल.

### १५. *वाढलेल्या उत्पन्नाची न्याय्य वांटणी*

कमिटीकडे सोपविलेल्या बाबींत वाढलेलें उत्पन्न न्याय्य रीतीनें कसें विभागलें जाईल याबद्दल सूचना करण्याचें एक कलम आहे. कमिटीची उत्पादन वाढविण्याची मुख्य योजना ही शेतकी व्यवसायाबाबतची आहे. मोठ्या प्रमाणावर नवीन उद्योगधंदे संस्थानच्या हद्दींत इतक्यांतच स्थापन होतील असा संभव दिसत नाहीं. मात्र ते असे स्थापन झाल्यास त्यांची जागा मुक्रर करणें व त्यावर अलीकडे हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केलेल्या धोरणाप्रमाणें सर्व प्रकारचें नियंत्रण करण्याचे हक्क राखून ठेवणें हें संस्थाननें करावयास हवें. जमिनीच्या उत्पन्नाच्या हक्काबाबत आमच्या योजनेमुळें कांहीं फरक करणें भाग पडेल. सार्वजनिक पैसा फार मोठ्या प्रमाणावर शेतीचें उत्पन्न वाढवावयास खर्च करावयाचा तर त्या उत्पन्नाची वाढ समाजांतील गरीब व गरजू जनतेस विशेषत्वें प्राप्त होईल हें पाहिलें पाहिजे. योजनेनें मुख्यत्वें जमिनदार व सावकार यांचा फायदा झाल्यास ही योजना बरीचशी निरुपयोगी ठरेल. योजनेच्या सुरवातीस हल्लींच्या सावकारी कर्जांची छाननी करून त्याचा बोजा योग्य व इष्ट त्या प्रमाणांत कायद्यानें हलका करण्याची शिफारस वर केलीच आहे. यापुढील कर्जव्यवहार बहुतांशीं सहकारी पेढ्यांशीं झाल्यास कर्जाच्या प्रश्नास महत्त्व उरणार नाहीं. आज संस्थानांतील बहुतेक जमिनी प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याच्या मालकीच्या आहेत. कांहीं ठिकाणीं कुळें जमिनी कसतात तेथें त्यांच्या योग्य हक्कांचें संरक्षण होणें आवश्यक आहे. कुळांच्या दृष्टीनें हवें असणारें मुख्य संरक्षण दोन प्रकारचें. जमिनीचा ताबा योग्य कारणाशिवाय आपल्या हातून जाऊं नये व खंड योग्य कारणाशिवाय जमिनदारास वाढवितां येऊं नये. या दोन्ही प्रकारचें संरक्षण देणारा एक प्राथमिक कुळसंरक्षण कायदा हा शक्य तितक्या लवकर संस्थानांत अंमलांत आणावा. याचें स्वरूप मुख्यतः मध्यप्रान्तांतील याबाबतच्या कायद्यासारखें असावें. शेती आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यास शेतजमिनीची विभागणी थांबविणें हा एक उपाय सुचविण्यांत येतो. याकरितां वहित क्षेत्र किमान अमुक असल्याशिवाय शेती करण्यांत येऊं नये

असे निर्बंध शिफारसले जातात. योजनेच्या प्राथमिक अवस्थेंत तरी हे निर्बंध संस्थानांत लागू करावे असें आम्हास वाटत नाहीं. पुढें शेतीच्या उत्पन्नाच्या वाढीबरोबर लोकसंख्या वाढून कांहीं विशेष उपाययोजना याबाबत आवश्यक व इष्ट आहे काय याचा विचार करतां येईल.

## १६. *सुनागरिक वृत्ति*

आम्हांवर सोंपविलेल्या विषयांपैकीं एक विषय जनतेचा शैक्षणिक, मानसिक, शारीरिक दर्जा वाढवून त्यांत सुनागरिकवृत्ति कशी बळावतां येईल हें पाहण्याचा आहे. याबाबत आम्ही विशिष्ट अशी कोणतीच शिफारस केलेली नाहीं. शिक्षण सार्वत्रिक झालें, त्याचा दर्जा हळूहळू सुधारला, एकंदर सरकारी काम किती उपयुक्त महत्त्वाचें व सहकार्ययोग्य आहे असें जनतेस समजूं लागलें, ग्रामपंचायती, सल्लागार समित्या यांतील कामाचा अनुभव आला म्हणजे या गोष्टी पुष्कळ आपोआप होतील असें आम्हांस वाटतें. याबाबत योजना अमलांत आणणाऱ्या अधिकाऱ्यांवरहि बरीच मोठी जबाबदारी आहे. कोणतीहि योजना ही वरून लादली जात नसून पूर्वविचारानें प्रजेच्या हिताकरितांच आंखलेली आहे हें जनतेस पदोपदीं पटविण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर आहे. योजना जनतेस पटविण्याकरितां लहानसहान तपशिलांचे बाबत वेळेस मुरड घालावी लागल्यास ती घालण्याची तयारी योजना अधिकाऱ्यांनीं दाखविल्यास हेंहि काम सुकर होईल.

| | |
|---|---|
| **ध. रा. गाडगीळ** | **भा. पा. पाटील** |
| **श्री. ग. वझे** | **जे. पी. नाईक** |
| **खं. ग. घारपुरे** | **अ. बा. सावडे** |
| **वा. ल. देशपांडे** | **शं. प. जोशी** |
| **का. वा. जोशी** | **श्री. म. उपळेकर** |
| **ना. वि. कानिटकर** | **का. ब. केसकर** |
| **वा. रा. सरदेसाई** | **रा. शं. वापट** |

# परिशिष्टें

## परिशिष्ट अ

## योजनेसाठीं लागणारा नवीन अधिकारी व नोकरवर्ग

**शेतकी—**

१ मुख्य शेतकी अधिकारी
१ शिपाई
१ कामगार

**जमीनबांधणी व बंधारे- (पहिलीं दहा वर्षें)**

१ इंजिनीयर
१ सीनियर सर्व्हेअर
३ ज्यूनियर सर्व्हेअर
६ मिस्त्री
१८ मजूर
२ शिपाई

(११ व्या वर्षापासून)

१ सीनियर सुपरवायझर
५ मिस्त्री
१ कारकून
२ शिपाई

**शेतकी सुधारणा**

१ शेतकी पदवीधर
२ कामगार
१ शिपाई

**बोअरिंग मशीन-संच**

१ ओव्हरसीयर
१ मेकॅनिक
१ एंजिन ड्रायव्हर

**जनावरांची पैदास व दुग्धालय**

१ मॅनेजर
१ कारकून
१ मुकादम
६ गवळी
३ मोलकरणी
२ गडी
२ शिपाई
२ रखवालदार

**सहकारी दुग्ध संस्था**

१ मॅनेजर
१ शिपाई
१ असि. मॅनेजर

**फळझाडांची पैदास**

१ माळी

**पशुवैद्यक**

१ वैद्यकीय अधिकारी
१ कंपाउंडर

**उद्योगधंदे**

१ ग्रामोद्योग अधिकारी

**सहकार**

१ पतपेढी-देखरेख-अधिकारी
१ सहाय्यक
२ कारकून
३ शिपाई

**वैद्यकीय उपचार व आरोग्य**

१ प्रमुख वैद्यकीय अधिकारी

**रुग्णालय**

२ एल्. सी. पी. एस्. डॉक्टर
१ एल्. सी. पी. एस्. लेडी डॉक्टर
१ मेट्रन

१ अति. मेट्रन
२ शुश्रूषक (पुरुष)
२ ,, (स्त्री)
१ मिडवाइफ्
२ दाई
१ हेल्थ व्हिजिटर
४ झाडूवाले (पुरुष)
२ ,, (स्त्री)
४ धोबी
४ शिपाई
२ रुग्णवाहन-वाहक (Drivers)
१ स्टोअरकीपर
१ अति. स्टोअरकीपर
३ आचारी
१ शिंपी
२ माळी
१ हेडक्लार्क
१ कारकून
१ टायपिस्ट
१ अकाउंट कारकून

### दवाखाना

१ वैद्यकीय अधिकारी
१ मुख्य कंपाउंडर
२ कंपाउंडर (शिक्षित)
१ कंपाउंडर
१ ड्रेसर
१ शिपाई
१ झाडूवाला
१ दाई (स्त्री विभागासाठी)

### ग्रामदवाखाने

५ एल्. सी. पी. एस्. डॉक्टर
५ मिडवाइफ्
५ दाई
५ हेल्थ व्हिजिटर
५ कंपाउंडर
५ झाडूवाले
५ धोबी
५ शिपाई
५ सॅनिटरी इन्स्पेक्टर
१० झाडूवाले
१० मजूर
४ मुकादम

### सार्वजनिक आरोग्यविभाग

१ एल्. सी. पी. एम्. डॉक्टर
१ सॅनिटरी इन्स्पेक्टर
२ सब्-सॅनिटरी इन्स्पेक्टर
४ झाडू
४ मजूर
१ ड्रायव्हर
१ कारकून
१ शिपाई

### प्रचार

१ प्रचार अधिकारी
१ शिपाई
१ शाहीर
१ ड्रायव्हर
१ क्लीनर

### शिक्षण

१५० नवीन प्राथमिक शिक्षक
४ हजेरी अधिकारी

## परिशिष्ट आ

# योजनांसाठीं लागणारा अंदाजी खर्च

| बाब | | कायम स्वरूपाचा | प्रतिवर्षी चालू* |
|---|---|---|---|
| **पहिलीं पांच वर्षे** | | | |
| १ शेती | ... ... | १९,०२,००० | १,४३,३५० |
| २ उद्योगधंदे | ... ... | ... | ९,००० |
| ३ शिक्षण | ... ... | ३,२५,००० | ८५,५५० |
| ४ आरोग्य | ... ... | ३,४५,००० | ७९,६०० |
| ५ नगर व ग्रामरचना | ... ... | १०,९३,५०० | १,००० |
| ६ इतर | ... ... | १६,००० | ११,५०० |
| एकूण | ... | ३६,८१,५०० | ३,३०,००० |
| **दुसरीं पांच वर्षे** | | | |
| १ शेती | ... ... | १४,९५,००० | १,४३,३५० |
| २ उद्योगधंदे | ... ... | ... | ९,००० |
| ३ शिक्षण | ... ... | ६०,००० | १,२७,९७० |
| ४ आरोग्य | ... ... | ... | ७९,६०० |
| ५ नगर व ग्रामरचना | ... ... | ९,५९,५०० | ३५,८०० |
| ६ इतर | ... ... | ... | ११,५०० |
| एकूण | ... | २५,१४,५०० | ४,०७,२२० |
| **पुढील वर्षे** | | | |
| १ शेती | ... ... | ... | १,३३,७५० |
| २ उद्योगधंदे | ... ... | ... | ९,००० |
| ३ शिक्षण | ... ... | ... | १,२७,९७० |
| ४ आरोग्य | ... ... | ... | ७९,६०० |
| ५ नगर व ग्रामरचना | ... ... | ५,७३,५०० | ३५,८०० |
| ६ इतर | ... ... | ... | ११,५०० |
| एकूण | ... | ३,९७,६२० | ३,९७,६२० |

* सर्व आंकडे हल्लीं होणाऱ्या खर्चाहून जास्त लागणाऱ्या खर्चाचे आहेत.

# योजनांचे अंदाजी खर्चाचा तपशील

## १ शेतीसुधारणा

### पहिलीं पांच वर्षें

| बाब | कायम स्वरूपाचा खर्च | † दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ जमीनबांधणी ... | ११,२०,००० | ४५,६०० | |
| २ सुधारलेल्या शेतीचा प्रचार ... | ... | ५,५०० | |
| ३ वृक्षारोपण ... | ... | ७०० | |
| ४ यांत्रिक शेती ... | २,००,००० | २३,००० | |
| ५ पाणीमुराईचीं व इतर धरणें... | ३,७५,००० | १२,००० | |
| ६ विहिरी खोदण्यास मदत ... | १०,००० | ४,७५० | |
| ७ दुभत्या जनावरांची पैदास व दुग्धालय ... | १,५०,००० | २७,००० | |
| ८ दुधाचा धंदा वाढवणें ... | ६,००० | १,५०० | चौथ्या वर्षापासून |
| ९ गुरांचा दवाखाना ... | २६,००० | ६,५०० | |
| १० फलसंवर्धन ... | १,००० | ८०० | |
| ११ मेंढरांची पैदास ... | १४,००० | ५,००० | |
| १२ बीं पुरवठा ... | ... | ५,००० | |
| १३ शेतकी खातें वाढ ... | ... | ६,००० | |
| एकूण ... | १९,०२,००० | १,४३,३५० | |

योजनांतून चालू उत्पन्न सरासरी रु. ५७,००० सालिना येईल.

† सर्व आंकडे हल्लीं होणाऱ्या खर्चावर जास्त लागणाऱ्या खर्चाचे आहेत.

## दुसरीं पांच वर्षे

| बाब | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ जमीन बांधणी ... | ११,१०,००० | ४५,६०० | |
| २ सुधारलेली शेती-प्रचार ... | ... | ५,५०० | |
| ३ वृक्षारोपण ... | ... | ७०० | |
| ४ यांत्रिक शेती ... | ... | २१,००० | |
| ५ पाणीमुराईचीं व इतर धरणें ... | ३,७५,००० | १२,००० | |
| ६ विहिरी खोदण्यास उत्तेजन ... | ... | ४,७५० | |
| ७ दुभत्या जनावरांची पैदास व दुग्धालय ... | ... | १७,००० | |
| ८ दुधाच्या धंद्याची वाढ ... | ... | १,५०० | |
| ९ गुरांचा दवाखाना ... | ... | ६,५०० | |
| १० फलसंवर्धन ... | ... | ८०० | |
| ११ मेंढरांची पैदास ... | ... | ५,००० | |
| १२ बीं पुरवठा ... | ... | ५,००० | |
| १३ शेतकी खातें वाढ ... | ... | ६,००० | |
| एकूण ... | १४,९५,००० | १,४३,३५० | |

योजनांपासून चालू उत्पन्न सरासरी रु. ७३,००० सालिना येईल.

### तिसरीं पांच वर्षें

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ जमीन बांधणी ... | ... | ४०,८०० | |
| २ सुधारलेली शेती प्रचार ... | ... | ५,५०० | |
| ३ वृक्षारोपण ... | ... | ७०० | |
| ४ यांत्रिक शेती ... | ... | २३,००० | |
| ५ पाणीमुराईचीं व इतर धरणें ... | ... | ७,२०० | |
| ६ विहिरी खोदण्यास उत्तेजन ... | ... | ४,७५० | |
| ७ दुभत्या जनावरांची पैदास व दुग्धालय ... | ... | २७,००० | |
| ८ दुधाच्या धंद्याची वाढ ... | ... | १,५०० | |
| ९ गुरांचा दवाखाना ... | ... | ६,५०० | |
| १० फलसंवर्धन ... | ... | ८०० | |
| ११ मेंढरांची पैदास ... | ... | ५,००० | |
| १२ बीं पुरवठा ... | ... | ५,००० | |
| १३ शेतकी खातें वाढ ... | ... | ६,००० | |
| एकुण ... | ... | १,३३,७५० | |

योजनांपासून चालू उत्पन्न सरासरी रु. ७७,००० सालिना येईल.

### २ उद्योगधंदे

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ बरड येथें लोंकरीचें शिक्षण ... | | ३,००० | |
| २ फलटण येथें गुळवे-शिक्षण ... | | १,००० | |
| ३ खास उद्योगधंदे व मजूर अधिकारी ... | | ३,००० | |
| ४ औद्योगिक शिक्षणास मदत ... | | २,००० | |
| एकुण ... | | ९,००० | |

## ३ शिक्षण

### पहिलीं पांच वर्षें

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ सक्तीचें प्राथमिक शिक्षण ... | ... | ३७,५०० | रु. ७,५०० दर वर्षी वाढून पांचवे वर्षी |
| २ शिक्षकांचे पगारांत वाढ ... | ... | १६,५०० | पहिले वर्षी रु. १२,९००; दर वर्षी रु. ९०० नें वाढ होऊन पांचवे वर्षी |
| ३ शिक्षकांचें शिक्षण ... | ... | ५५० | ५ जास्त शिक्षक पाठवणें व शिष्यवृत्त्या. |
| ४ नवीन इमारती (प्राथमिक शाळांस) ... | ६०,००० | ... | रु. १२,००० दर वर्षी हल्लींहून जास्त |
| ५ शेतकी शाळा (पांच) ... | १०,००० | १०,००० | पहिले वर्षी रु. २,०००, दर वर्षी रु. २,०००नें वाढ |
| ६ लोकशाळा तरडगांव व बरड... | ५,००० | ५,००० | |
| ७ खेडेगांवांतील वाचनालयें ... | | | |
| ८ हायस्कूलला शेतकी बाजूची जोड ... | ... ५०,००० | १,००० | |
| ९ मुलींचें हायस्कूल ... | १,००,००० | १५,००० | उद्योग संवर्धन निधींतून कायम स्वरूपाचा खर्च |
| १० हायस्कूलला औद्योगिक शाळेची जोड ... | १,००,००० ... | | |
| एकूण ... | ३,२५,००० | ८५,५५० | |

दुसरीं पांच व पुढील वर्षे

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ सक्तीचें प्राथमिक शिक्षण ... | ... | ७५,००० | रु.४५,००० सहावे वर्षी व दर वर्षी रु. ७,५०० नें वाढ होत १० वे वर्षी |
| २ शिक्षकांचे पगारांत वाढ ... | ... | २१,४२० | सहावे वर्षी रु. १७,४०० व दर वर्षी रु. ९०० नें वाढ होत १० वे वर्षी |
| ३ शिक्षकांचें शिक्षण ... | ... | ५५० | |
| ४ नवीन इमारती ... | ६०,००० | ... | रु. १२,००० दर वर्षी |
| ५ शेतकी शाळा ... | ... | १०,००० | |
| ६ लोकशाळा ... | ... | ५,००० | |
| ७ खेडेगांवांतील शाळांस वाचनालयें | ... | १,००० | |
| ८, ९, १० हायस्कूल ... | ... | १५,००० | |
| एकूण ... | ६०,००० | १,२७,९७० | |

## ४ आरोग्य

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ इस्पितळ ... | २,६५,००० | ७६,८८० | |
| २ खेडेगांवचे दवाखाने ... | ६५,००० | ३३,३०० | |
| ३ सार्वजनिक आरोग्य खातें ... | १५,००० | ११,५४० | |
| एकूण ... | ३,४५,००० | *१,२१,७२० | |

*चालू खर्चाचे आंकडे एकूण होणाऱ्या खर्चाचे आहेत. हल्लीं या खात्यावर—
दरबार रु. २९,४२५, नगर रु. ७,२१६, लोकल बोर्ड रु. ५,४७७
एकूण रु. ४२,११८.
इतका खर्च होतो. हा जास्त होणारा वार्षिक खर्च काढण्यास वजा केला पाहिजे. म्हणजे जास्त वार्षिक खर्च–साधारणपणें–रु. ७९,६००.

## ५ नगर व ग्रामरचना

### पहिलीं पांच वर्षे

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ नगररचना | | | |
| (अ) रस्तेरुंदी व स्वच्छता यासाठीं जागा विकत घेणें | १०,००० | ... | |
| (आ) ३०० एकर जमीन शहर वाढीसाठीं विकत घेणें ... | ९०,००० | ... | |
| (इ) नवीन नगररचनेचा आराखडा (Master plan) तयार करणें ... | ५,००० | ... | |
| (उ) सध्यांचे रस्ते सुधारणें व नवीन रस्ते करणें ... | १,००,००० | ... | चालू खर्च नगरपालिकेनें सोसणें |
| (ए) पाणीपुरवठा सुधारणें ... | ५०,००० | ... | |
| (ऐ) ड्रेनेज सुधारणा ... | १,००,००० | १,००० | मैला विकला जाईपर्यंत नगरपालिकेस वार्षिक मदत |
| (ओ) सरकारी इमारती ... | १,४२,००० | ... | |
| २ ग्रामरचना | | | |
| (अ) नवीन रस्ते बांधणें व सध्यांचे रस्ते पुरे करणें | ४,४८,००० | ... | |
| (आ) पाणीपुरवठा ... | ५०,००० | ... | |
| (इ) खेडेगांवीं सफाई कामगारवर्गास घरें ... | ५०,००० | ... | |
| (उ) केंद्रगांवीं इमारती ... | ३६,००० | ... | |
| (ए) ग्रामरचना ... | १२,५०० | ... | |
| एकूण ... | १०,९३,५०० | १,००० | |

## दुसरीं पांच वर्षे

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ नगररचना | | | |
| (अ) चालू रस्ते सुधारणा व नवीन रस्ते ... | १,००,००० | ... | चालू खर्च नगर-पालिकेनें करणें |
| (आ) पाणीपुरवठा ... | २,००,००० | १,००० | |
| (इ) भूमिगत गटारें ... | १,००,००० | ... | |
| (उ) सरकारी इमारती ... | १,२६,००० | १,५०० | |
| २ ग्रामरचना | | | |
| (अ) नवीन रस्ते करणें व जुने सुधारणें ... | ४,३३,५०० | ३२,८०० | |
| (आ) पाणीपुरवठा ... | ... | ... | |
| (इ) सरकारी इमारती ... | ... | ५०० | |
| एकूण ... | ९,५९,५०० | ३५,८०० | |

## तिसरीं पांच वर्षे

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ नगररचना | | | |
| (अ) नवीन रस्ते करणें व जुने सुधारणें ... | १,००,००० | | |
| (आ) पाणीपुरवठा ... | २५,००० | | |
| (इ) ड्रेनेज ... | ७५,००० | | |
| (उ) सरकारी इमारती ... | ... | २,५०० | |
| २ ग्रामरचना | | | |
| (अ) नवीन रस्ते करणें व जुने सुधारणें ... | ३,७३,५०० | ३२,८०० | |
| (आ) सरकारी इमारती ... | ... | ५०० | |
| एकूण ... | ५,७३,५०० | ३५,८०० | |

### ६ इतर

| नांव | कायम स्वरूपाचा खर्च | दर वर्षी चालू खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ प्रचार ... | १६,००० | ६,५०० | |
| २ सहकार-खातें वाढ ... | ... | ५,००० | |

---

## परिशिष्ट इ

## ग्रामगट

### १ आदर्की गट

| | लोकसंख्या |
|---|---|
| केंद्र-आदर्की बु. ... | ७८५ |
| वडगांव ... | ३३२ |
| कोऱ्हाळें ... | २१३ |
| बिबी, घाटगेवाडी ... | १,११७ |
| कापशी ... | ५१२ |
| आळजापूर ... | ६१४ |
| आदर्की खु. ... | ९०८ |
| सालवें ... | ७१७ |
| एकूण ... | ५,१९८ |

### २ तरडगांव गट

| | लोकसंख्या |
|---|---|
| केंद्र- तरडगांव-(चव्हाणवाडी, विठ्ठलवाडी, भुर्कडवाडी, मळेवाडी, शेरीची वाडी हीं धरून) ... | ३,८१८ |
| हिंगणगांव ... | १,७८० |
| अरडगांव ... | ५८२ |
| कोपर्डें ... | ३ |
| तांबवें ... | १,१९० |
| कापडगांव ... | ३४७ |
| कोरेगांव ... | २८९ |
| सासवड ... | १,६९४ |
| नांदल ... | १,३७५ |
| काळज .. | ८७३ |
| कुसूर ... | ४८४ |
| पाडेगांव ... | १,१८२ |
| एकूण ... | १३,६१० |

### ३ साखरवाडी गट

| | लोकसंख्या |
|---|---|
| केंद्र–साखरवाडी–(होळ, पिंपळाचो वाडी धरून) | ... ३,६१५ |
| रावडी खु. | ... २७९ |
| रावडी बु. | ... ५५० |
| मुरूम | ... ५०४ |
| तडवळें | ... ८३८ |
| खामगांव | ... ८२३ |
| जिंती, फडतरवाडी | ... १,५९७ |
| सुरवडी | ... ९८७ |
| एकूण | ... ९,१९३ |

### ४ फलटण गट

| | लोकसंख्या |
|---|---|
| केंद्र–फलटण | ... ९,९२८ |
| सस्तेवाडी व झिरपेवाडी | ... ३,६०५ |
| निलकटी | ... १३९ |
| वडजळ | ... १४२ |
| निंभोरें | ... १,३१९ |
| मिरगांव | ... ४७३ |
| खडकी | ... ५६ |
| मलवडी | ... २८३ |
| वाठार | ... १,३१७ |
| वाखरी | ... ७९६ |
| तावडी | ... ९१ |
| दालवडी | ... ५०० |
| कुरवली खु. | ... ३२१ |
| मांडवखडक | ... १७३ |
| निर्गुडी | ... ६४७ |
| विंचुर्णी | ... २७१ |
| सास्कल | ... ५४१ |
| भाडळी बु. | ... २५८ |
| भाडळी खु. | ... २३० |
| सोनवडी बु. | ... २८७ |
| सोनवडी खु. | ... १९९ |
| तिरकवाडी | ... २३६ |
| विडणी | ... १,९८० |
| राजाळें | ... ८२४ |
| सोनगांव | ... ३९८ |
| सांगवी | ... १,०११ |
| सोमंथळी | ... ५२७ |
| कांबळेश्वर | ... ३०२ |
| वेळोशी | ... १९२ |
| सरडें | ... १,०७६ |
| एकूण | २८,२२४ |

### ५ बरड गट

| | |
|---|---|
| केंद्र–बरड | ... १,३२३ |
| वडलें | ... ५०९ |
| पिंपरद | ... ८५९ |
| दुधेबावी | ... १,३१७ |
| मिरढें | ... ४३३ |
| जावली | ... १,०२२ |
| अंदरूड | ... ७१३ |
| कुरवली बु. | ... ४७३ |
| राजुरी | ... ९३७ |
| एकूण | ... ७,५८६ |

### ६ निंबळक गट

| | |
|---|---|
| केंद्र–निंबळक–(मठाची वाडी धरून) | ... २,१४६ |
| साठें | ... ३४० |
| टाकळवाडें | ... ३७४ |
| गुणवरें | ... १,२३७ |
| मुंजवडी | ... ६५१ |
| असू, म्हारकवडी, ढवळेवाडी | ... १,९०१ |
| गोखळी | ... १,१८३ |
| एकूण | ... ७,८३२ |

# परिशिष्ट ऊ

## संस्थानची आर्थिक पाहणी

ह. कृ. परांजपे, बी. ए.

शेतकी उपसमितीनें केलेल्या सूचनांनुसार समितीनें संस्थानची आर्थिक पाहणी करण्याचें ठरविलें. अर्थातच समितीच्या कार्याचा अवधि बराच कमी असल्यामुळें संस्थानांतील कांहीं थोड्याच गांवांची नमुन्यादाखल पाहणी ( Sample Survey ) करण्याचें ठरविण्यांत आलें. संस्थानचे शेतीविषयक दृष्टीनें दोन विभाग पडतातः— पाटाखालीं ज्यांची जमीन भिजते अशीं गांवें व कोरडवाहू गांवें. या दोन विभागांचे पुन्हां पूर्व, मध्य व पश्चिम असे पोटविभाग पाडून या प्रत्येक पोटविभागांतील एक अशा सहा गांवांची पाहणी करण्याचें ठरविण्यांत आलें. प्रत्येक पोटविभागांतील गांव निवडतांना तें गांव त्या पोटविभागांतील सर्वसाधारण गांव आहे, विशेष परिस्थितीमुळें वेगळें नाहीं असें पाहण्याची काळजी घेण्यांत आली. याचबरोबर पाहणीचे वेळीं संस्थानांत प्लेगची सांथ बरीच पसरली असल्यानें प्लेग कमी असलेलीं गांवें निवडावीं लागलीं.

पाटाखालील भागांतील कुसूर, कांबळेश्वर व मुंजवडी आणि कोरडवाहू भागांतील बिबी, निर्गुडी व दुधेबावी या गांवांची पहाणी करण्यांत आली. प्रत्येक गांवांतील शक्य तितक्या कुटुंबांची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. प्रत्येक गांवांतून खालीलप्रमाणें कुटुंबांची माहिती गोळा करण्यांत आली.

| | |
|---|---|
| कुसूर ... | ... ११४ |
| बिबी ... | ... १६५ |
| कांबळेश्वर | ... ८९ |
| निर्गुडी ... | ... १४० |
| मुंजवडी ... | ... १२५ |
| दुधेबावी ... | ... २२५ |
| एकूण | ... ८५८ |

सहाहि गांवांतील लोकसंख्येचा बराच मोठा भाग या पाहणीचे कक्षेंत आला हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| गांव | लोकसंख्या १९४१ खानेसुमारी | लोकसंख्या आर्थिक पाहणी (१९४५) |
|---|---|---|
| कुसूर | ४८४ | ५८२ |
| कांबळेश्वर | ३०२ | ४४१ |
| मुंजवडी | ६५१ | ६२२ |
| बिबी | (घाटगेवाडी धरून) १११७ | ९०७ |
| निर्गुडी | ६४७ | ७५१ |
| दुधेबावी | १३१७ | १२५९ |
| एकूण... | ४५१८ | ४५६२ |

कुसूर, कांबळेश्वर व निर्गुडी या गांवांतील बहुतेक सर्व लोक पाहणीचे कक्षेंत आले असें दिसतें. बिबी या गांवची वेगळी लोकसंख्या उपलब्ध नाहीं पण तेथीलहि बहुतेक सर्व लोक पाहणींत आले असावे. मुंजवडी व दुधेबावी या गांवांत मात्र या चार गांवाहून थोडीं जास्त कुटुंबें वगळलीं गेलीं असावींत.

या 'प्राथमिक आर्थिक पाहणी' साठीं गोखले राजकारण अर्थशास्त्र संशोधन मंदिरानें वांईच्या पाहणीसाठीं तयार केलेलीं कोष्टकें कांहीं फेरबदल करून वापरण्यांत आलीं. पाहणी करतांना शेतकऱ्यांच्या एतद्विषयक अज्ञानामुळें बराच त्रास झाला. हिशेब वगैरे ठेवण्याची पद्धत नसल्यानें अंदाजानें आठवणीवरून माहिती सांगण्यानें ज्या चुका व्हावयाच्या त्या तर झाल्याच. शिवाय शेतांतील धान्याचें उत्पन्न व विक्री यांची माहिती लेव्ही स्कीमसाठीं घेत आहेत अशा कल्पनेनें ती माहितीहि नीट पुरविली गेली नसावी. उत्पन्नाची कोणतीहि बाब विचारतांच शेतकरी विश्वसनीय दिसेल असा कमींत कमी आंकडा सांगण्याचा प्रयत्न करतात असा अनुभव आला. यामुळें माणसें, त्यांचें वय, शिक्षण, कामाचा प्रकार, जनावरें, कर्ज, जमीन व तिची वांटणी याबाबतची माहिती वेगवेगळ्या उत्पन्नाचे माहितीपेक्षां जास्त विश्वसनीय आली असावी.

कोष्टक नं. १ मध्यें लोकसंख्येच्या वयवारीबद्दल माहिती देण्यांत आली आहे. प्रथम सर्व संस्थानांतील १९३१ च्या खानेसुमारीचे वयवारीचे आंकडे देण्यांत आलेले असून नंतर १९४५ मध्यें केलेल्या सहा गांवांच्या पाहणींतील आंकडे देण्यांत आले आहेत. अर्थात् माहितीचा काळ वेगळा असल्यामुळें व पाहणी केलेल्या गांवांची संख्या एकंदर संस्थानांतील गांवांचे मानानें बरीच कमी असल्यानें हे आंकडे एकमेकांशीं उत्तम तुलना करतां येण्यासारखे नाहींत हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

## कोष्टक नं. १—लोकसंख्येची वयवारी

| वयवारी | फलटण संस्थान (१९३१ ची खानेसुमारी) | | | | | | सहा गांवांची पाहाणी (१९४५) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | | स्त्रिया | | एकूण | | पुरुष | | स्त्रिया | | एकूण | |
| | संख्या | शेंकडेवारी | संख्या | शेंकडेवारी | संख्या | शेंकडेवारी | संख्या | शेंकडेवारी | संख्या | शेंकडेवारी | संख्या | शेंकडेवारी |
| ०–१ | ९१७ | ३·१ | ९६८ | ३·३ | १८८५ | ३·२ | ४५३ | १९·९ | ४०५ | १७·६ | ८५८ | १८·८ |
| १–५ | ३३८२ | ११·४ | ३४७२ | ११·८ | ६८५४ | ११·६ | | | | | | |
| ५–१० ... | ३८७० | १३·१ | ३५७२ | १२·२ | ७४४२ | १२·६ | ३८१ | १६·७ | ४१० | १७·७ | ७९१ | १७·३ |
| १०–११ | ३४४९ | ११·६ | ३१०७ | १०·६ | ६५५६ | ११·१ | ३३ | १·० | ३७ | १·६ | ७० | १·५ |
| ११–१५ | | | | | | | १८९ | ८·३ | १७३ | ७·५ | ३६२ | ७·९ |
| १५–२० | २३०७ | ७·८ | २४४६ | ८·२ | ४७५३ | ८ | | | | | | |
| २०–३० | ४७०२ | १५·९ | ५२६३ | १७·९ | ९९६५ | १६·९ | ७६० | ३३·५ | ८९७ | ३९ | १६५७ | ३६·३ |
| ३०–४० | ४२६२ | १४·४ | ४१११ | १४ | ८३७३ | १४·२ | | | | | | |
| ४०–५० | २९९७ | १०·१ | २९०९ | ९·९ | ५९०६ | १० | २०७ | ९·१ | १५२ | ६·६ | ३५९ | ७·८ |
| ५०–६० | २०८७ | ६ | १९६८ | ६·७ | ४०५५ | ६·९ | २४३ | १०·७ | २२२ | ९·६ | ४६५ | १०·२ |
| ६० व वर | १५१९ | ५·१ | १४५३ | ४·९ | २९७२ | ५ | | | | | | |
| एकूण ... | २९४९२ | १०० | २९२६९ | १०० | ५८७६१ | १०० | २२६६ | १०० | २२९६ | १०० | ४५६२ | १०० |

## कोष्टक नं. २—फलटण संस्थानांतील

| | पुरुष | | | | | | | | स्त्रिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिक्षित | | शिकणारे | | अशिक्षित | | एकूण | | शिक्षित | | शिकणाऱ्या |
| | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या |
| सहा गांवांची पाहणी | | | | | | | | | | | |
| ०– ५ | ... | ० | ... | ० | ४५३ | १०० | ४५३ | १०० | ... | ... | ... |
| ५–११ | १ | ·२ | १६५ | ४० | २४८ | ५९ | ४१४ | १०० | १ | ० | ४५ |
| ११–१५ | १० | ६ | ७२ | ३९ | १०७ | ५४ | १८९ | १०० | ५ | २ | ९ |
| १५ व वर | ३३३ | १९ | ७ | २० | ९७० | ८० | १२१० | १०० | २० | १ | ... |
| एकूण ... | २४४ | १० | २४४ | १० | १७७८ | ७८ | २२६६ | १०० | २६ | ० | ५४ |
| फलटण संस्थान (१९३१ खानेसुमारी) | | | | | | | | | | | |
| ०– ५ | ... | ... | ... | ... | ४२९९ | १०० | ४२९९ | १०० | ... | ... | ... |
| ५–१० | ८१ | २ | ... | ... | ३७८९ | ९७ | ३८७० | १०० | १८ | ० | ... |
| १०–१५ | १८२ | ४ | ... | ... | ३२६७ | ९५ | ३४४९ | १०० | ३५ | १ | ... |
| १५–२० | ३२३ | १४ | ... | ... | १९८४ | ८५ | २३०७ | १०० | ४४ | १ | ... |
| २० व वर | १७११ | १० | ... | ... | १३८५६ | ८९ | १५५६७ | १०० | १०७ | ० | ... |
| एकूण ... | २२९७ | ७ | ... | ... | २७१९५ | ९२ | २९४९२ | १०० | २०४ | ० | ... |

**साक्षरता**

| | | | | एकूण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अशिक्षित | | एकूण | | शिक्षित | | शिकणारे | | अशिक्षित | | एकूण | |
| संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी | संख्या | शेकडेवारी |
| ४०५ | १०० | ४०५ | १०० | ... | ... | ... | ... | ८५८ | १०० | ८५८ | १०० |
| ४०१ | ८९ | ४४७ | १०० | २ | ० | २१० | २४ | ६४९ | ७५ | ८६१ | १०० |
| १५९ | ९१ | १७३ | १०० | १५ | ४ | ८१ | २२ | २६६ | ७३ | ३६२ | १०० |
| १२५१ | ९८ | १२७१ | १०० | २५३ | १० | ७ | ० | २२२१ | ८९ | २४८१ | १०० |
| २२१६ | ९६ | २२९६ | १०० | २७० | ५ | २९८ | ६ | ३९९४ | ८७ | ४५६२ | १०० |
| ४४४० | १०० | ४४४० | १०० | ... | ... | ... | ... | ८७३९ | १०० | ८७ | १०० |
| ३५५४ | ९९ | ३५७२ | १०० | ९९ | १ | ... | ... | ७३४३ | ९८ | ७४४२ | १०० |
| ३०७२ | ९८ | ३१०७ | १०० | २१७ | ३ | ... | ... | ६३३९ | ९६ | ६५५६ | १०० |
| २४०२ | ९८ | २४४६ | १०० | ३६७ | ७ | ... | ... | ४३८६ | ९२ | ४७५३ | १०० |
| १५५९७ | ९९ | १५७०४ | १०० | १८१८ | ५ | ... | ... | २९४५३ | ९४ | ३१२७१ | १०० |
| २९०६५ | ९९ | २९२६९ | १०० | २५०१ | ४ | ... | ... | ५६२६० | ९५ | ५८७६१ | १०० |

## कोष्टक नं. ३—शेतकऱ्यानें केलेली जमीन; मालकीची व उपयोगाची वांटणी

| गांव | शेती करणारीं कुटुंबें | एकूण कुटुंबें | स्वतः केलेली जमीन | | | एकूण केलेली | उपयोग | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मालकीची | खंडानें घेतलेली | वाट्यानें घेतलेली | | बागाईत | | | जिराईत | पड |
| | | | | | | | पाटाखालीं | विहिरीखालीं | एकूण | | |
| पाटाखालील | | | | | | | | | | | |
| कुसूर | ११४ | ९९ | ४३५·४ | ४·४ | १०८·६ | ५४८·४ | २२८·२ | ३५·२ | २६३·४ | १८६·५ | ९८·५ |
| कांबळेश्वर | ८९ | ८३ | ५१७·४ | ५९·० | ८७·४ | ६६३·८ | २०९·६ | ४·० | २१३·६ | ३४६·५ | १०३·७ |
| मुंजवडी | १२५ | ११४ | ९५९·४ | १७·६ | १०३·२ | १०८०·२ | ३२०·७ | ९·७ | ३३०·४ | ६३९·४ | ११०·४ |
| एकूण... | ३२८ | २९६ | १९१२·२ | ८१·० | २९९·२ | २२९२·४ | ७५८·५ | ४८·९ | ८०७·४ | ११७२·४ | ३१२·६ |
| सरासरी | ... | ... | ६·४ | ०·२ | १·० | ७·७ | २·५ | ०·१ | २·७ | ३·९ | १·० |
| इतर | | | | | | | | | | | |
| बिबी | १६५ | १३४ | १०१२·८ | २९·८ | १२२·६ | ११६५·२ | १४·२ | १२१·१ | १३५·३ | ७२०·७ | ३०१·२ |
| दुधेबावी | २२५ | १९८ | ८९८·६ | ३०·५ | १६२·७ | १०९१·८ | ० | २४६·५ | २४६·५ | ६९८·८ | १४६·५ |
| निर्गुडी | १४० | ११९ | ४८५·३ | ९३·६ | १२३·५ | ७०२·४ | ४·८ | १६०·३ | १६५·१ | ४१३·४ | १२३·९ |
| एकूण... | ५३० | ४५१ | २३९६·७ | १५३·९ | ४०८·८ | २९५९·४ | १९·० | ५२७·९ | ५४६·९ | १८४०·९ | ५७१·६ |
| सरासरी | | - | ५·३ | ०·३ | ०·९ | ६·५ | ·० | १·१ | १·२ | ४·० | १·२ |
| एकूण सर्व गांवें | ८५८ | ७४७ | ४३०८·९ | २३४·९ | ७०८·० | ५२५१·८ | ७७७·५ | ५७६·८ | १३५४·३ | ३०१३·३ | ८८४·२ |
| सरासरी | | | ५·७ | ०·३ | ०·९ | ७·० | १·० | ०·७ | १·८ | ४·० | १·० |

कोष्टक नं. २ मध्यें संस्थानांतील शिक्षणाबाबतची माहिती १९३१ ची खानेसुमारी व सद्या गांवांची पाहणी यावरून दिलेली आहे. पाहणींत शिक्षित, अशिक्षित व शिकणारे असे तीन गट पाडून माहिती घेतली आहे तर खानेसुमारींत फक्त शिक्षित व अशिक्षित असे दोन गटच पाडलेले आहेत. त्यामुळें हे वेगवेगळे आंकडे एकमेकांशीं पूर्णपणें तुलना करतां येण्यासारखे नाहींत.

५-११ या वयाचीं ४० % मुलें व १० % मुली आज शाळेंत शिक्षण घेत आहेत असें पाहणीच्या आंकड्यांवरून दिसून येतें.

कोष्टक नं. ३ मध्यें जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यानें कसलेल्या एकंदर जमिनीच्या मालकीची वांटणी व जमिनीची वेगवेगळ्या तऱ्हेच्या उपयोगांतील वांटणी दाखविली आहे. दाखवलेले आंकडे हे प्रत्यक्ष एकरांचे आहेत.

कोष्टकावरून दिसून येतें कीं, सरासरी प्रत्येक शेतकरी ७ एकर जमीन कसतो. पाटाखालील गांवांमध्यें हें प्रमाण थोडें जास्त म्हणजे ७·७ एकर असून इतर गांवांत थोडें कमी म्हणजे ६·५ आहे. यापैकीं फारच मोठा भाग (५·७ एकर) स्वतःच्या मालकीच्या जमिनीचा असून लोकांची केलेली जमीन फारच थोडी (१·२ एकर) आहे. लोकांची जमीन करण्यास घेण्यांत खंडानें घेण्यापेक्षां वांट्यानें जमीन करण्यास घेण्याचा प्रघात जास्त रूढ आहे. या सर्व बाबतींत पाटाखालील गांवांत व इतर गांवांत फारसा फरक दिसून येत नाहीं.

जमिनीच्या उपयोगाचे वांटणीचे बाबतींत पाटाखालील गांवांमध्यें कसलेल्या जमिनीच्या ⅓ इतकी जमीन पाटाखालीं भिजलेली दिसते; विहिरीखालीं भिजणाऱ्या जमिनीचें प्रमाण फारच थोडें असून जवळजवळ ⅔ जमीन जिराईत पिकांखालीं आहे. कोरडवाहू गांवांमध्यें ⅕ इतकी जमीन विहिरीखालीं भिजलेली आढळते. पाहणींत आलेलीं दुधेबावी व निर्गुडी हीं कोरडवाहू गांवें बरीं अशीं बागाइती म्हणून ओळखिलीं जातात. तेव्हां हें प्रमाण बाकीच्या कोरडवाहू भागापेक्षां बरेंच जास्त आहे असें समजलें पाहिजे. पाटाखालीं भिजलेली म्हणून या गांवांत कांहीं जमिनीचा उल्लेख केला आहे. जुनीं धरणें व पाणीमुराईच्या धरणानें कांहीं काळ प्रत्यक्ष मिळणारें पाणी यानें भिजणाऱ्या जमिनीचा हा उल्लेख आहे. अशी जमीन अर्थात् फार थोडी आहे. या गांवांतील बाकीची कसलेली जमीन जिराईत पिकांखालीं आहे. सरासरी प्रत्येक कुटुंबानें कसलेल्या ६·५ एकरांपैकीं ४ एकर जिराईत पिकांखालीं आहेत.

सरासरी प्रत्येक कुटुंबामागें १ एकर जमीन पड आढळते. मात्र यांत वार्षिक टाकलेल्या पड जमिनीबरोबरच कायम पड राहिलेल्या जमिनीहि धरल्या गेल्या आहेत.

## कोष्टक नं. ४—जनावरें

| गांवें | कुटुंबें | | बैल | | गाई | | म्हशी | | खोंड व कालवडी | रेडे व रेड्या | शेळ्या | | मेंढी | कोंबडी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | जनावरें असलेली | कामाचे | निकामी | दुभत्या | भाकड | दुभत्या | भाकड | | | दुभत्या | भाकड | | |
| पाटाखालील | | | | | | | | | | | | | | |
| कुसूर | ११४ | १०५ | १०५ | ... | २९ | १४ | १ | ... | ६५ | ८ | १४२ | २८ | ६१२ | २३२ |
| कांबळेश्वर | ८० | ७२ | ७६ | २ | २५ | २७ | ३ | ४ | ४९ | ४ | १८६ | ... | ३११ | १३६ |
| मुंजवडी | १२५ | ९५ | १२५ | ... | ३६ | ४० | ४ | २ | ९० | ६ | २५० | ४५ | २१५ | १९५ |
| एकूण... | ३२८ | २७२ | ३०६ | २ | ९० | ८१ | ८ | ६ | २०४ | १८ | ५७८ | ७३ | ११३८ | ५६३ |
| राराररी... | ... | ... | ९.१ | ... | ०.३ | ०.२ | ०.०२ | ०.०२ | ०.७ | ०.०६ | २.१ | ०.२ | ४.१ | २ |
| इतर | | | | | | | | | | | | | | |
| विबी | १६५ | १२८ | ७८ | ... | ३० | १७ | ३ | १ | ६० | ८ | १९६ | १३ | १८० | १५६ |
| दुधेबावी | २२५ | १९४ | १३६ | १ | २५ | ३० | ८ | ... | ७९ | १६ | १३६ | २३ | ५४१ | १८८ |
| निर्गुडी | १४० | १२६ | १०६ | ... | २४ | ३० | ५ | १५ | ५८ | २७ | १२९ | १ | ५४० | १४५ |
| एकूण... | ५३० | ४४८ | ३२० | १ | ७९ | ७७ | १६ | १६ | १९७ | ५१ | ४६१ | ३७ | १२६१ | ४८९ |
| राराररी... | | ... | ०.७ | ... | ०.१ | ०.१ | ०.०३ | ०.०३ | ०.४ | ०.१ | १ | ०.०८ | २.८ | १ |
| एकूण राद्या गांवें | | | | | | | | | | | | | | |
| एकूण... | ८५८ | ७२० | ६२६ | ३ | १६९ | १५८ | २४ | २२ | ४०१ | ६९ | १०३९ | ११० | २३९९ | १०५२ |
| सरासरी... | ... | ... | ०.८ | ... | ०.२ | ०.२ | ०.०३ | ०.०३ | ०.५ | ०.०९ | १.४ | ०.१ | ३.३ | १.४ |

## कोष्टक नं. ५—जनावरापासून उत्पन्न

| गांव | कुटुंबें | | दूध | | | | | | | | | | | | अंडीं | | | | खत | | | | गोवऱ्या | | | | खवा | | विकलेली लोंकर किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | जनावरें असलेलीं | गाई | | | | म्हशी | | | | शेळ्या | | | | घरीं ठेवलेली संख्या | विकलेली | | एकूण | घरीं ठेवलेल्या गाड्यांची संख्या | विकलेलें | | एकूण गाड्या | घरीं ठेवलेल्या संख्या | विकलेल्या | | एकूण संख्या | विकलेला | | |
| | | | घरीं ठेवलेलें शेर | विकलेले शेर | विकलेले रुपये | एकूण शेर | घरीं ठेवलेले शेर | विकलेले शेर | विकलेले रुपये | एकूण शेर | घरीं ठेवलेले शेर | विकलेले शेर | विकलेले रुपये | एकूण शेर | | संख्या | रुपये | | | गाड्या संख्या | किंमत रुपये | | | संख्या | किंमत रुपये | | शेर | किंमत रुपये | |
| पाटाखालील— | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| कुसूर ... | ११४ | १०५ | ४१६० | ९६ | २४ | ४२५६ | ७२० | ... | ... | ७२० | २९३० | १०० | ३० | ३०३० | १२२३० | १०७०० | ७२५ | २२९३० | ३५४ | ८ | २८ | ३६२ | ... | २०० | ६ | २०० | ... | ... | १३० |
| कांबळेश्वर ... | ८९ | ७२ | २८२२ | ... | ... | २८२२ | ७८० | ... | ... | ७८० | ४२२ | ... | ... | ४२२ | १३४४० | ५२०० | २६२ | १८६४० | २७० | ... | ... | २७० | ७२०० | ... | ... | ७२०० | ... | ... | ... |
| मुंजवडी ... | १२५ | ९५ | ६१४२ | ... | ... | ६१४२ | १४२० | १२० | ३० | १५४० | ४२९७ | ... | ... | ४२९७ | ८४२६ | ६७२० | ६१६ | १५१४६ | ५४६ | ५ | १९ | ५५१ | ... | ... | ... | ... | ... | ... | १०२ |
| एकूण ... | ३२८ | २७२ | १३१२४ | ९६ | २४ | १३२२० | २९२० | १२० | ३० | ३०४० | ७६४९ | १०० | ३० | ७७४९ | ३४०९६ | २२६२० | १६०३ | ५६७१६ | ११७० | १३ | ४७ | ११८३ | ७२०० | २०० | ६ | ७४०० | ... | ... | २३२ |
| सरासरी ... | ... | ... | ४८'२ | ०'३ | ०'०८ | ४८'५ | १०'७ | ०'४ | ०'१ | ११'१ | २८'१ | ०'३ | ०'१ | २८'४ | १२५'३ | ८३'१ | ५'८ | २०८'५ | ४'३ | '०४ | ०'१ | ४'३ | २६'४ | ०'७ | ०'०२ | २७'२ | ... | ... | ०'८ |
| इतर— | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| बिबी ... | १६५ | १२८ | ३४१६ | १२० | ३० | ३५३६ | ८९० | ७३० | १९० | १६२० | ३४८३ | ... | ... | ३४८३ | ३३४० | ७७३० | ५२३ | ११०७० | ३४८ | १७ | २६ | ३६५ | १२०० | ... | ... | १२०० | ... | ... | १६ |
| दुधेबावी ... | २२५ | १९४ | १८९० | ८० | २० | १९७० | २७३० | ... | ... | २७३० | ४०९३ | ... | ... | ४०९३ | ५३५७ | ८०४७ | ५५२ | १३४०४ | २५४ | ... | ... | २५४ | ९००० | ... | ... | ९००० | ... | ... | १०८ |
| निर्गुंडी ... | १४० | १२६ | ५२३० | ... | ... | ५२३० | २१०० | ... | ... | २१०० | १००५ | ... | ... | १००५ | ७२५० | ६६०० | ३९३ | १३८५० | ४२२ | १० | २१ | ४३२ | ३६०० | ... | ... | ३६०० | २० | ३५ | १६३ |
| एकूण ... | ५३० | ४४८ | १०५३६ | २०० | ५० | १०७३६ | ५७२० | ७३० | १९० | ६४५० | ८५८१ | ... | ... | ८५८१ | १५९४७ | २२३७७ | १४६८ | ३८३२४ | १०२४ | २७ | ४७ | १०५१ | १३८०० | ... | ... | १३८०० | २० | ३५ | २८७ |
| सरासरी ... | ... | ... | २३'५ | ०'४ | ०'१ | २३'९ | १२'७ | १'६ | ०'४ | १४'३ | १९'१ | ... | ... | १९'१ | ३५'५ | ४९'९ | ३'२ | ८५'५ | २'२ | '०६ | ०'१ | २'३ | ३०'८ | ... | ... | ३०'८ | '०४ | '०७ | ०'६ |
| एकूण सहागांवें... | ८५८ | ७२० | २३६६० | २९६ | ७४ | २३९५६ | ८६४० | ८५० | २२० | ९४९० | १६२०५ | १०० | ३० | १६३३० | ५००४३ | ४४९९७ | ३०७१ | ९५०४० | २१९४ | ४० | ९४ | २२३४ | २१००० | २०० | ६ | २१२०० | २० | ३५ | ५१९ |
| सरासरी ... | ... | ... | ३२'८ | ०'४ | ०'१ | ३३'२ | १२ | १'१ | ०'३ | १३'१ | २२'६ | ०'१ | ०'४ | २२'६ | ६९'५ | ६२'४ | ४'२ | १३२ | ३ | '०५ | ०'१ | ३'१ | २९'१ | ०'२ | ... | २९'४ | '०२ | '०४ | ०'७ |

कोष्टक नं. ४ मध्यें गांवांतील शेतकऱ्याजवळील वेगवेगळ्या जनावरांची संख्या दाखवली आहे.

बैलांमध्यें कामाचे व निकामी असें वर्गीकरण केल्यावर निकामी बैलांची संख्या फारच थोडी आलेली आढळते. ही संख्या पूर्णपणें निकामी बैलांची असून अगदीं थोडें काम देणारे बैलहि 'कामाचे' या सदराखालीं धरले गेले असावेत असें दिसतें. कामाच्या बैलांचा शेतकऱ्यांस पडणारा तुटवडा या कोष्टकावरून दिसून येतो. सर्व गांवें मिळून जनावरें असणाऱ्या प्रत्येक कुटुंबामागें ०.८ बैल सरासरी येतो. जनावरें असणाऱ्या कुटुंबांची संख्या (७२०) ही शेती करणाऱ्या कुटुंबांचे (७४७) संख्येपेक्षां थोडी कमीच आहे हें ध्यानांत घेतल्यास या तुटवड्याचें स्वरूप जास्त लक्षांत येईल. पाटाखालील,गांवांमध्यें बैलांचें प्रमाण जास्त आहे. तेथें सरासरी दर कुटुंबामागें १.१ बैल येतो. उलट कोरडवाहू गांवांत हें प्रमाण कमी म्हणजे ०.७ वर जातें.

गाईंची संख्या याहून बरीच कमी आहे. गाईंचें प्रमाण दर कुटुंबामागें सरासरी ०.४ पडत असून त्यांपैकीं निम्या गाई दुभत्या व निम्या भाकड अशी वांटणी आहे. पाटाखालील गांवांत बैलांप्रमाणेंच गाईंचें प्रमाणहि इतर गांवांपेक्षां बरेंच जास्त आढळतें याचें कारण स्पष्टच आहे.

दुधाचा धंदा या भागांत जवळजवळ नाहींच हें म्हशींच्या संख्येवरून दिसून येईल. सरासरी दर कुटुंबामागें म्हशींचें प्रमाण ०.०६ इतकें पडत असून त्यांपैकीं निम्या दुभत्या व निम्या भाकड अशी वांटणी आहे. म्हशींच्या बाबतींत पाटाखालील गांवांपेक्षां कोरड्या गांवांतच जास्त चांगली स्थिति आढळून येते ही आश्चर्याची गोष्ट वाटेल. परंतु सरासरी दर कुटुंबास येणाऱ्या एकूण वैरणीचें प्रमाण इतर गांवांत पाटाखालील गांवांपेक्षां जास्त आहे हें लक्षांत घेतल्यास (कोष्टक ६ पहा) याचें कारण लक्षांत येईल.

शेळ्यांचें प्रमाण दर कुटुंबामागें १.५ इतकें असून पाटाखालील गांवांत जास्त (२.३) व इतर गांवांत कमी (१.०८) असें आढळतें.

लोकरीचा धंदा संस्थानच्या कांहीं भागांत विशेष चालतो हें मेंढ्यांचे संख्येवरून दिसून येईल. विशेषतः कुसूर, व निर्गुडी या गांवांत हें प्रमाण साधारणपणें सरासरी दर कुटुंबामागें ५ चे आसपास येतें. हें प्रमाण याहून जास्त असावें असें वाटतें. कारण एकाच मेंढपाळाजवळ बऱ्याच मेंढ्या असल्यामुळें थोड्या मेंढपाळांची माहिती जरी पाहणींत येऊं शकली नाहीं तरी प्रमाण कमी पडतें. कुसूर, दुधेबावी व निर्गुडी या गांवांतील मेंढ्यांची संख्या ५०० हून जास्त आहे.

कोंबडीं पाळण्याचा धंदा सर्व संस्थानांत लहान प्रमाणांत पण बरेचसे शेतकरी करतात हें कोष्टकावरून दिसून येतें. सरासरी दर कुटुंबामागें कोंबड्यांचें प्रमाण १·४ पडतें. पाटाखालील गांवांत हें प्रमाण २ असून इतर गांवांत १ आहे. कोणत्याहि एका गांवांत हें प्रमाण जास्त अगर कमी नसून सर्व पाटाखालील गांवांत साधारण सारखें व सर्व इतर गांवांत साधारण सारखें असें दिसतें.

कोष्टक नं. ५ मध्यें जनावरें असलेल्या कुटुंबांना जनावरांपासून मिळालेलें उत्पन्न दाखविलें आहे. त्यांत उत्पन्नाचा घरीं ठेवलेला भाग व विकलेला भाग आणि त्याची किंमत अशी वांटणी करून दाखविलेली आहे. आपल्या शेतींत शेतीबरोबरचे व्यवसाय (Mixed farming) फार कमी आहेत, हें या कोष्टकावरून दिसून येतें. सरासरीनें दर कुटुंबास जनावरांपासून वर्षास रु. ५·४ उत्पन्न मिळतें. पाटाखालील गांवांत हें प्रमाण रु. ६·९ इतकें असून इतर गांवांत रु. ४·४ आहे. यांतील सर्वांत मोठा वांटा अंड्याचे विक्रीचा असून नंतर लोंकर, म्हशीचें दूध, गाईचें दूध, खत, खवा व शेळीचें दूध असा क्रम आहे.

सरासरीनें दर कुटुंबास वर्षास १३२ अंडीं मिळत असून त्यांपैकीं जवळजवळ निम्मा भाग विक्रीस जातो. अंड्यांच्या विक्रीचा व्यवहार चांगला बसला असून घेवारी गांवीं अगर बाजारचे गांवीं अंडीं विकत घेऊन फलटण, लोणंद, बारामती, नातेंपुतें येथें विक्रीस पाठवतात. अंड्यांचा भाव रु. १३ इतका चांगला मिळतो.

लोंकर विक्रीचें उत्पन्न सरासरी दर कुटुंबास ०·७ रुपये इतकें पडतें. यांत फक्त विकलेली लोंकर धरलेली आहे. इतर गांवांत विशेषतः दुधेबावी येथें अनेक मेंढपाळांचे स्वतःचे माग आहेत. त्या लोंकरीचें उत्पन्न बरेंच असून तें येथें धरलें गेलेलें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

गाईच्या दुधाचें उत्पन्न पाटाखालील गांवांत दर कुटुंबामागें ४८·५ शेर असून इतर गांवांत २३·९ शेर आहे. यांपैकीं फारच थोडा भाग विकला जात असून बहुतेक सर्व दूध घरींच खर्च होतें. म्हशीच्या दुधाचें उत्पन्न या मानानें फारच कमी (पाटाखालील गांवें—सरासरी ११·१ शेर; इतर गांवें—सरासरी १४·३ शेर) असूनसुद्धां त्यांतील विक्री गाईच्या दुधाच्या विक्रीपेक्षां दुपटीहून जास्त आढळते.

शेळ्या या बहुधा मुलांना दूध मिळावें यासाठींच पाळल्या जात असल्यानें त्यांच्या दुधाची विक्री फारशी आढळत नाहीं.

सरासरी प्रत्येक कुटुंबास पाटाखालील भागांत ४·३ गाड्या व इतर भागांत २·३ गाड्या खत निघतें. यांतहि विक्रीचें प्रमाण फारच थोडें आहे. शेणाच्या गोवऱ्या करून विकण्याचा प्रघातहि फारसा दिसत नाहीं.

दुधापासून लोणी, तूप, खवा वगैरे करण्याचा धंदा म्हशीचें दूधच फार थोडें असल्यानें जवळजवळ नाहींच. फक्त निर्गुडी या गांवांत खवा करण्याचा धंदा थोडा चालू आहे.

कोष्टक नं. ६ मध्यें पिकलेलीं वेगवेगळीं धान्यें व वैरण, त्यांची घरीं ठेवलेलें व विकलेलें अशी वांटणी व विकलेल्या भागाची किंमत ही माहिती दाखवली आहे. जनावरांपासून येणाऱ्या उत्पन्नाचे माहितीप्रमाणेंच या माहितीवरूनहि संस्थानांतील शेतीचा धंदा फक्त पोट भागवण्यापुरता कसा आहे हें दिसून येईल. सर्व धान्यें मिळून दर कुटुंबास सरासरी ७·१ मण धान्य होतें. यापैकीं फक्त १·५ मण धान्य विक्रीस जातें. बहुतेक सर्व (१ मण) विक्री ज्वारीची आहे. राहिलेल्यांतील मोठा भाग (०·४) बाजरी असून इतर धान्यांची विक्री अगदींच थोडी आहे. सरासरी प्रत्येक कुटुंबाचे घरीं ठेवलेलें एकूण धान्य अवघें ५·७ मण भरतें. यावरून शेतकरी शेतीचे धंद्यावर पोटसुद्धां भागवूं शकत नाहीं हें दिसून येतें. पाटाखालील गांवांची स्थितीसुद्धां या बाबतींत कोरडवाहू भागापेक्षां मोठीशी चांगली आहे असें नाहीं. बागायती पिकांचे बाबतींत, विशेषतः उंसाचे बाबतींत, पाटाखालील गांवांचें उत्पन्न जास्त असलें तरी या कोष्टकांत दाखवलेल्या पिकांचे बाबतींत पाटाखालील गांवांचें उत्पन्न इतर गांवांहून कमी दिसतें. पाटाखालील गांवांत एकूण होणाऱ्या धान्याचें प्रत्येक कुटुंबामागें सरासरी प्रमाण ६·५ मण पडतें तर कोरडवाहू गांवांत तें प्रमाण ७·६ पडतें.

वेगवेगळ्या पिकांचे बाबतींत, प्रत्येक कुटुंबाचें सरासरी उत्पन्न लक्षांत घेतल्यास, ज्वारी, बाजरी, खपला, साळ, हरभरा, भुइमूग, मटकी, तूर, करडी, हुलगे असा उत्पादित मालाचा क्रम लागतो. ज्वारीचें उत्पादन पाटाखालील व कोरडवाहू या दोनहि भागांत सारखेंच दिसतें. बाजरीचें उत्पादन मात्र कोरडवाहू भागांत पाटाखालील भागापेक्षां बरेंच जास्त दिसतें. खपला गहूं दोन्ही भागांत साधारण सारखाच होतांना दिसतो तर साळीचें व हरभऱ्याचें उत्पादन पाटाखालील भागांत बरेंच जास्त असलेलें आढळून येतें. मटकी, हुलगे, मूग वगैरे धान्यें थोडयाच प्रमाणांत व तींहि फक्त कोरडवाहू भागांत आढळून येतात. याचा अर्थ पाटाखालील गांवांत तीं मुळींच येत नसावींत असा नाहीं. हीं पिकें अगदींच थोडीं काढलीं जात असल्यामुळें व पाटाखालील गांवांत इतर, विशेषतः बागायती, उत्पादन बरेंच असल्यामुळें तीं नमूद केलीं गेलीं नसावींत. भुइमूग व करडी या गळिताच्या धान्यांचें उत्पादन फारच थोडें आढळतें. फलटण येथें तेलाचे घाणे असले तरी गळिताचीं धान्यें मात्र तेल्यांस बाहेरून कां आणावीं लागतात हें येथें लक्षांत येईल.

कडब्याचें सरासरी दर कुटुंबामागें प्रमाण ५४७·५ पेंढ्या असें बसत असून पाटाखालील गांवांत तें जास्त ६५४·१ व इतर गांवांत कमी ४७८·९ बसतें. विक्रीचें प्रमाण अगदींच थोडें असून दोन्ही प्रकारच्या गांवांत २ रुपयांचे आंत आहे. कोरडवाहू गांवांत बाजरीचें उत्पादन बरेंच जास्त असल्यानें सरमाडाचें प्रमाणहि त्या गांवांत पाटाखालील गांवांपेक्षां पुष्कळच जास्त आहे. सरमाडाची विक्री अगदींच थोडी आहे.

## कोष्टक नं. ७—बागाईत पिकांच्या विक्रीचें उत्पन्न

| गांवें | कुटुंबें | | ऊंस | कांदे | केळीं | मोसंबी | डाळिंबें | कलिंगडें | एकूण बागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | शेतकरी | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| पाटाखालील | | | | | | | | | |
| कुसूर | ११४ | ९९ | ४६५० | १८८ | ... | ... | ... | ... | ४८३८ |
| कांबळेश्वर | ८९ | ८३ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| भुंजवडी | १२५ | ११४ | ९००० | ... | ... | ३५० | .... | ... | ९३५० |
| एकूण... | ३२८ | २९६ | १३६५० | १८८ | ... | ३५० | ... | ... | १४१८८ |
| सरासरी | | | ४६.१ | ०.६ | ... | १.१ | ... | ... | ४७.९ |
| इतर | | | | | | | | | |
| विधी | १६५ | १३४ | ... | ४ | ... | ... | ... | ... | ४ |
| दुधेबावी | २२५ | १९८ | ७५०० | ४ | ३८५ | ... | ५० | ३१ | ७९७० |
| निर्गुडी | १४० | ११९ | ... | ७०० | २५० | १००० | ... | ... | १९५० |
| एकूण... | ५३० | ४५१ | ७५०० | ७०८ | ६३५ | १००० | ५० | ३१ | ९९२४ |
| सरासरी | | | १६.६ | १.५ | १.४ | २.२ | ०.१ | ०.०६ | २२ |
| एकूण सहा गांवें | ८५८ | ७४७ | २११५० | ८९६ | ६३५ | १३५० | ५० | ३१ | २४११२ |
| सरासरी | | | २८.३ | १.१ | ०.८ | १.८ | ०.०६ | ०.०४ | ३२.४ |

कोष्टक नं. ७ मध्यें बागाइती पिकांच्या विक्रीचें उत्पन्न दाखविण्यांत आलेलें आहे. कोष्टकांत घेण्यांत आलेल्या पिकांचा बहुतेक सर्व भाग विक्रीकडेच जात असल्यामुळें या पिकांच्या विक्रीचें रोख उत्पन्न हेंच या कोष्टकांत दाखविण्यांत आलें आहे. शिवाय माहिती घेतांना असें आढळून आलें कीं या पिकांचें उत्पन्न नक्की किती झालें हें बऱ्याच शेतकऱ्यांस सांगतां येत नाहीं. कांहीं जणांनीं माल उक्ता विकलेला असतो. कांहीं जण उंसाच्या गाड्या विकतात; कांहीं गूळ करून विकतात; कांहीं दोन्ही करतात. यामुळें त्या पिकांचें उत्पन्न त्यांच्या विक्रीपासून आलेल्या रोख उत्पन्नावरून दाखविणेंच जास्त शक्य दिसलें.

पाटाखालील गांवांतील बागाइती पिकांत उंसाचें पीक अतिशय महत्त्वाचें असलेलें दिसून येतें. सरासरीनें दर कुटुंबामागें बागाइती पिकांचे विक्रीपासून रु. ४७·९ आलेले आहेत. त्यांपैकीं रु. ४६·१ इतके उंसापासून आलेले आहेत. पाटाखालील तीन गांवांपैकीं कांबळेश्वर या गांवांत उंसापासून मुळींच उत्पन्न आलेलें नाहीं असें कोष्टकावरून दिसतें. या गांवांत फक्त ५॥ एकर ऊंस व तोहि नवीनच लावलेला होता. इतर शेतकऱ्यांस ऊंस लावण्याची परवानगी मिळालेली नाहीं. इतर बागाइती पिकांचें प्रमाण या भागांत फारच कमी आहे.

कोरडवाहू गांवांपैकीं दुधेबावी या गांवांत केळीं, डाळिंबें, कलिंगडें वगैरे चांगली बागाईत असून ऊंसहि लावलेला आहे. निर्गुडीमध्येंहि कांदे, केळीं, मोसंबीं यांचें चांगलें उत्पन्न आढळतें. बिबी या गांवांत बागाईत फारच थोडी आहे. या गांवांमध्यें सरासरी बागाइती उत्पन्न रु. २२ पडत असून त्यांत उत्पन्न देणाऱ्या पिकांचा क्रम ऊंस, मोसंबीं, कांदे, केळीं, डाळिंबें व कलिंगडें असा आहे.

कोष्टक नं. ८ मध्यें शेतकऱ्यांनीं काढलेल्या कर्जासंबंधीं माहिती दिलेली आहे. सावकारासंबंधीं माहिती, त्याची जात व वास्तव्य अशा दोन तऱ्हांनीं दाखविली असून, कर्जाची रक्कम, व्याजाचा दर, तारण, कर्ज काढण्याचें कारण, काळ, यांच्या वेगवेगळ्या प्रकारांनीं किती व्यवहार झाले त्याची माहिती दिली आहे. त्यानंतर आजच्या एकूण देण्याचा आंकडा दिला असून पुढें कर्जाचा इतिहास नमूद केला आहे.

कर्ज काढणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण सर्व कुटुंबांशीं शें. ४८ असें पडतें. पाटाखालील गांवांत हें प्रमाण शें. ४१ इतकें कमी असून कोरडवाहू गांवांत जास्त म्हणजे शें. ५० आहे. कर्ज काढणाऱ्या कुटुंबांची संख्या व एकंदर व्यवहारांची संख्या यांचें प्रमाण १ : १·५ असें पडतें. कर्ज घेणाऱ्यांमध्यें शेतकरी व इतर व्यवसायी असे भाग पाडले आहेत त्यांत अर्थातच शेतकऱ्यांची संख्या जास्त भरते. सावकारांमध्यें मराठा व धनगर जातींचें प्रामुख्य आढळतें हें खालीं शेतकरी–सावकारांच्या व्यवहारांची संख्या सर्वांत मोठी असलेली दिसते त्यास पूरक असें आहे. त्यांचेखालीं वाणी, जैन वगैरेंचा व नंतर इतर हिंदु, इतर अस्पृश्य, महार व ब्राह्मण असा क्रम लागतो.

सावकारांचे वास्तव्याचे बाबतींत गांवचा, संस्थानांतील इतर गांवचा, बाहेरील व शेवटीं फलटणचा, असा क्रम लागतो.

कर्जाच्या मुद्दलाचें वर्गीकरण पाहतां १०० ते १५० या वर्गांत सर्वांत जास्त (१८२) व्यवहार झालेले दिसतात. ४९ व आंत, ५० ते १०० व १५० ते २०० या प्रत्येक वर्गांत साधारण ९० चे आसपास इतके व्यवहार झालेले आहेत. शेतकऱ्यास लहान कर्जाची जरूरी किती भासते हें एकूण ६०४ व्यवहारांपैकीं ४६० व्यवहार २०० रु. चे आंतील मुद्दलाचे आहेत यावरून लक्षांत येईल.

व्याजाच्या दराचे वर्गीकरणांत रु. १६ ते २० या दरानें ⅓ हून जास्त व्यवहार झालेले दिसतात. एक रुपयास दर महिन्यास एक पैसा व्याज हा दर शेतकऱ्यांत फार प्रचलित आहे हें यावरून दिसून येईल. त्याहून खालीं क्रम रु. ११ ते १५ या दराचा लागतो. कोऑपरेटिव्ह सोसायट्यांचा व्याज वेळीं न देणाऱ्यांना १२॥ दर असल्यामुळें या दरांत बरेच व्यवहार आढळून येत असावेत. २१ ते २५ व २६ ते ३० यापेक्षां ३१ ते ४० या दरांत व्यवहार जास्त दिसतात याचें कारण एक रुपयास दर महिन्यास २ पैसे हा दरसुद्धां बरेच ठिकाणीं प्रचलित आहे हें असावें. एकंदर व्यवहारांत कबजे गहाणाच्या व्यवहारांचें प्रमाण ११ स १ पडतें. साधारण व्यवहार बिनव्याजी कर्जाचे आहेत.

कर्जास कोणतेंहि तारण नसल्याचे व्यवहार जवळजवळ निम्मे आहेत. त्यांत फार मोठी संख्या हातउसन्या कर्जांची आहे. शेतकरी माहितीच्या शेतकऱ्यांस कर्ज देतांना व्याजाचा दर मोठा लावत असले तरी तारण मागत नाहींत असें याचें कारण असावें. प्रॉमिसरी नोटीचे तारणावर झालेल्या व्यवहारांची संख्या एकंदर व्यवहारांचे संख्येच्या ⅙ हून थोडी जास्त आहे. तारणगहाण जमीन या वर्गांत त्याहून थोडे जास्त व्यवहार येतात. कबजेगहाण जमीनीचे व्यवहार यांचेहून फारच कमी (जवळजवळ निम्मे) दिसतात. तारणगहाण घर अगर ऐवज अगर कबजेगहाण जमीन यांवर अगदींच थोडे व्यवहार झालेले आहेत.

कर्ज काढण्याच्या कारणांचें वर्गीकरण पाहतां अनुत्पादक कारणांसाठीं काढलेलीं कर्जे व उत्पादक कारणांसाठीं काढलेलीं कर्जे यांच्या संख्या साधारण सारख्याच (एकूण व्यवहारांच्या शें. ४० इतक्या) असलेल्या दिसतात. अनुत्पादक कारणांत फार मोठा वांटा प्रापंचिक खर्चाचा असून लग्न इत्यादि धार्मिक कार्यांचा वांटा त्या मानानें बराच लहान आहे. उत्पादक खर्चांत जमिनीवरील खर्च, जनावरांसाठीं खर्च व इतर धंद्यासाठीं खर्च या कारणांची साधारण सारखीच संख्या आढळते. एकूण व्यवहारांपैकीं ७ टक्के व्यवहार जुनें कर्ज फेडण्यासाठीं झालेले आहेत.

कर्ज काढलेल्या काळाचें वर्गीकरण करतांना युद्धकाळांतहि शेतकऱ्यांची स्थिति पुरेशी सुधारली नाहीं असें गेल्या दोन वर्षांत काढलेल्या कर्जांच्या मोठ्या संख्येवरून

दिसतें. एकंदर व्यवहारांशीं गेल्या दोन वर्षांत झालेल्या व्यवहारांचें प्रमाण हें पाटाखालील गांवांत कोरडवाहू गांवांपेक्षां जास्त असलेलें दिसतें. यावरुन असेंहि एक अनुमान काढतां येईल कीं गेल्या दोन वर्षांत शेतीधंद्यास तेजी चढल्यामुळें धंद्यांत घालण्यासाठीं हीं कर्जें काढलीं गेलीं असावींत. विशेषतः गुळाचे भाव चढल्यामुळें ऊंस लावण्यास बऱ्याच शेतकऱ्यांनीं सुरवात केली. त्यासाठीं हीं कर्जें काढलीं जाणें शक्य आहे.

आजचें एकूण देणें पाटाखालील गांवांत सरासरी दर कुटुंबास ४०१·१ इतकें असून प्रत्येक व्यवहार सरासरी रु. २६५·४ चा आहे. कोरडवाहू गांवांत हें प्रमाण बरेंच कमी — दर कुटुंबास सरासरी रु. २९२·८ व दर व्यवहार रु. १९५·४ चा — पडतें. पाटाखालील गांवांतील जमीन हें जास्त चांगलें तारण समजलें जात असल्यानें व तेथील शेतीधंदा हा जास्त भांडवली असल्यानें असें होणें साहजिक आहे.

निम्म्याहून जास्त व्यवहारांत, कर्जांत व आतांचे देण्यांत फरक नाहीं; व त्यांतील मोठा वांटा व्याज वेळचे वेळीं गेलेल्या कर्जांचा आहे. कमी झालेल्या कर्जांची संख्या फारच कमी आहे. एक तृतीयांशाहून जास्त व्यवहारांत कर्ज वाढलें असून गेल्या दोन वर्षांचें व्याज थकलेल्यांची संख्या बरीच मोठी आहे. यावरुनहि युद्धकाळांत शेतकऱ्यांची स्थिति फारशी सुधारली नसावी असें दिसतें.

कोष्टकाचे दुसऱ्या भागांत हीच सर्व माहिती वेगवेगळ्या सावकारांचे प्रकारावर दिली आहे. सर्वांत जास्त (निम्म्याहून अधिक) व्यवहार शेतकरी–सावकारांनीं केलेले आढळतात. अर्थातच शेतकऱ्यांनीं गांवांतले गांवांत जास्त कर्ज दिलेलीं आढळतात. १०० ते १५० रुपये मुद्दलाचीं कर्जें शेतकरी–सावकारांनीं सर्वांत जास्त दिलेलीं आहेत. यांनीं केलेल्या व्यवहाराचा बराच मोठा भाग रु. २०० चे आंतील व्यवहारांचा आढळतो. एक पैसा दर (द. सा. द. शें. रु. १८॥।) हा यांच्यांत जास्त प्रचलित असलेला आढळतो. हातउसनीं दिलेलीं कर्जें यांचे व्यवहारांत बरींच (शें. ४४) आढळून येतात. तारणामध्यें प्रमुख प्रकार प्रॉमिसरीनोट, कबजेगहाण जमीन व तारणगहाण जमीन हे याच अनुक्रमानें आढळून येतात. विशेषतः कबजेगहाण जमिनीचे तारणावर झालेल्या व्यवहारांपैकीं बराचसा व्यवहार याच वर्गानें केलेला दिसतो याचें कारण उघडच आहे.

राहिलेल्या वर्गांचा क्रम व्यापारी, सोसायटी, सावकार व धनगर असा लागतो. खेडेगांवांत व्यापार करणाऱ्यांचा एक प्रमुख पोटधंदा सावकारी हाच असतो हें लक्षांत घेतल्यास त्यांच्या जास्त संख्येचें कारण सहजच लक्षांत येईल. पाहणीच्या गांवांपैकीं मुंजवडी हें गांव सोडून सर्व गांवीं सोसायटी असूनहि सर्व व्यवहारांच्या फक्त शें. ८ इतके व्यवहारच सोसायटीचे आहेत याचें कारण सोसायटीचे तारणाबाबतचे व कर्ज वापरण्याबाबतचे कडक नियम हें असावें. सोसायटीच्या व्याजाचा दर शेतकरी व व्यापारी

सावकारांहून बराच कमी आहे. पण इतर वर्गांतील सावकार हातउसन्या कर्जापासून वेगवेगळ्या सर्व प्रकारच्या तारणावर कर्ज देतांना दिसतो. सोसायटीचे सर्व व्यवहार तारणगहाणावर चालतात. त्यामुळें दुसऱ्या सावकारांकडून कर्ज काढणें शेतकऱ्यांस जास्त परवडतें असें दिसतें.

वेगवेगळ्या वर्गांनीं दिलेल्या कर्जाकडे पाहतां सोसायटीनें केलेल्या व्यवहारांचा बराच भाग रु. १०० ते ३०० या मुद्दलाच्या कर्जाचा असलेला दिसतो. सावकारी ज्यांचा धंदा नोंदला गेला आहे अशांनीं दिलेलीं कर्जे '४९ व आंत' या वर्गापासून ते '३०० ते ४००' या वर्गापर्यंत साधारण सारखीं वांटलेलीं दिसतात. व्यापाऱ्यांनीं दिलेल्या कर्जाचा बराचसा भाग ३०० रु. पर्यंतच्या कर्जाचा दिसतो.

सोसायटीचे व्याजाचे दर ९॥ व १२॥ असे आहेत. सावकारांचे व्यवहार ११ ते १५ या दरांत सर्वांत जास्त आहेत. व्यापाऱ्यांचे व्यवहार १६ ते २० या दरांत जास्त आहेत.

तारणाचे बाबतींत व्याज नसलेले खात्यावरील व्यवहार अर्थातच व्यापाऱ्यांत जास्त सांपडतात. बाकीच्या बाबतींत वेगवेगळ्या वर्गांत फारसा फरक दिसून येत नाहीं. कोणत्या कारणासाठीं कर्ज दिलें हें बघतां सोसायटीनें दिलेल्या कर्जांचा सर्वांत मोठा भाग जमीन घेणें व उत्पादक कारणांत आढळतो तर इतर सर्वांनीं दिलेल्या कर्जापैकीं बऱ्याच कर्जाचें कारण प्रापंचिक खर्च हें असल्याचें दिसतें.

कर्जाचा काळ पाहतां सोसायटीनें गेल्या दोन वर्षांत फारच थोडीं कर्जे दिलेलीं आढळतात. त्याचे आधीं मात्र सोसायटीचीं कर्जे नियमित घेतलीं गेलीं असल्याचें दिसतें. तेव्हां सोसायटीचे व्यवहारांत जुन्या कर्जाचें प्रमाण बरेंच जास्त आहे. अशा लांब मुदतीच्या जुन्या कर्जाचें प्रमाण इतर सावकारांच्या व्यवहारांत बरेंच कमी आहे. सावकारांच्या वेगवेगळ्या वर्गाचें एकंदर कर्जव्यवहारांतील स्थान खालील शेंकडेवारी-वरून लक्षांत येईल.

| वर्ग | | शें. व्यवहारसंख्या | | शें. देणें |
|---|---|---|---|---|
| सोसायटी | ... | ८ | ... | १३ |
| सावकार | ... | ५ | ... | ६ |
| व्यापारी | ... | १४ | ... | १६ |
| शेतकरी | ... | ५३ | ... | ४७ |
| धनगर | ... | ४ | ... | ३ |
| इतर | ... | १३ | ... | १२ |

कोष्टक नं. ९ मध्यें शेतकऱ्यांनीं कसलेल्या शेतजमिनीच्या आकाराप्रमाणें त्यांचे गट पाडून त्या गटांची माहिती दिलेली आहे. शेतजमिनीचा आकार लक्षांत घेतांना येथें

वेगवेगळ्या प्रकारच्या सर्व जमिनींचें जिराईत जमिनींत पुढील प्रमाणांत रूपान्तर केलें आहे:- १ एकर पाटाखालीं भिजणारी जमीन = ४ एकर जिराईत जमीन; १ एकर विहिरीखालीं भिजणारी जमीन = २ एकर जिराईत जमीन. जमिनीचे आकारांत फक्त कसलेल्या जमिनीचा अंतर्भाव केलेला आहे. अशा तऱ्हेनें सर्व जमिनींचें जिराईत एकरांत मापन करून घेऊन मग कसणाऱ्या शेतकऱ्यांचे केलेल्या जमिनीच्या आकारावर आठ गट पाडले आहेत. याशिवाय शेतमजुरी हा मुख्य धंदा असणाऱ्यांचा एक व इतर धंदा करणाऱ्यांचा एक असे दोन गट पाडले आहेत.

वेगवेगळ्या गटांत असणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण पहातां (२० ते २५ एकरांचा) ओ गट सोडून बाकी सर्व शेतकरी गटांत साधारण सारखी वांटणी झालेली दिसते. त्यांतले त्यांत ए (१० ते १५ एकर) गटांत जास्त संख्या असलेली दिसते. पाटाखालील गांवें व कोरडवाहू गांवें यांच्या वेगवेगळ्या आंकड्यांकडे पाहतां अ गटापासून औ गटापर्यंत पाटाखालील गांवांत चढता क्रम व कोरडवाहू गांवांत उतरता क्रम साधारणपणें आढळून येतो. पाटाखालीं भिजणाऱ्या जमिनीची ४ जिराईत एकरांशीं मापनांत बरोबरी केली असल्यामुळें असें होणें साहजिक आहे. केवळ शेतमजुरी करणाऱ्या गटांचें प्रमाण दोन्ही प्रकारच्या गांवांत सारखेंच दिसतें तर इतर धंदा करणाऱ्यांचें प्रमाण कोरडवाहू गांवांत मोठें दिसतें.

केलेल्या जमिनींत लोकांच्या केलेल्या जमिनीचें प्रमाण फारच थोडें आहे हें वरील जमिनीबाबतच्या कोष्टकांत दिसलेंच आहे. लोकांची केलेली जमीन ही जास्त मोठ्या जमिनींच्या गटांत वाढत जातांना दिसते. बरीच जमीन असलेले शेतकरी स्वतः जमीन न कसतां कांहीं वेळां लोकांस करण्यास लावून देतात हें याचें कारण असावें.

कुटुंबांतील एकूण माणसांची संख्या औ शिवाय सर्व शेतकरी गटांत वाढत्या जमीनगटाबरोबर फारच थोडी वाढलेली दिसते. विशेषतः पाटाखालील गांवांत ही वाढ अतिशयच थोडी आहे. इतर गांवांत हें प्रमाण त्या मानानें जास्त वाढतांना दिसतें. औ गटांत ही वाढ एकदम बरीच दिसून येते. मोठ्या जमिनी या संयुक्त कुटुंब असल्यामुळें तशा राहणें हें याचें एक कारण असूं शकेल. केवळ शेतमजुरी व इतर धंदा करणाऱ्यांत सरासरी कुटुंबांतील माणसांची संख्या शेतकऱ्यांपेक्षां कमी असलेली दिसते.

न मिळवत्या माणसांची संख्या वाढत्या जमिनीच्या गटांबरोबर थोड्या प्रमाणांत पण वाढतांना दिसते. मिळवत्या माणसांत शेती व शेतमजुरी करणाऱ्यांचें प्रमाण तसेंच वाढत जातांना दिसतें. शेतीबरोबर इतर धंदा करणाऱ्यांचें व केवळ शेतमजुरी करणाऱ्यांचें प्रमाण मात्र अर्थातच वाढत्या जमीनगटाबरोबर कमी होत जातें. केवळ शेतमजुरी करणाऱ्यांची व केवळ इतर काम करणाऱ्यांची संख्या शेतकरी गटांत फारच कमी आढळते.

उत्पन्नाचे आंकडे फक्त रोख मिळालेल्या उत्पन्नाचे आहेत. बलुत्याच्या उत्पन्नाची मात्र किंमत करून लिहिलेली आहे. घरीं ठेवलेल्या शेतमालाचें व जनावरांपासून मिळालेल्या पदार्थांचें फार मोठें उत्पन्न यांतून वगळलें गेलें आहे हें लक्षांत ठेवून या आंकड्यांकडे बघितलें पाहिजे. मजुरीपासून मिळणारें उत्पन्न हें शेतमजुरी हा मुख्य धंदा असणाऱ्यांमध्यें सर्वांत जास्त (पाटाखालीं १४८·४; कोरडवाहू १११·२) असून वाढत्या जमिनीच्या गटांमध्यें तें कमी कमी होत गेलें आहे व औ गटांत तें फारच कमी आहे. गाडीभाडें करून फारसें उत्पन्न कोठेंच आलेलें दिसत नाहीं. बलुतेदार हे इतर धंदा प्रामुख्यानें करणाऱ्यांच्या गटांत बरेच आले असून त्या गटांत बलुत्याचें सरासरी उत्पन्न पाटाखालीं १०·६ व इतर भागांत १२·३ पडतें. इतर उत्पन्न या सदराखालीं, परगांवाहून येणारे पैसे, येणारें व्याज, खंड, पेन्शन, इतर धंद्याच्या विक्रीचें उत्पन्न वगैरे संकीर्ण बाबी येतात. अशा वेगवेगळ्या बाबी यांत एकत्र आल्यानें याचे रकमांत सारखेपणा असा विशेष दिसून येत नाहीं. कोरडवाहू भागांतील केवळ इतर काम करणाऱ्या गटाचें यांतील सरासरी उत्पन्न बरेंच जास्त (११३·७ रु.) आहे याचें कारण घोंगड्या विणण्याचा धंदा त्या भागांत बराच चालतो हें असावें.

जनावरांपासून येणारें रोख उत्पन्न वाढत्या जमीनगटांप्रमाणें फारसें बदलतांना दिसत नाहीं. साधारणपणें बऱ्याच गटांत दिसून येणारी गोष्ट म्हणजे इतर गांवांतील हें उत्पन्न पाटाखालील गांवांपेक्षां जास्त आहे. बाकी वेगवेगळ्या गटांत पडणाऱ्या उत्पन्नांतील तफावतीचा विशेष मेळ घालतां येत नाहीं.

शेतमालाच्या विक्रीपासून येणाऱ्या उत्पन्नांत वाढत्या जमिनीच्या गटाबरोबर सारखी वाढ दिसून येते. १० एकरांचे खालील गटांत ही विक्री कोरडवाहू भागांत जास्त दिसून येते तर वरील गटांत पाटाखालील भागांत ती जास्त दिसते. क १ व क २ गटांत या बाबीखालीं येणारी विक्री ही खंड अगर वांटा म्हणून आलेल्या धान्याची होय.

एकूण रोख उत्पन्नाचे आंकड्यांकडे पाहतां अगदीं खालच्या गटांत व अगदीं वरच्या गटांत तें जास्त व मधल्या गटांत कमी असलेलें दिसून येतें. क १ व क २ या गटांचीं रोख उत्पन्नें ओ गटाहूनसुद्धां जास्त असलेलीं आढळतात. पण यांत असें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं क १ व क २ या गटांस घरचें धान्यादि उत्पन्न जवळजवळ मुळींच नाहीं. तेव्हां हें रोख उत्पन्न हाच त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग आहे. उलट ओ, औ या गटांच्या एकूण उत्पन्नाचा रोख उत्पन्न हा कमी महत्त्वाचा भाग आहे. घरीं ठेवलेलें त्यांचें धान्य, जनावरांपासूनचें उत्पन्न हें यांत धरलें जात नाहीं. हेंच कारण अ गटाचें रोख उत्पन्न त्याचेहून जास्त जमिनीच्या गटाच्या रोख उत्पन्नापेक्षां जास्त दिसतें त्याचें असावें. औ गट सोडून इतर प्रत्येक गटांत त्यांतील पाटाखालील कुटुंबाच्या सरासरी रोख उत्पन्नापेक्षां इतर भागांतील कुटुंबाचें सरासरी रोख उत्पन्न कमी आहे. औ गटांत मात्र इतर भागांतील सरासरी उत्पन्न हें

पाटाखालील भागापेक्षां जास्त भरतें. हा फरक मुख्यतः 'इतर' उत्पन्नांत पडतो. याचीं कारणें घोंगडीचा धंदा करणारे बरेच धनगर लोक मोठ्या जमिनीचे मालक आहेत व रेल्वे जवळ असल्यामुळें व जमिनीची उत्पादकता कमी असल्यामुळें बाहेरगांवीं (पुणें, मुंबई, सुरत, या बाजूस) कामास जाऊन घरीं पैसे पाठविणारे लोक या भागांत बरेच आढळतात हीं असूं शकतील.

या कोष्टकांत फक्त बैल, गाई, रेडे, म्हशी, खोंड, कालवडी, रेडे, व रेडया या जनावरांचा समावेश केला आहे. कामाच्या बैलांचें व इतर जनावरांचें प्रमाण अपेक्षेप्रमाणेंच वाढत्या जमिनीच्या गटांबरोबर वाढत जातें. म्हशींचे बाबतींत कोष्टकांत असा कांहींच नियमितपणा दिसत नाहीं; मात्र सर्व गटांत कोरडवाहू भागांत म्हशींचें प्रमाण जास्त दिसून येतें, याबद्दल वरील एका कोष्टकांत चर्चा केलीच आहे.

कर्जाच्या रकमा एकूण आज असलेल्या देण्याच्या दाखविल्या आहेत. ज्या प्रमाणांत शेती जास्त भांडवली व जमिनीचें तारण मोठें त्या प्रमाणांत कर्जहि मोठें असें साधारणपणें दिसून येतें. औ गटांत सर्वांत जास्त सरासरी कर्ज आहे. इतर गटांत दर वेळीं कमी जमिनीच्या गटांबरोबर कर्ज कमी होत गेल्याचें दिसत नाहीं; पण साधारणपणें तशी प्रवृत्ति दिसून येते. क १ गटांत क २ गटापेक्षां कर्ज कमी आहे याचें कारण शेतमजुरांना कांहीं मोठें तारण नसल्यानें त्यांस कर्ज मिळणें कठीण असतें; उलट इतर धंदा करणारांस भांडवलाची जरूर असते व उत्पन्नाचीं साधनें (उदा. घोंगडयांचे माग) व उत्पादित माल हें मोठें तारण त्यांस ठेवतां येतें हें असावें.

## परिशिष्ट ए

# बांधावयाच्या सार्वजनिक इमारती

### पहिलीं पांच वर्षें

(१) अधिकारी व सरकारी नोकरांसाठीं घरें (कर्ज काढून)

(२) मुलींची शाळा

(३) पोलिस क्वार्टर्स

(४) कपाशी व गूळ बाजार (कर्ज काढून)

(५) पी. डब्ल्यू. डी. स्टोअर

(६) फिरतीस उपयोगी बंगले व चावड्या—साखरवाडी, फलटण, कारडगांव, आदरकी, तरडगांव, निंबळक, व बरड येथें.

(७) साप्ताहिक बाजारासाठीं जागा (कर्ज काढून)

(८) सार्वजनिक संडास व स्नानगृहें (फलटण शहर)

(९)*शेतकी, औद्योगिक व प्राथमिक शाळांस इमारती
(१०)*फलटण येथील रुग्णालय व अनुषंगिक इमारती
(११)*आदरकी, साखरवाडी, तरडगांव, निंबळक व बरड येथें दवाखाने व अनुषंगिक इमारती.

पुढील वर्षे

(१) हायस्कूलसाठीं जादा इमारत
(२) कचेऱ्यांसाठीं जादा इमारत
(३) स्त्रियांसाठीं क्लब
(४) क्लब हद्दींतील बंदिस्त बॅडमिंटन कोर्ट
(५) ग्रंथालयासाठीं इमारत
(६) सार्वजनिक नाट्यगृह (कर्ज काढून)
(७) गुदामें
(८) हायस्कूलसाठीं पॅव्हिलियन.

## परिशिष्ट ऐ

## समितीचे कामासाठीं झालेला खर्च

| बाब | रक्कम | | |
|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै |
| १ सभासदांचा प्रवासखर्च, प्रवासभत्ता वगैरे | ५४१ | १२ | ९ |
| २ नोकरवर्गाचा पगार वगैरे ... | १,५०६ | ११ | ६ |
| ३ नोकरवर्गाचा प्रवासखर्च, प्रवासभत्ता वगैरे | ३०८ | ५ | ६ |
| ४ स्टेशनरी, पुस्तकें, पोस्टेज ... | २२९ | ११ | ६ |
| ५ इतर ... ... ... | ५७ | २ | ६ |
| एकूण ... | २,६४३ | ११ | ९ |

ह. कृ. परांजपे
चिटणीस

ध. रा. गाडगीळ
अध्यक्ष

* यांचा खर्च शिक्षणाच्या व वैद्यकीय मदतीच्या योजनांत धरलेला आहे.

## परिशिष्टें

### परिशिष्ट ओ

### समितीपुढें साक्षी देणाऱ्या नागरिकांचीं नांवें

(१) श्री. विनायक भिकाजी देशपांडे

(२) श्री. श्रीपाद माधव दाणी

(३) श्री. मोतीराम नथुराम दोशी

(४) श्री. बाजीराव आनंदराव पवार, अध्यक्ष, फलटण नगरपालिका

(५) श्री. विश्वंभर शंकर झिरपे, अध्यक्ष, फलटण लोकलबोर्ड.